# गाथा सप्तशती

♦ (मुळ ग्रंथ - **मार्कंडेय पुराण** (संस्कृत)

♦ मुळ कथा- **देवी महात्म्य** (सप्तशती संस्कृत)

♦ गद्य भाष्य - **भावार्थ गाथा सप्तशती**

♦ **लेखन प्रेरणा** - सद्‌गुरू श्री अनिरुद्ध बापू (मुंबई) ♦

♦ **लेखक** - श्री अतुलसिंह द्वारकादास महाजन

**सद्‌गुरु आज्ञा** :
फाल्गुन शु ।। १ शालिवाहन शके १९३९,
इसवी सन दि. १६/०२/२०१८.

**लेखन अवधी**
फाल्गुन शु।। ७ शके १९३९ इसवी सन दि. २२/०२/२०१८ ते
फाल्गुन कृ।। ४ शके १९३९ इसवी सन दि. ०५/०३/२०१८.

# अनुक्रमणिका

# तु आणि मी मिळून

खरोखरच सद्गुरुच्या वचनाची प्रचितीच हा ग्रंथ आहे.

दि.१६/०२/२०१८ रोजी बापूंच्या घरी कौटुंबिक पूजनासाठी मी, अतुलसिंह महाजन गुरुजी आणि मंडळी गेलेलो होतो. घरातील वातावरण मंत्रमुग्ध-सकारात्मक-मन:सामर्थ्यवर्धक असते. हा नेहमीचा अनुभव आजही होता. अशाच वातावरणात पूजनविधी पार पडले. सर्वसाधारणपणे बहुतांश वेळा बापूंची भेट किंवा दर्शन या निमित्ताने होतच असते, मात्र त्यांची साधना किंवा अन्य कार्यक्रम असल्यास होऊ शकत नाही. योगायोगाने यादिवशी भेट झाली. नेहमीप्रमाणेच खेळीमेळीने बापू बोलत होते. त्याच वातावरणात बोलताबोलता बापूंनी सहज सुचविले की,"श्रद्धावानांना कळेल अशा भाषेत सोप्या पद्धतीने तुम्हाला सप्तशतीवर लेखन करायचयं" आणि नकळत आम्ही दोघांनीही सकारात्मक मान तुकविली ही एक सद्गुरुंचीच लीला...

कार्य किती महान व अवघड आहे याची जराही चिंता वाटली नाही. मनाला खूप आल्हाददायक वाटत होते. सर्वसाधारणपणे एक आठवडा उलटून गेला. नित्य देवपूजन झाले. कुलदेवतांदि सद्गुरुंसहित सर्वांना सहाय्यार्थ बोलावणं केलं. जीवनात पूर्वी कधीही न अनुभवलेलं वातावरण तयार झालं होतं. लेखणीचे टोक भुजपत्रावर टेकवले आणि विनाविलंब या ग्रंथ लेखनाला प्रारंभ झाला.

सद्गुरुंच्या कृपेशिवाय ज्याची सुतराम शक्यताच नाही याची जाणीव होतीच. त्यालाच म्हटलं तुझं कार्य आहे, आम्हालां निमित्त बनवलसं-काय आणि कसं ते तुच करुन घे! आणि त्या हाकेला धाऊन बापूने शक्तीरुपात हे कार्य करवून घेतले हा माझा विश्वास आहे. गद्य भाषांतरासह मार्कंडेय ऋषि, मन्वंतर, कालगणना, ग्रंथाची निर्मीती ज्यातुन झाली त्या मार्कंडेय पुराणांचा अभ्यासपूर्ण ऊहापोह या करुन खऱ्या अर्थाने सार्थ केला आहे. मी लेखनी बनुन कार्यपूर्तीचा प्रयत्न केला आहे. मात्र यातील प्रत्येक अक्षर सद्गुरु श्री अनिरुद्ध यांची शक्ती असून हा ग्रंथ ती जगत्जननी आहे. आम्ही केवळ निमित्त मात्र...

**भावार्थ व संदर्भ विश्लेषक -**
**श्री अतुलसिंह द्वारकादास महाजन**

**।। हरि ॐ ।। श्रीराम ।। अंबज्ञ ।। नाथसंविध् ।।**

।। श्री ।।

।। हरि ॐ ।।

# ।। श्री मार्कंडेय ऋषि ।।

मृगशृंग पुत्र मृकंण्डु ऋषि आणि पत्नी मुद्गल कन्या मरुद्मती हे श्रेष्ठतम शिवभक्त होते. त्यांनी सुपुत्र प्राप्तीसाठी भगवान शंकराची आराधना सुरु केली. अनेक वर्षाच्या तपश्चर्येनंतर भगवान शंकर त्यांना प्रसन्न झाले व म्हणाले कि, जर तुम्हाला अल्पमती आणि निर्बुद्ध , दीर्घ आयुष्य असणारा पुत्र व्हावा असे वाटते की, विलक्षण तेज संपन्न मात्र अल्पायुषि अशा मुलाची कामना आपण करीत आहात? त्यावेळी परमभक्त असणाऱ्या ऋषी पतीपत्नींनी अल्पायु मात्र तेजसंपन्न-प्रतिभाशाली पुत्राची कामना केली. त्याप्रमाणे शिवाकडून वरदानाच्या रुपात श्री मार्कंडेयाचा या बालकाचा जन्म झाला. नियतीने त्याला केवळ सोळा वर्षांचेच आयुष्य प्रदान केले होते.

पित्याच्या आदर्शावर चालणाऱ्या बाल मार्कंडेयाची शिवसाधना बालवयातच आरंभ झाली. अतिशय तीक्ष्ण बुद्धी आणि विलक्षण तेज असणाऱ्या या बालकाचा वयाच्या आठव्या वर्षी उपनयन संस्कार झाला आणि वेदाभ्यासास सुरुवात झाली. अल्पावधीतच त्याने चारही वेदांचे अध्ययन पुर्ण केले. वैदिक शिक्षणात उत्तम ज्ञानार्जन करणारे श्रेष्टतम शिष्य मार्कंडेय होते. त्याचबरोबर त्यांनी शिवभक्तीचीही कास सोडली नाही. ते पुर्ण दिवस शिवलिंगाची अर्चना आणि आराधना करु लागले. तसेच भिक्षावृत्ती स्विकारुन पाठशाळेत गुरुसेवा करु लागले. या साधनेत पंधरा वर्ष पुर्ण झाल्यावर मृकंण्डु ऋषिना शिव वरदानाचे ज्ञान झाले. त्यामुळे माता व पिता दोघेही उदास राहू लागले. पुत्राने त्यांच्या उदासिचे कारण अनेकदा विचारले. त्यावेळी मातापित्यांनी त्यांना शिववरदानाची गोष्ट सांगितली. मार्कंडेयास केवळ १६ वर्षाचे आयुष्य शिवकृपेने प्राप्त झाले आहे हे समजताच बाल मार्कंडेय म्हणाले की आपण उदास होऊ नका, मी आपल्या आनंदाकरिता शिवाची मनधरणी नक्की करीन.

यानंतर त्यांनी शिवाची घोर उपासना सुरु केली. नियत समयाला काळाचे सेवक मार्कंडेयाला न्यायला आले. मात्र ते शिवआराधनेत रममाण असल्याने काळ पाश त्यांच्यापर्यंत पोहोचु शकले नाहीत. निराश होऊन ते यमलोकी गेले, व घडलेली हकीकत सांगितली. कालचक्र क्रमानुसार स्वत: यमराज मार्कंडेयाचे प्राण हरण्याकरिता त्या शिवस्थानी आले आणि श्री मार्कंडेयांस स्वत: सोबत येण्याचे आवाहन केले. त्यावेळी मार्कंडेय म्हणाले की, मी शिवपुजनात व्यस्त असल्याने मी आपणांसोबत येऊ शकत नाही. यमधर्माने आपले यमपाश फेकताच श्री मार्कंडेयाने शिवलिंगाला मीठी मारली. यमाच्या पाशाचा वेढा शिवलिंगाला बसला. शिव स्वत: तिथे प्रकट झाले आणि यमाला तिथुन जाण्यास सांगितले. त्यानंतर मार्कंडेयाच्या भक्तीने सुप्रसन्न होऊन शिवाने त्यांना सप्तकल्पाचे आयुष्य प्रदान केले.

**मार्कंडेय महाभाग सप्तकल्पांत जीवन ।**
**आयु:आरोग्यम् ऐश्वर्यम् देहिमे मुनिपुंगव ।।**

शिवांकडून सप्त कल्पांचे आयुष्य प्राप्त झाल्यावर मार्कंडेय ऋषींनी आपली निष्काम आराधना कठोरतेने आरंभ केली. नैष्ठिक ब्रह्मचर्यव्रत धारण करुन ते हिमालयाच्या कुशीत पुष्पभद्रा नदीच्या किनाऱ्यावर नर-नारायणाची उपासना करु लागले. सर्व चित्त ईश्वराच्या चरणावर केंद्रीत करुन त्यांनी आपली निष्काम तपस्या चालू केली.

याक्रमाने अनेक वर्षे लोटल्यानंतर इंद्राला या तपस्येच्या तेजाने भय वाटु लागले आणि त्याने त्या तपस्येत विघ्न आणण्यासाठी कामदेवादिकांना पाठविले. मात्र मार्कंडेयाचे चित्त नारायन चरणी लीन असल्याने त्यांच्या ह्रदयांत कोणताही विकार उत्पन्न झाला नाही. निष्फळ होउन इंद्रादि देव स्वस्थानी गेले, मात्र कामालाही जिंकल्याचा गर्व मुनींना झाला नाही. ते भगवत् कृपा समजून भावमग्न झाले. ईश्वरी कृपेचा अनुभव घेऊन ते व्याकुळ झाले

आणि देवाच्या दर्शनाकरिता त्यांचे ह्रदय आतुर झाले.

त्यानंतर नारायणाने त्यांना दर्शन देऊन वरदान मागण्यास सांगितले. मार्कंडेय म्हणाले, हे प्रभो ! आपल्या चरणांचे प्रत्यक्ष दर्शन प्राप्त होणे हाच माझ्या जीवनाचा परमपुरुषार्थ आहे. आपल्या प्राप्तीनंतर काही मागणेच उरत नाही. मात्र आपण वर मागण्याची आज्ञा केली आहे तर मी केवळ आपली माया पाहू इच्छितो.

भगवान नारायण यांनी एवमस्तु असा वर देऊन ते गुप्त झाले आणि मार्कंडेयही आपल्या नित्य साधनेत निमग्न झाले. एक दिवस मार्कंडेय ऋषि आपली नित्य आराधना करत पुष्पभद्रा नदीच्या काठावर आपल्या आश्रमात बसले होते. अचानक विजेचा कडकडाट सुरु झाला आणि काळ्याभोर ढगांनी पुर्ण आकाश भरुन गेले. थोड्याच वेळात मुसळधार पाऊस सुरु झाला. पुष्पभद्रा नदी सागराप्रमाणे वाहू लागली. सर्वत्र प्रलयासमान पाणी भरले. त्या पाण्यापासून मुनी स्वत:ला वाचविण्याचा प्रयत्न करु लागले. तेथील महाकाय लाटा मार्कंडेय ऋषिंना इकडून तिकडे फेकू लागल्या . आता नदीने पूर्णत: समुद्राचे रुप धारण केले होते. आश्रम व सभोवती असणारे झाडे सर्वच गुप्त होऊन अफाट पसरलेल्या पाण्याने सारी सृष्टी व्यापली. मगर-सुसर याप्रमाणे मोठे जीव मुनींच्या शरीराचा चावा घेण्याकरिता त्यांच्या अंगावर तुटुन पडत होते. ते आता पाण्यात पुरते बुडु लागले. त्यांच्या जटा खुल्या झाल्या बुद्धी विक्षिप्त होऊन शरीर हळुहळू शिथिल पडू लागले. त्यांनी अतिशय दीन स्वरुपात व्याकुळ अंत:करणाने भगवंताचे स्मरण केले.

त्याक्षणी त्यांनी पाहिले की एक विशाल वटवृक्ष जलप्रलयात त्यांच्या समोरच दिसू लागला. आश्चर्याने ते त्या वृक्षाजवळ गेले, वटवृक्षाच्या ईशान कोणातील शाखेवर पानापासून एक सुंदर द्रोण तयार झाला होता. त्या द्रोणामध्ये एक अद्भुत बालक झोपलेल्या अवस्थेत होते. त्याचे करकमल आणि चरणकमल सुकुमार आणि सौम्यतेजाने परिपूर्ण होते. त्याच्या मुखावर स्मित हास्य विलसत होते. मोठे डोळे प्रसन्नतेच्या तेजाने चमकत होते. असे दृश्य पाहून त्यांच्या शरीराचा थकवा क्षणार्धात नाहीसा झाला. त्या बालकाला उचलून घेण्याकरता ते जवळ गेले. त्या शिशूच्या श्वासोच्छवासाबरोबर विवश होऊन मुनी त्या नासिकारंध्रातुन बालकाच्या उदरात जाऊन पोहोचले.

मार्कंडेय ऋषिनी बालकाच्या उदरात जाऊन अनंत ब्रह्मांडाचे दृश्य पाहिले. नदी सरोवर पर्वतराई यासह संपूर्ण पृथ्वी त्यांना दिसली ती पुष्पभद्रा नदी व तिच्या तटावरील आश्रमाचेही त्यांना दर्शन झाले. हे दृश्य पाहून ते अत्यंत विस्मित झाले. आणि त्यांनी आपले डोळे बंद करून घेतले. त्या उच्छवासाबरोबरच ते बाहेर फेकले गेले. बाहेर आले तर पुर्ववत दृश्य होते. ते आश्रमात नदीच्या तटावर बसून साधना करीत होते. त्याक्षणी त्याना परमेश्वराच्या महामायेचा साक्षात्कार झाला. त्यांनी ब्रह्मा विष्णू शंकर आदि देवानाही मोहित करणारी माया आज पाहिली व त्याक्षणी त्यांनी या दैवी शक्तीचे वर्णन करण्यास सुरुवात केली. तेच पुढे मार्कंडेय पुराण म्हणून प्रसिद्ध झाले.

त्यांच्या तप साधनेने मोहीत होऊन भगवान शंकर व पार्वती यांनी त्यांना स्वेच्छा दर्शन दिले. मार्कंडेय ऋषिंची कामनाहीन भक्ती पाहून साक्षात भगवतीने त्यांच्या चित्तामध्ये प्रवेश केला आणि लोककल्याणाच्या भावनेने त्यांनी देवी महात्म्य लिखान करावे असा संकेत दिला. तोच परमपुजनीय, नित्यस्मरणीय देवी महात्म्य अर्थात दुर्गा सप्तशति म्हणून नांव लौकीक पावलेला अत्यंत अद्भूत सर्वमान्य ग्रंथ ज्याचे एक एक अक्षर सिध्द मंत्र आहे मार्कंडेय पुराणाच्या अंतर्गत निर्माण झाला.

# श्री मार्कंडेय पुराण

वेदवाणी ही अपौरुषेय आहे. ऋषिमुनिंच्या तप साधनेतुन प्रेरित झालेले भारत वर्षाचे श्रेष्ठतम वाड्.मय म्हणजे वेद होय. वैदिक कालीन संस्कृती परिपूर्ण आणि स्वयंपुर्ण स्वरुपाची होती. वेदांतील ऋचांच्या निरंतर उपासनेतुनच पुराणांचा जन्म झाला.

पुराण हे भारतीय संस्कृतीचे सर्वश्रेष्ठ भांडार आहे. अनंत ज्ञानराशींचा अनमोल ठेवा पुराणात आहे. पुराणातील कथा आजही उद्बोधक आहेत. त्यातील एक नांव म्हणजे श्री मार्कंडेय पुराण होय. अठरा महापुराणांत या पुराणाचा सातवा क्रमांक लागतो. ९००० हुन अधिक श्लोकांचा संग्रह व एकून १३७ अध्याय या महापुराणांत आहेत. भगवान नारायणांच्या महामायेचा साक्षीभावाने अनुभव घेतलेल्या मार्कंडेय ऋषिंनी या पुराणाची रचना केलेली आहे. भगवती आदिशक्तीने मुनींच्या ह्रदय कमलात स्थान ग्रहण करुन कोमल चित्तधारी ऋषींकडून या पुराणाची रचना करुन घेतली आहे. जैमिनी - मार्कंडेय, क्रौष्टुकी-मार्कंडेय संवाद आदि विभाग (सर्ग) यात आहेत.

सांप्रत दुर्गा सप्तशति हा ७०० श्लोकाचा महाशक्तीच्या लिलांचे वर्णन करणारा ग्रंथ या महापुराणांचा भाग आहे. अध्याय क्र.४१ ते ५३ अशा एकूण १३ अध्यांयांचा मिळून सप्तशति हा ग्रंथ तयार झाला आहे.

या महापुराणांत आदर्श जीवन चरित्र, राजा हरिश्चंद्र चरित्र, सती मदालसा चरित्र, श्राद्धकर्म, योगचर्चा, प्रणव महात्म्य, विविध मन्वंतरांच्या अधिपतींचे वर्णन, परमात्म्याचे त्रिविध रुप, वेदांचे प्रकटीकरण आदि अनेक विषयांचा उहापोह करण्यात आलेला आहे.

**कालगणनेचे मापदंड**

ज्यावेळी संपूर्ण जगत प्रकृतीमध्ये लीन असते. त्या समयाला विद्वान लोक प्रलय असे म्हणतात. त्यावेळी पुरुष आणि प्रकृती समान धर्मी अर्थात निष्क्रिय आणि निर्विकार असतात. आणि सत्व रज तम आदिगुण समान पातळीत व परस्परांत ओतपोत भरलेले असतात. जसे तिळामध्ये तेल आणि दुधामध्ये तुप असते.

**सदैकत्वं न भेदोरस्ति सर्वदैव ममास्यच ।**

**योऽसो साहमहं योऽसो भेदोऽस्ति मतिविभ्रमात् ।।** (श्रीमत् देवी भाग. स्कं.३/अ.६/श्को.२)

प्रकृति आणि परब्रह्म सदा एकच आहेत त्यात काहीही फरक नाही. जी प्रकृती आहे तेच परब्रह्म आहे आणि जे परब्रह्म आहे तिच प्रकृती आहे. केवळ बुद्धीभ्रमातुन दोन्हीमध्ये भेद दिसून येतो.

**एकमेवाद्वितीयं वै ब्रह्म निंयं सनातनम् ।।**

**द्वैतभावं पुनर्याति काल उत्पत्तीसंज्ञके ।।** (श्रीमत् देवी भाग. स्कं.३/अ.६/श्लो.४)

ब्रह्म अद्वितीय, एक, नित्य आणि सनातन आहे. केवळ सृष्टी रचनेच्या समयाला द्वैतभावाला प्राप्त होते.

महर्षीगण प्रकृतीला अव्यक्त, सुक्ष्म, नित्य व सत्स्वरुप मानतात. आणि पुरुष किंवा ब्रह्म अर्थात नित्य अविनाशी, अजर, अप्रमेय, सनातन मानले जाते. प्रकृती ही क्षेत्र आहे आणि पुरुष हे क्षेत्राज्ञ आहे. ज्ञानाच्याही पुर्वकाळात पुरुष आणि प्रकृती एकच असतात. जसे बीजाला आवरण झाकुन ठेवते त्याचप्रमाणे अव्यक्त प्रकृती सनातन ब्रह्मतत्वाला आवृत्त करते. ही उत्पत्ती पुर्वीची स्थिती असते. ज्याला वेद **ॐ खं ब्रह्म** ।। (यजु.अ.४०/१७) अशी उपाधि देतात.

**हिरण्मयेन पात्रेन सत्यतस्त्यापिदितं मुखम् ।(यजु. अ.४०/१७)**

सोन्याच्या चमकदार पात्राने सत्याचे मुख अर्थात स्वरुप झाकलेले असते.

परमेश्वराच्या योग दृष्टीने प्रकृतीमध्ये क्षोभ उत्पन्न होतो. तेव्हा महान अंड्यातुन ब्रह्मांड-हिरण्यगर्भ-ब्रह्माची उत्पत्ती होते. स्वत: ब्रह्मा उत्पत्ती समय निर्गुण स्वरुप असूनही रजोगुणाचा उपभोग करत सृष्टी उत्पत्तीचे कर्तव्य करतात. सत्वगुणाच्या उत्कर्षातुन विष्णुस्वरुप धारण करुन धर्मपुर्वक प्रजेचे पालन करतात. आणि तमोगुणाच्या अधिकतेने युक्त होऊन रुद्ररुप धारण करुन संहार कार्य संपन्न करतात. याप्रकारे सृष्टी पालन-संहार या गुणांनी युक्त असुनही परमेश्वर वास्तवत: निर्गुणच आहे. ज्याप्रमाणे शेतकरी प्रथम पेरणी (बीजरोपण) करतो. नंतर त्याचे रक्षण करतो व पीक पक्व झाल्यावर काढणी करतो. बीजरोपण करणारा, शेताची रक्षा करणाारा आणि काढणी करणारा असे तीन नांव धारण करुनही तो एकच असतो. त्याच प्रमाणे ब्रह्मा-विष्णु-रुद्र नामधारण करणारा क्षेत्रज्ञ परमेश्वर एकच असतो.

याप्रमाणे सृष्टीच्या उत्पत्तीचे आदिकारण होऊन रजोगुणधारी ब्रह्मा प्रकट होतात. त्यांचे आयुष्य १०० वर्षांचे मानले आहे. त्यांचे परिमाण पुढीलप्रमाणे:-

**१ निमिष = एक पापणी लवण्याचा काळ**
**१५ निमिष =एक काष्टा**
**३० काष्टा = एक कला**
**३० कला = एक मुहुर्त**
**३० मुहूर्त = १ दिवस रात्र**
**३० दिवस =२ पक्ष/एक मास**
**६ मास =१ आयन**
**२ आयन =१ वसुंधरा वर्ष**

(आपण वसुंधरावासी असल्याने हे परिमाण वसुंधरेच्या गतीप्रमाणे निर्धारित केले आहे. मात्र मंगळ-गुरु-शनि आदि प्रत्येक ग्रहाचे परिभ्रमण व परिवलन गती वेगळी आहे. पृथ्वीच्या १२ वर्षाचे गुरुचे १ वर्ष असते आणि शनिचे १ एक वर्ष पुर्ण होईपर्यंत पृथ्वीचे ३० वर्ष होतात. कालाचे परिमाण सापेक्ष आहे. सुर्यमालेचा विचार केल्यास तिथे आजचे शास्त्रज्ञ पृथ्वीचे वर्ष ग्राह्य धरीत नाहीत. तिथे प्रकाशवर्ष (**Light year**) अर्थात सुर्याचा एक किरण सुर्यापासून निघाल्यावर एका वर्षात जेवढा प्रवास करतो त्याला एक प्रकाशवर्ष असे म्हणतात. त्यामुळे कालमापन ही सापेक्ष संज्ञा आहे. त्याचे परिमाण स्थितीनुसार बदलणारच.)

पृथ्वीचे एक वर्ष म्हणजे देवतांचा एक दिवस अर्थात उत्तरायण म्हणजे देवतांचा दिवस आणि दक्षिणायन म्हणजे देवतांची रात्र ! याप्रमाणे देवतांचे जेव्हा ३६० दिवस होतात त्याला एक दिव्य वर्ष अशी संज्ञा आहे. याप्रमाणे जेव्हा १२००० दिव्य वर्ष होतात तेव्हा त्याचे एक चतुर्युग असते. म्हणजे देवांच्या १२००० दिव्य वर्षात ४००० दिव्य वर्षाचे सत्ययुग. ४०० दिव्य वर्ष प्रात: संध्या आणि ४०० दिव्य वर्षांची सायं संध्या असते.

३००० दिव्य वर्षाचे त्रेतायुग असते. त्याची प्रत्येकी ३०० दिव्य वर्षाची प्रात: संध्या आणि सायं संध्या असते. २ हजार वर्षाचे द्वापार युग आणि प्रत्येकी २०० दिव्य वर्षाची प्रात: संध्या आणि सायंसंध्या असते. तर १००० दिव्य वर्षाचे कलियुग व प्रत्येकी १०० दिव्य वर्षाची त्याची प्रात:संध्या व सायंसंध्या असते. याप्रमाणे १२००० दिव्य वर्षाचे १ चतुर्युग म्हणजेच त्याला १ महायुग असे म्हणतात. १००० महायुग झाल्यावर ब्रह्मदेवाचा १ दिवस पुर्ण होतो. याला एक कल्प असे म्हणतात. ब्रह्मदेवाच्या एका दिवसात १४ मनु व १४ मन्वंतर होतात. म्हणजेच एका मन्वंतरात ७१ महायुगाहुन अधिक काळ असतो. एक दिवस पूर्ण झाला की ब्रह्मदेवाची रात्रही एक कल्पापर्यंत असते. या काळात सृष्टीचा संहार होतो आणि रात्रीचा काळ संपला की परत

सृष्टीक्रम चालू होतो. याप्रमाणे हिरण्यगर्भातुन उत्पत्ती झालेल्या ब्रह्माला १०० वर्ष आयुष्य आहे. ज्याला परा असे म्हणतात. आणि ५० वर्षाला परार्ध ही संज्ञा आहे. सध्या ब्रह्मदेवाचे आयुष्य ५० वर्ष पूर्ण झाले आहे. म्हणजे द्वितीय परार्ध सुरु असून ५१व्या वर्षाच्या पहिल्या मासाच्या पहिल्या दिवसाच्या १३ घटीका पूर्ण झाल्या आहे.

**या १४ मन्वंतराची नांवे पुढील प्रमाणे,**

१) सायंभूव ,२)स्वारोचिष, ३)उत्तम , ४)तामस , ५)रेवत, ६)चाभुष, ७)वैवस्वत, ८)सावर्णि, ९)दक्षसावर्णि, १०)ब्रह्मसावर्णि, ११)धर्मसावर्णि, १२)रुद्रसावर्णि, १३)देवसावर्णि, १४)इंद्रसावर्णी.

सध्या वैवस्वत मन्वंतर चालू असून २७ महायुगे जाऊन २८ वे महायुग चालू आहे. म्हणजे या मन्वंतरात २७ वेळा ४ युगे येऊन गेले व २८ व्या महायुगाचे कृतयुग, (सत्ययुग) त्रेतायुग, द्वापारयुग संपुण कलियुगाची ५११९ वर्षे (शालीवाहन शक १९४० व ईसवी सन २०१८पर्यंत ) झाली आहेत.

**मानवांचे १ वर्ष म्हणजेच देवतांचा १ दिवस (२४ तास)**
**मानवांचे ३० वर्ष म्हणजे देवतांचा १ मास**
**मानवाचे ३६० वर्ष म्हणजे देवतांचा १ दिव्य वर्ष**
**३६० वर्ष = १ दिव्य वर्ष**
**४,३२,००० वर्ष =१२०० दिव्यवर्ष =कलियुग**
**८,६४,००० वर्ष =२४००दिव्यवर्ष =द्वापारयुग**
**१२,९६,००० वर्ष =३६००दिव्यवर्ष =त्रेतायुग**
**१७,२८,००० वर्ष =४८००दिव्यवर्ष =सत्ययुग**
**४३,२०,००० वर्ष =१२०००दिव्यवर्ष =महायुग**
**३०६७,२०,००० वर्ष =७१ महायुग =१ मन्वंतर**
**१४ मन्वंतर =१ कल्प (ब्रह्मदेवाचा १ दिवस )**

इतकाच काळ ब्रह्मदेवाची रात्र असते. म्हणजे या काळात सृष्टीचा विनाश होतो.
म्हणजे

**२ कल्प =ब्रह्माचा एक दिवस,**
**ब्रह्माचा १ कल्प =प्रकृति-शिव-विष्णु यांचा १ निमिष**
**प्रकृती-शिव-विष्णु यांचे १००० निमिष =१ दंड**
**१०० दंड =प्रकृतीचा १ दिवस,**

यानंतर प्राकृत प्रलय होतो. अर्थात शिव - विष्णु- प्रकृति ब्रह्म तत्वामध्ये लीन होते. यावेळी संपूर्ण ब्रह्मांड नष्ट होते. असे ब्रह्मदेवाचे घड्याळ आहे.

ज्याला कल्प कालमापन पद्धती म्हणुन मान्यता आहे. श्री मार्कंडेय यांना याप्रमाणे शिवाने ७ कल्पाचे आयुष्य प्रदान केले आहे.

सांप्रत दुर्गा सप्तशति ग्रंथामध्ये ज्या महान सुरथ राजाची कथा वर्णन केली आहे ते स्वारोचीष् या दुसऱ्या मन्वंतरातील असुन आदि शक्तीच्या वरदानाने भविष्यात सूर्य सावर्णि या आठव्या मन्वंतराचे स्वामी अर्थात मनु होतील.

**वैवस्वत मन्वंतर आणि सावर्णि मन्वंतर**

वैवस्वत आणि सावर्णि मनवंतराची कथा श्री मार्कंडेय पुराणात येते. त्वष्टा प्रजापती कन्या संज्ञा ही सूर्याची पत्नी होती. सूर्याचे एक नांव विवस्वान आहे. विवस्वान आणि संज्ञा यांच्यापासून वैवस्वत मनुची उत्पत्ती

झाली. सौरतेज सहन न झाल्याने संज्ञाने आपली छाया सूर्यपत्नी म्हणून ठेवली व ती पित्या घरी गेली. छाया संज्ञापासून ज्या पुत्राची उत्पत्ती झाली, त्या वैवस्वत मनुप्रमाणेच तेजस्वी असल्याने त्याचे नांव सावर्णि ठेवले. हेच भविष्यातील सूर्यपुत्र सावर्णि मन्वंतर!! आणि याच सावर्णि मन्वंतराचे स्वामी होण्याचा वर आदिशक्तीने महान सुरथ राजास दिला.

# देवी महात्म्य ग्रंथ

देवी महात्म्य हा ७०० श्लोकांचा परम ग्रंथ मार्कंडेय पुराणातील भाग आहे. या ग्रंथाला दुर्गा सप्तशति किंवा चंडीपाठ असेही म्हणतात. याच विषयाचा कथाभाग देवी भागवत पुराणामधील विविध स्कंदामध्ये देखील आहे. प्रस्तुत दुर्गा सप्तशति या ग्रंथामध्ये एकून ७०० श्लोक आहेत. पुर्ण श्लोक -५३५, अर्धश्लोक-४२,उवाच मंत्र ५७ अवदानानी मंत्र ६६ आहेत. या ग्रंथाचे ३ चरित्र आहेत.

ज्याला प्रथम चरित्र, मध्यम चरित्र, उत्तर चरित्र (अदि शक्तीवरील प्रेम भावनेने उत्तर चरित्रास प्रेमाने उत्तम चरित्र असेही बोलण्याचा प्रघात आहे.) हे नामाभिधान आहे.

प्रथम चरित्राची श्री महाकाली देवता-नंदा शक्ती-रक्तदंतिका बीज-ऋग्वेद स्वरुप असून अग्नि तत्व आहे. या चरित्राचा आरंभ आदिशक्तीच्या **ॐ ऐं** तर समाप्ती **ऐं ॐ** या बीजाने होते. अर्थात या चरित्राला ऐं या भगवतीच्या महाकाली बीजाचे संपुट लावले आहे.

द्वितीय चरित्राची देवता श्री महालक्ष्मी-शाकंभरी शक्ती-दुर्गा बीज- यजुर्वेद स्वरुप-वायु तत्व आहे. याचा आरंभ आदिशक्तीच्या ॐ **ह्री** तर समाप्ती **ह्री** ॐ अशी आहे. अर्थात या चरित्राला **ह्रीं** या भगवतीच्या महालक्ष्मी बीजाचे संपुट लावले आहे.

तृतीय उत्तर चरित्राची देवता महासरस्वती-भिमाशक्ती-भ्रामरी बीज व सामवेद हे स्वरुप असून सुर्य तत्व आहे. या चरित्राचा आरंभ आदिशक्तीच्या ॐ **क्लीं** तर समाप्ती **क्लीं** ॐ या बीजाने होते. अर्थात या चरित्राला **क्लीं** या भगवतीच्या महासरस्वती बीजाचे संपुट लावले आहे.

शक्तीची उपासना वेदांएवढीच प्राचीन आहे. स्वभावत: वेद मंत्रांमधील स्तुतीमध्ये शक्तीची आराधना हेच मुलाधार तत्व आहे. ब्रह्माचे उत्पत्ती-विष्णुचे पालन व रुद्राचे संहार कार्य सर्व शक्तीमुळेच संभव आहे. जेव्हा हे तीनही देव आपले नियत कार्य करण्यास असमर्थ ठरतात तेव्हा ते आदिशक्तीला साद घालतात. हेच या चरित्रातुन स्पष्ट होते. स्वभावत: निर्गुण असणारी प्रकृती महाकाली-महालक्ष्मी-महासरस्वती स्वरुपात सत्व-रज-तम आदि तीन गुणांना धारण करते तेव्हाच सृष्टीचे उत्पत्ती-रक्षण-संहार ही कार्ये संभवतात. शब्दकोशानुसार शक् धातूला क्तिन् हा प्रत्यय लावल्यास **शक्ती** शब्दाची उत्पत्ती होते. ज्याचा अर्थ आहे की, असे साधन ज्यामुळे कोणीही व्यक्ती काहीही करण्यास समर्थ होऊ शकतो. वेदांमधील मंत्रांत इंद्र, वरुण, यम, सुर्य, विष्णु, अग्नि, रुद्र आदि देवांच्या सूक्तांबरोबरच इंद्राणि, वारुणी, यमी, वैष्णवी, रुद्राणि आदि शक्तींचीही समान रुपात उपासना केली गेली आहे. कोणत्याही भौतिक लौकीक-अलौकीक-पारलौकीक कार्यासाठी शक्ती आवश्यकच आहे. अचेतन तत्वाला चेतनामय करुन कार्याला उद्युक्त करणारी शक्तीच सार्वभौम आहे. त्यामुळेच असमर्थ व्यक्तिला रुद्रहीन वा विष्णुहीन न बोलता शक्तिहीन बोलतात. तसेच जो कमजोर आहे त्याला अशक्त बोलतात.

**कलौ चण्डी विनायकौ**

या श्रुतीप्रमाणानुसार कलीयुगाच्या सांप्रत चरणांत चंडीची उपासना आणि श्री गणेशाची उपासना अत्यंत आवश्यक आहे. देवीची आराधना म्हणजेच शक्तीची आराधना होय. स्पंदन शक्ती हा जड चेतन सृष्टीमधील मुलभाव आहे हे आजच्या विज्ञानानेही मान्य केले आहे. त्याच स्पंद शक्तीचे नादात्मक रूप म्हणजे मंत्र होय.किंबहुना स्पंद कार्याचा कार्यकारण भाव ही शक्तिच आहे.

देवी सप्तशती ग्रंथातील प्रत्येक मंत्र-शब्द आणि बीज अत्यंत प्रभावी शक्तीने आहे. **वाग्बीज (वाणीबीज-महासरस्वती) अर्थात ऐं, मायाबीज म्हणजे (महालक्ष्मी) ह्रीं तर कामराज (महासरस्वती) म्हणजे क्लीं बीज या तीन बीजांचा ऋषिच्या महाप्रज्ञेने केलेला विलास म्हणजेच सप्तशति हा महाग्रंथ होय!**

**वियदीकारसंयुक्तं वीतिहोत्रसमन्वितम् । अर्धेदुंलसितं देव्या बीजं सर्वार्थसाधकम् ।।** (देवी अथर्वशीर्ष)

वियत - आकाश (ह) तसेच ई कारयुक्त, वीतिहोत्र - अग्नि बीज (र), व अर्धचंद्र ( ँ ) याने अलंकृत जे देवीचे बीज आहे ते सर्व मनोरथ पुर्ण करणारे आहे.यात ह्रीं या बीजाची महती सांगितली आहे. तसेच देवी अथर्वशीर्ष या स्तोत्रात २०व्या श्लोकात नवार्ण मंत्राचे महात्म्य वर्णन केले आहे.

श्रीमत्‌शंकराचार्य लिखित सौंदर्य लहरी या पवित्र ग्रंथातील प्रथम श्लोकातच भगवतीच्या असीम शक्तीचे वर्णन केले आहे. भगवान शिवाच्या समवेत शक्ती असते त्याच वेळी ते प्रभावी असतात. अन्यथा त्यांना साधी हालचालही कठीण असते. शिव शब्दातील ई कार हा शक्तीचेच द्योतक आहे. शिव शब्दातुन जर ई काढला तर सचेतन शिवतत्वही जड शव होऊन जाते. एवढी शक्तीची आवश्यकता आहे. सामान्य जनांच्या कामनापुर्ती आणि आत्मोद्धारासाठी आदिशक्तिने श्री मार्कंडेय मुनीच्या चित्तामध्ये प्रवेश करुन दुर्गा सप्तशति हा ग्रंथ निर्माण करुन घेतला.बल प्राप्तीकरिता महाकाली, विद्या प्राप्तीसाठी महासरस्वती तर धन प्राप्तीकरिता महालक्ष्मीची उपासना जनलोकांमध्ये प्रचलित आहे. ही आदिशक्ती मायेच्या रूपाने आवृत्त झालेली असते.त्याचीच आराधना श्री ब्रह्मदेवाने प्रथम चरित्रात केलेली आपणांस दिसते.

जरी भगवती नित्य आहे तरीही देवतागण निष्प्रभ झाले की, ती देवतांच्या कार्याकरिता प्रकट होते आणि तेजातुन (शक्ती) देवीची उत्पत्ती झाली. ती नामाहून निराळी आहे. महिषासुराचा वध केला म्हणुन तिने महिषासुरमर्दिनी हे नाम धारण केले हे या मध्यम चरित्रातुन दृष्टीपथात येते. तीनही लोकांची आधारभूता असणारी पार्वतीच्या देहातुन प्रकट झालेली आणि असुरांचा संहार करुन आपल्या भक्ताला सर्वश्रेष्ठ मन्वंतराचा अधिपती बनवणाऱ्या शक्तीचा सर्वोत्तम प्रभाव उत्तर चरित्रात दिसतो.

**त्वं वैष्णवी शक्तिरनन्तवीर्या । विश्वस्य बीजं परमासि माया ।।** (दु.स.अ.११/५)

देवी सप्तशति ग्रंथात पाठाच्या पुर्वी कवच अर्गला आणि किलक याचा पाठ करणेही आवश्यक मानले आहे. सप्तशतिच्या संपुर्ण शक्तिला कवचाने बंधिस्त केले आहे. अर्गला अर्थात अगळ पुर्वीच्या काळी मोठ मोठ्या वाड्यांना किंवा किल्यांना दार लावतांना कडी -कोंडा लावल्यावर अगळ लावली जात असे.अगळ म्हणजे मोठा लाकडी खांब. तो दाराला आडवा लावला जात असे. त्यास संस्कृत मध्ये अर्गला असे म्हणतात.कीलक म्हणजे खीळा!

या परम ग्रंथाच्या शक्तिची उकल करताना प्रथम आवरण रुपी कवचाचा पाठ करुन नंतर लावलेली अगळ दुर करुन त्यांनतर मंत्ररुपी खिळे काढल्यावर महाशक्तिच्या कृपेचे महाद्वार उघडता येते.

पाठ आरंभ आणि समाप्ति नंतर नवार्ण मंत्रांचा एक माळ जप करावा. नवार्ण मंत्रात नऊ बीजांचा मिळून तयार झाला आहे. या मालाजपास अक्षमाला असे संबोधन आहे. वर्णमालेत अ पासुन क्ष पर्यंत अक्षर आहेत.हेच जपाद्वारे सिध्द करुन शेवटी ज्ञ ची प्राप्ति होते.पाठ समाप्ति नंतर तीन रहस्य पठण ही आवश्यक आहे. त्यास प्राधानिक (प्राकृतिक वा प्रधान -मुख्य) रहस्य, वैकृतिक रहस्य आणि मुर्ति रहस्य आदि नाम आहेत.

पुराणांची निर्मीती प्रश्नार्थक भावाने झालेली आहे. तत्वविषयक जिज्ञासा उत्पन्न झाली म्हणुनच सनातन धर्मामध्ये वैदिक कालानंतर पुराणांची आवश्यकता भासली. यजुर्वेदातही ४० वा अध्याय हा ईशावास्य उपनिषद आहे. संपूर्ण यजुर्वेदात यज्ञसंस्था, यज्ञीय आचरण इ. विषयाचे मंत्र आहेत. यजुचा अर्थच यज्ञार्थ विज्ञान असा आहे.यत् -गतीशील, ज् - आकाश म्हणजेच **गतीशील चेतना तत्वाने भरलेले आकाश.** त्याच यजुर्वेदाच्या शेवटच्या अध्यायात केवळ १७ श्लोकात संपुर्ण सृष्टी विज्ञान वर्णिलेले आहे. या प्रकारे आदिशक्तीच्या लीलांचे वर्णन वेद कालापासून होत आलेले आहे. त्याचा परमोच्च बिंदु म्हणजे दुर्गा सप्तशति ग्रंथ होय.

# अथ देव्या कवचम्

**विनियोग:-** या चंडीकवचाचे ऋषि ब्रह्माजी असुन व्याकरणाच्या अनुष्टुप नामक छंदामध्ये या कवचाच्या श्लोकांची निर्मिती झाली आहे. चामुंडा देवता या कवचाची अधिष्ठात्री देवी आहे. अंग न्यासोक्त मातर हे बीज असुन दिग्बन्धदेवता तत्व तथा श्री जगदंबा देवीच्या प्रित्यर्थ सप्तशति पाठाच्या अंगभूत कवचाच्या जपाचा विनियोग केला जातो.

**।।ॐ नमश्चण्डिकायै।।**

**मार्कण्डेय उवाच :-**

हे पितामह, या जगतामध्ये परम गोपनीय, सर्व मनुष्यांची सर्वप्रकारे रक्षा करणारे आणि आजपर्यंत आपण कोणालाही न सांगितलेले परम गोपनीय साधन मला सांगा.

**ब्रह्मोवाच :-**

हे महामुनि, असे साधन केवळ देवी कवच हेच आहे, जे गोपनीय मधील परम गोपनीय तसेच संपुर्ण प्राण्यांवर उपकार करणारे आहे. त्याचे श्रवण करावे. देवीच्या नऊ मुर्त्या आहेत, ज्याला नवदुर्गा म्हणतात. त्यांची नावे पुढिल प्रमाणे आहेत. १) शैलपुत्री (हिमालयाच्या तपस्येमुळे प्रसन्न होऊन त्यांची कन्या म्हणून जी प्रगट झाली ती)

२) ब्रह्मचारिणी (ब्रह्म स्वरुपाची प्राप्ति असा जिचा स्वभाव आहे ती)

३) चंद्रघंटा (सौम्य तेज प्रदान करणारा चंद्र जिच्या घंटेमध्ये स्थित आहे ती)

४) कूष्माण्डा (त्रिताप व त्रिगुण जिच्या उदरात स्थित आहेत ती)

५) स्कंदमाता (स्कंदाचा जन्म जिच्या पासून झाला, ती)

६) कात्यायनी ( देव कार्याकरिता महर्षि कात्यायनांच्या आश्रमात त्यांच्या कन्येच्या स्वरुपात प्रगट झाली म्हणून कात्यायनी हे नांव धारण केले)

७) कालरात्रि (सर्वांचा संहार करणारी कालाचाही नाश करणारी म्हणून कालरात्रि)

८) महागौरी (तपस्या करुन महान गौर-गोरा- वर्ण प्राप्त केला आहे अशी ती)

९) सिध्दिदात्री (सर्व सिध्दी अर्थात मोक्ष प्रदान करणारी)

या प्रमाणे नवदुर्गा असा यांचा नांवलौकिक आहे. ही नांवे सर्वज्ञ असणाऱ्या वेदातुन प्रतिपादित झालेली आहेत. जो मनुष्य अग्निच्या तेजाने त्रासला असेल, रणभूमी मध्ये शत्रूंनी ज्याला घेरले असेल, विषम संकटात फसला असेल, किंवा कोणत्याही प्रकारच्या भयाने ग्रासला असेल तो जर भगवती दुर्गेला शरण गेला, तर त्याचे काहीच अमंगल होऊ शकत नाही. युध्द समयास संकटात ही पडला असेल तरीही त्याच्यावर कोणतीही विपत्ती येत नाही. त्याला शोक, दु:ख अथवा भयाची प्राप्ति होत नाही. ज्याने भक्तिपुर्वक देवीचे स्मरण केले असेल त्याचा निश्चितच अभ्युदय होतो. हे देवी, जो नर तुझे चिंतन करतो त्याचे तू निसंदेह रक्षण करतेस.

श्री चामुंडा देवी प्रेतावर आरुढ झालेली आहे. वाराहीचे वाहन रेडा आहे. ऐंद्रीचे वाहन ऐरावत नामक हत्ती असून वैष्णवी गरुडावर विराजमान आहे. माहेश्वरी वृषभावर तर कौमारीचे वाहन मयुर आहे. भगवान विष्णूची प्रिय असणारी लक्ष्मीदेवी कमलासनावर बसलेली असून हातात कमळ धारण केलेले आहे. वृषभारुढ ईश्वरी देवीने श्वेतरुप धारण केले आहे तर ब्राह्मी देवी हंस आसनावर सर्व आभूषणासह विराजमान आहे. याप्रमाणे सर्व मातृशक्ति सर्व प्रकारच्या योगशक्तिने संपन्न असून त्यांनी अनेक अलंकार परिधान केलेले आहेत.

शंख, चक्र, गदा, शक्ति, नांगर, मुसळ, खेटक, तोमर, परशु, त्रिशुल आदि शस्त्र धारण केलेल्या देवी

विविध रथावर बसुन जरी क्रोधाने भरलेल्या दिसत असल्या तरी त्या भक्तांना अभय देणऱ्या, देवतांचे कल्याण करणाऱ्या व दैत्य शक्तिचा नाश करणऱ्या आहेत. कवच आरंभ करण्यापुर्वी यांची प्रार्थना करावी.

महान रौद्ररुप धारण करुन घोर पराक्रम करणारी, महान बल आणि उत्साह असणारी देवी, तूच तर शत्रुंच्या मनात भयवर्धन करीत आमच्या महान भयाचा नाश करुन आमचे रक्षण करतेस! सामान्य नयनाने तुझे दर्शन घेणेही कठीण आहे, तुला नमस्कार असो!

पुर्व दिशेला इंद्राची शक्ति ऐंद्री माझे रक्षण करो. अग्नेय दिशेला अग्निदेवता, दक्षिणेला वाराही, नैऋत्य कोणात खड्गधारिणी (वाराही), पश्चिमेला वरुणाची शक्ति वारुणी माझे रक्षण करो. वायव्येला मृगावर बसणारी देवी, उत्तरेला कौमारी देवी आणि ईशान्येला शूलधारिणी (माहेश्वरी) देवी माझे रक्षण करो. हे ब्रह्माणी तू उर्ध्व दिशेला तर वैष्णवी खालच्या दिशेला माझे रक्षण करो! याप्रकारे शवाला आपले वाहन बनविणारी चामुंडा देवी माझे दश दिशेने रक्षण कर!

जया देवी समोरच्या दिशेने तर विजया देवीने माझ्या मागच्या दिशेने रक्षण करावे. माझ्या डाव्या बाजुचे रक्षण अजिता देवीने तर उजव्या बाजुचे रक्षण अपराजिता देवीने करावे. माझ्या शिखेचे रक्षण उद्योतिनीने तर मस्तकावर विराजमान होऊन मस्तकाचे रक्षण उमा देवीने करावे. माझ्या ललाट प्रदेशाचे रक्षण मालाधरी, भूवयांचे रक्षण यशस्विनी, भूवयांच्या मधील भागाचे (आज्ञा चक्राचे) रक्षण त्रिनेत्रा देवीने, तर नासिकांचे रक्षण यमघंटा देवीने करावे. दोन्ही नेत्रांच्या मध्यभागी शंखिनीने तर कानांचे रक्षण द्वारवासिनी, कपोल प्रदेशाचे रक्षण कालिका देवीने तर कानांच्या मुल भागाचे रक्षण शांकरी देवीने करावे. नासिकांच्या अंतर्भागात सुगंधा देवी, वरील ओठांचे चर्चिका, खालील ओठांचे रक्षण अमृतकला व जीभेचे रक्षण सरस्वती देवीने करावे.

कौमारीने दातांचे तर चंडिकेने कंठाचे, चित्रघंटेने गळ्याचे तर महामायाने टाळू प्रदेशाचे रक्षण करावे. कामाक्षी दाढीचे तर सर्वमंगला माझ्या वाणीचे रक्षण करो. भद्रकालीने मानेचे तर धनुर्धरीने मेरुदंडाचे रक्षण करावे. कंठ प्रदेशाचे रक्षण नीलग्रीवाने तर श्वासनलिकांचे रक्षण नलकूबरीने करावे.खड्गिनीने दोन्ही स्कंदांचे तर, वज्रधारिणीने माझ्या दोन्ही भुजांचे रक्षण करावे. हातांचे रक्षण दण्डिनीने, बोटांचे रक्षण अंबिकाने, नखांचे रक्षण शूलेश्वरीने, तर पोटामध्ये राहून पोटाचे रक्षण कुलेश्वरीने करावे.

महादेवी ने माझ्या स्तनांची रक्षा करावी, तर शोकविनाशिनी देवी ने माझ्या मनाची रक्षा करावी. ललिता देवीने ह्रदयाची तर शूलधारिणीने उदराची रक्षा करावी. नाभीची रक्षा कामिनीने, गुह्यभागाची रक्षा गुह्येश्वरीने, पूतना व कामिकाने लिंगाची तर महिषवाहिनीने माझ्या गुदा प्रदेशाची रक्षा करावी. भगवतीने कटिभागाची व विध्यवासिनीने गुडघ्यांची रक्षा करावी. सर्व कामनांची पुर्तता करणाऱ्या महाबला देवीने माझ्या जंघांचे रक्षण करावे. दोन्ही घोट्यांचे रक्षण नारसिंहीने तर तैजसीदेवीने दोन्ही चरणांच्या पृष्ठभागाची रक्षा करावी. श्रीदेवीने पायांच्या बोटात राहून रक्षा करावी तर तलवासिनीने पायांच्या तळव्यांचे रक्षण करावे.

दंष्ट्राकराली देवीने नखांची तर उर्ध्वकेशिनी देवीने केसांची रक्षा करावी. शरिरातील रोमा-रोमांचे रक्षण कौबेरीने करावे तर त्वचाचे रक्षण वागीश्वरीने करावे. पार्वती देवी ने रक्त, मज्जा, मांस, अस्ति व मेद यांचे रक्षण करावे. आतड्यांचे रक्षण कालरात्रिने, पित्ताचे रक्षण मुकुटेश्वरीने, मुलाधारादि कमलकोषांचे रक्षण पद्मावतीदेवीने, कफामध्ये स्थित होऊन चूडामणि देवीने कफाचे रक्षण करावे.

नखांच्या तेजाचे रक्षण ज्वालामुखीने, जिचा कोणत्याही अस्त्राने भेद होऊ शकणार नाही अशा अभेद्या देवीने माझ्या शरिरातील सर्व सांध्यांचे रक्षण करावे. ब्रह्माणि देवीने वीर्याचे, छत्रेश्वरीने छायाचे धर्मधारिणीने अहंकार, मन, बुध्दिचे रक्षण करावे. हातात वज्र धारण करणऱ्या वज्रहस्ता देवीने माझे प्राण, अपान, व्यान, उदान व समान आदि पाच वायुंचे रक्षण करावे. कल्याणशोभना देवीने माझ्या प्राणांची रक्षा करावी. रस, रुप, गंध, शब्द

व स्पर्श या विषयांचे रक्षण योगिनीदेवीने करावे तर माझ्या सत्वगुण, रजोगुण व तमोगुणांचे रक्षण नारायणी देवीने करावे.

वाराहीने आयुष्याचे, वैष्णवीने धर्माचे, चक्रिणीने यश, किर्ती, लक्ष्मी, धन व विद्या यांचे रक्षण करावे. भगवती इंद्राणीने माझ्या गोत्राचे रक्षण करावे, तर चण्डिकेने पशुंचे रक्षण करावे. महालक्ष्मीने पुत्रांची तर भैरवीने पत्नीची रक्षा करावी. माझ्या पथांचे रक्षण सुपथाने तर मार्गांचे रक्षण क्षेमकरीने करावे. राजदरबारी महालक्ष्मीने तर सर्वव्याप्त विजयादेवीने माझे सर्व भयापासुन रक्षण करावे.

हे देवी, ज्या स्थानाचा उल्लेख कवचात करायचा राहिला असेल ते स्थानही तुझ्याद्वारे सुरक्षित व्हावे कारण तू विजयशालिनी आणि पापनाशिनी आहेस! ज्या मनुष्याला स्वत:चे भले करण्याची इच्छा आहे त्याने कवचाचा पाठ करुनच यात्रा करावी. कवच पाठाद्वारे सुरक्षित मुनुष्य ज्याठिकाणी जाईल त्याला तिथे धनलाभ निश्चित होईल, तसेच त्याच्या कामनांची पुर्तता होऊन विजयाची प्राप्ति होईल. जो ज्या वस्तुचे अभिष्टचिंतन करील तो ते निश्चितच प्राप्त करुन घेईल. तो मनुष्य पृथ्वीवर तुलनारहित महान ऐश्वर्य प्राप्त करुन घेईल. कवचाने सुरक्षित मनुष्य पुर्णत: निर्भय होऊन जातो. युध्दात त्याचा पराजय होत नाही व तो तिन्ही लोकांत पुजनीय होतो.

हे देवी कवच देवतांसाठी ही दुर्लभ आहे. जो प्रतिदिन नियमपुर्वक तीन संध्या समयाला या कवचाचा पाठ करील त्याला दैवी कला प्राप्त होतात व तो तिन्ही लोकात कधीच पराजित होऊ शकत नाही. तसेच तो अपमृत्युच्या भयापासुन मुक्त होऊन शंभराहुन अधिक वर्ष जीवन जगतो. त्याच्या सर्वप्रकारच्या व्याधींचा नाश होतो. त्याच्यावर कोणताही विष प्रयोग सफल होत नाही. या पृथ्वीवर मारण - मोहन आदि जे अभिचारक प्रयोग होतात तसेच या प्रकारच्या सर्व मंत्र-यंत्राचा नाश या कवचाला हृदयात धारण केल्यावर होतो. इतकेच नाही तर पृथ्वीवर फिरणारे ग्रामदेवता, आकाशगामी देव, जलातून प्रकट होणारे गण, उपदेशानेही सिध्द होणारे नीच कोटितील देवता, जन्मत:च प्रकट होणारे देवता, कुलदेवता, कंठमाला, डाकिनी, शाकिनी, अंतरिक्षात विचरण करणाऱ्या अत्यंत बलवान डाकिनी, ग्रह, भूत, पिशाच, यक्ष, गंधर्व, राक्षस, ब्रह्मराक्षस, वेताळ, कूष्मांड आणि भैरव आदि अनिष्ठकारक शक्तिही हृदयात कवच धारण केलेल्या मनुष्याला पाहताच पळ काढतात.( इतका मोठा प्रभाव या कवचाचा आहे.)

कवचाचा पाठ करणाऱ्या मनुष्याला राजाकडुन मान-सन्मान प्राप्त होतो, असे हे कवच मनुष्याच्या तेजाची वृध्दी करणारे आहे. कवचाचा पाठ करणारा मनुष्य आपल्या किर्तीने विभूषीत होऊन भूतलावर आपल्या सुयशाच्या सोबतच त्याची निरंतर वृद्धी होत जाते. जो कोणी प्रथम दुर्गा कवचाचा पाठ करुन सप्तशति ग्रंथाचे वाचन करतो त्याचा वंश वन, पर्वत समुद्रासह पृथ्वी जोपर्यंत टिकुन आहे, तोपर्यंत राहतो. देहाचा अंत झाल्यावरही तो मनुष्य भगवती महामायेच्या प्रसादाने जे देवगणांकरिताही दुर्लभ मानले जाते, त्या नित्य परम पदाला प्राप्त होतो. पाठ करणारा मनुष्य दिव्यरुप धारण करुन कल्याणकारी शिवाच्या सोबत आनंदलोकाचा भागीदार बनतो.

।। हरि ॐ।।

# अथ अर्गला स्तोत्रम्

**।। विनियोग:।।**

या अर्गला स्तोत्रमंत्राचे ऋषि विष्णुजी असुन व्याकरणाच्या अनुष्टुप नामक छंदामध्ये या श्लोकांची निर्मिती झाली आहे. श्री महालक्ष्मी देवता या स्तोत्रमंत्राची अधिष्ठात्री देवी आहे. श्री जगदंबा देवीच्या प्रित्यर्थ सप्तशति पाठाच्या अंगभूत अर्गला स्तोत्राच्या जपाचा विनियोग केला जातो.

**।।ॐ नमश्चण्डिकायै।।**

**मार्कण्डेय उवाच :-**

जयंती (सर्वश्रेष्ठ विजय प्रदान करणारी), मंगला (भक्तांना जन्ममृत्यूच्या संसार बंधनातुन मुक्त करुन मंगलकारी मोक्ष प्रदान करणारी), काली (प्रलयकालात संपुर्ण सृष्टीला आपला घास बनवणारी), भद्रकाली (आपल्या भक्तांचे भद्र अर्थात कल्याण करणारी व पवित्रता धारण करणारी), कपालिनी ( हातात कपाल म्हणजेच मस्तक धारण करणारी), दुर्गा (दुर्गम दु:खाचा नाश करुन दुर्गति नष्ट करणारी, उत्तम गति प्रदान करणारी), क्षमा (संपुर्ण जगताची जननी असल्याने अत्यंत करुणामय स्वभावामुळे भक्तांच्या सर्व अपराधांना क्षमा करणारी), शिवा (शिवाची पत्नि, सर्वांचे शिव-कल्याण व्हावे अशी निरंतर कामना करणारी), धात्री (संपुर्ण जगताला धारण करणारी), स्वाहा (स्वाहा रुपाने अग्निची पत्नि बनुन यज्ञभागातील आहुती ग्रहण करुन देवतांचे पोषण करणारी), स्वधा (अग्निची पत्नि बनुन स्वधा रुपात श्राद्ध व तर्पणाचा स्विकार करत पितरांचे पोषण करणारी)या नांवाने प्रसिद्ध असणाऱ्या जगदंबिके, तुला माझा नमस्कार असो! हे देवी चामुंडे तुझा जयजयकार असो! संपुर्ण जगताचा त्रिताप हरन करणारी देवी तुझा विजय असो! सर्वात व्याप्त राहणारी कालरात्रि देवी तुझा जय जयकार असो!

मधु -कैटभ या असुरांना मारणारी व ब्रह्माजींना वरदान देणारी देवी तुला नमस्कार असो! तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

महिषासुराचा नाश करणारी तसेच भक्तांना सुख प्रदान करणारी देवी तुला नमस्कार असो! तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

रक्तबीजाचा वध करणारी व चंड-मुंडांचा विनाश करणारी देवी तुला नमस्कार असो! तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

शुंभ आणि निशुंभ तसेच धुम्रलोचनाचे मर्दन करणारी देवी तुला नमस्कार असो! तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

सर्व जगताद्वारे वंदन केली जाणारी व संपुर्ण सौभाग्य देणारी देवी तुला नमस्कार असो! तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

हे माते, तुझे रुप व चरित्र अचिंत्य आहे. समस्त शत्रुंचा नाश करणारी देवी तुला नमस्कार असो! तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

पापांपासुन आमचे रक्षण करणारी व जे भक्तिपुर्वक तुझ्या चरणांशी नतमस्तक होतात त्यांच्यावर कृपा करणारी देवी तुला नमस्कार असो! तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश - ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

रोगांचा नाश करणारी हे चंडिकेदेवी, जे भक्तिपुर्वक तुझी स्तुति करतात, त्यांना तु रुप-आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

हे चंडिके, जे कोणी नरनारी भक्तिपुर्वक तुझी पुजा करतात, त्यांना तू रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

हे माते, मला सौभाग्य दे, अरोग्य दे, परम सुख प्रदान कर, तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

जे माझ्याबद्दल द्वेष भाव ठेवतात, त्यांचा नाश (त्यांच्या द्वेषवृत्तिचा नाश) आणि माझ्या बलाची वृद्धी कर! हे देवी, तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

हे देवी तू माझे कल्याण कर! तू मला उत्तम संपत्ती प्रदान कर! तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

हे अंबिके, देवता व असूर दोघेही आपल्या मुकुटावरील मणी तुझ्या चरणावर घासतात! तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

हे देवी, तु आपल्या भक्तांना विद्वान, यशस्वी व लक्ष्मीवान बनव. तसेच तू  रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

प्रचंड दैत्यांच्या दर्पाचा (घमेंड - अहंकार) नाश करणारी हे चंडिका देवी, तू शरणागताला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

चतुर्मुख ब्रह्माने ज्या देवीची प्रशंसा केली, त्या चार भुजा धारिणी देवी तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

हे देवी, भगवान विष्णु नित्य - निरंतर भक्तिपूर्वक तुझी स्तुती करत असतात. तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

हिमालय कन्या पार्वतीचा पती महादेवाद्वारे नित्य प्रशंसीत परमेश्वरी! तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

इंद्राणीचा पति असणारा देवराज इन्द्राद्वारा सद्भावाने पुजल्या जाणाऱ्या परमेश्वरी! तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

प्रचंड भुजा - दंड असणाऱ्या दैत्यांचा अहंकार नष्ट करणारी हे देवी! तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

हे देवी अंबिके,तू आपल्या भक्तजनांना नित्य आनंद प्रदान करणारी आहेस. देवी तू मला रुप- आत्मरुपाचे ज्ञान- दे, जय - मोहादि षड्रिपुंवर विजय-दे, यश -ज्ञानप्राप्तिरुप यश- दे, व कामक्रोधादि शत्रुंचा नाश कर!

मनाच्या इच्छा अनुसार अनुकरण करणारी, उत्तम कुलात उत्पन्न झालेली मनोहर पत्नी प्रदान कर, जी दुर्गम असणाऱ्या या संसार सागरातुन परिवाराला पार करणारी ठरावी.

जो मनुष्य या स्तोत्राचा पाठ करुन सप्तशतिरुपी महान स्तोत्राचा पाठ करतो, त्याला अनेक ऐश्वर्याचा उपभोग घेता येतो व सप्तशति जप संख्येच्या द्वारे त्यास उचित फळ प्राप्त होते!

# अथ कीलकम्

**।। विनियोग:।।**

या किलक मंत्राचे ऋषि शिवजी असुन व्याकरणाच्या अनुष्टुप नामक छंदामध्ये या श्लोकांची निर्मिती झाली आहे. श्री महासरस्वती देवता या कीलकाची अधिष्ठात्री देवी आहे. श्री जगदंबा देवीच्या प्रित्यर्थ सप्तशति पाठाच्या अंगभूत कीलक मंत्राच्या जपाचा विनियोग केला जातो.

**।।ॐ नमश्चण्डिकायै।।**

**मार्कंडेय उवाच :-**

विशुध्द ज्ञान हेच ज्यांचे शरीर आहे, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद हे तीन वेद ज्यांचे तीन नेत्र आहेत, ज्याने जगत् कल्याणाच्या हेतुने आपल्या मस्तकावर अर्धचंद्र मुकुटाप्रमाणे धारण केला आहे अशा शिवाला माझा नमस्कार असो! मंत्रांचे जे अभिकीलकआहे अर्थात मंत्रसिद्धी मध्ये बाधा उत्पन्न करणाऱ्या शापरुपी कीलकाचा जे निवारण करणारा आहे त्या सप्तशति स्तोत्राला संपुर्ण जाणणे आवश्यक आहे. तसेच ते जाणून त्याची उपासना केली पाहिजे. सप्तशति मंत्राच्या व्यतिरिक्त इतर मंत्राचा जप जो करतो त्याचे ही कल्याणच होते. त्याचेही उच्चाटन (मोह मायादि पासुन स्वत:ला दुर करणे किंवा विरक्त होणे) आदि कर्म सिद्ध होतात व त्याला ही समस्त दुर्लभ वस्तुंची प्राप्ति होते, मात्र जो भक्त अन्य मंत्रांचा जप न करता केवळ सप्तशति नामक स्तोत्राने आदिशक्तिची स्तुति करतो त्याला केवळ स्तुतिनेही सच्चिदानंदस्वरुपिणी देवी सिद्ध (प्रसन्न) होते.

देवी भक्तांना आपल्या मनोवांछित कामनांच्या पुर्तीकरीता मंत्र, औषधी किंवा अन्य साधनांच्या उपयोगाची आवश्यकता नाही. जपाच्या व्यतिरिक्तही त्यांचे उच्चाटन आदि समस्त अभिचारक कार्य सिद्ध होतात. (अर्थात देवीच्या महत् कृपेने साक्षात सिद्धीही प्राप्त होते तर मोह माया आदि पासुन मुक्तीची कामना करणारे गौण कार्य का सिद्ध होणार नाहीत, या उद्देशाने उच्चाटन आणि अभिचारक आदि शब्द या ठिकाणी वापरले आहेत.) एवढेच नाही तर त्यांचे अभिष्टही सिद्ध होतात.

लोकांच्या मनात शंका होती की, जर सप्तशतिची उपासना न करता ही इतर मंत्रांची उपासना करुन समान रुपात कार्य सिध्द होतात तर मग इतर मंत्र व सप्तशति ग्रंथ यात श्रेष्ठ साधन कोणते..? भक्तांच्या या शंकांना समोर ठेऊन भगवान शंकराने आपल्या जवळ आलेल्या जिज्ञासुंना समजावले कीं, हा सप्तशति नामक संपुर्ण स्तोत्र स्वरुपातील ग्रंथ हेच सर्व सिद्धी करिता कल्याणकारी साधन आहे. त्यानंतर भगवान शंकराने सप्तशति नामक महान स्तोत्राला गुप्त केले. सप्तशति पाठातून जे पुण्य प्राप्त होते त्याचा कधीच क्षय होत नाही. ते चिरंतन पुण्य असते. मात्र अन्य मंत्राच्या जपाचे पुण्य हे संपणारे असते. केवळ याच कारणाने साक्षात शिवाने अन्य मंत्रापेक्षाही सप्तशतिच्या श्रेष्ठतेचा निर्णय घेतला हे जाणणे अवश्यक आहे. अन्य मंत्रांचा जप करणारा पुरुष जर सप्तशति स्तोत्राचे अनुष्ठान करु लागला तर त्याचे पुर्ण कल्याणच होते यात किंचितही संदेह नाही.

जो साधक कृष्ण पक्षाच्या अष्टमी किंवा चतुर्दशीला एकाग्रचित्त होऊन भगवतीच्या सेवेत आपले सर्वस्व धन-द्रव्य नैवेद्याप्रमाणे अर्पण करतो व भगवतीच्या प्रसाद स्वरुपात त्याला पवित्र कार्याकरिता ग्रहण करतो त्याला देवीची प्रसन्नता प्राप्त होते अन्यथा नाही. (यालाच दानप्रतिग्रह करणं असे बोलतात. सर्वस्व देवीला अर्पण करुन त्यातील काही भाग देवीचा प्रसाद समजुन त्याचा विनियोग धर्मोचित कार्यात करणे)

याप्रकारे सिद्धीच्या भावनेने चुकीच्या मार्गाने कोणी उपासना करु नये म्हणून तसेच सिद्धीद्वारा मिळणाऱ्या अनेक शक्तिंचा चुकीचा वापर टाळण्याकरीता भगवान शंकराने सप्तशति या महान स्तोत्राला किलीत (खीळा

मारणे-बंदिस्त करुन ठेवणे) करुन ठेवले आहे. जो भक्त अत्यंत भक्तिपुर्वक रितिरिवाजाने (नियमानुसार) निष्कीलन विधी करुन सप्तशति स्तोत्राचा प्रतिदिन स्पष्ट उच्चारपुर्वक पाठ करतो तो भक्त सिद्ध होऊन जातो. तोच देवीचा प्रिय गण होतो आणि मनुष्य लोकात जन्म घेऊनही त्याला गंधर्व पदही प्राप्त होते. सर्वत्र भ्रमण करुनही त्याला संसारात कोणतेही भय राहत नाही, त्याला अपमृत्यूची बाधाही होत नाही. तसेच देहाचा त्याग केल्यावर त्याला अनंत मोक्षाचाही लाभ होतो. देवी सप्तशति या महान ग्रंथाचे पठण करताना त्यातील कीलक (गुह्य गोष्ट जी गुप्त करुन ठेवली आहे असे अनेक मंत्र या महान स्तोत्रात आहेत) त्याचा अर्थ जाणून त्याचा परिहार करुन या पाठाचा आरंभ करावा. कीलन व निष्कीलन याचे ज्ञान प्राप्त करुन त्याप्रमाणे विधी करुन जो पाठ करतो त्यालाच निर्दोष स्तोत्र पाठाचा लाभ होतो. स्त्रियांमध्ये जे पवित्र सौभाग्यगुण नजरेस येतात ते सर्व महादेवीच्या प्रसादाचेच फल आहेत. याकरिता या कल्याणकारी स्तोत्राचा प्रेमपुर्वक प्रतीदिन जप केला पाहिजे.

या स्तोत्राचा मंद स्वराने पाठ केल्यास स्वल्प फळाची प्राप्ति होते आणि उच्च स्वराने पाठ केल्यास पुर्ण फलाची प्राप्ति होते याकरिता सप्तशति ग्रंथाचा उच्च स्वरातच पाठ करावा. सप्तशति पाठाच्या प्रसादाने ऐश्वर्य, सौभाग्य, अरोग्य, संपत्ति, शत्रुनाश(रिपुनाश), तसेच परम मोक्षाची सिद्धी होत असतानाही त्या परम कल्याणकारी जगदम्बेची स्तुती मनुष्य का नाही करीत..?

# अथ तंत्रोक्त रात्रीसुक्तम्

या विश्वाची आधीश्वरी, जगताला धारण करणारी, संसाराचे पालन तसेच संहार करणारी, तेजरुप भगवान विष्णुची अनुपम शक्ति आहे, त्याच भगवती निद्रा देवीची भगवान ब्रह्मा स्तुती करु लागले.

**ब्रह्मोवाच :-**

हे देवी, तूच स्वाहा, तूच स्वधा आणि तूच वषट्कार आहेस. स्वर ही तूझेच स्वरुप आहेत. तूच जीवन प्रदान करणारी सुधा आहेस. नित्य अक्षर प्रणवात (ॐ)अकार, उकार, मकार, या तीन मात्रांच्या रुपात तूच स्थित आहेस. या तीन मात्रांच्या व्यतिरिक्त जी बिन्दुरुप नित्य अर्धमात्रा आहे, जिचे विशेषरुपात उच्चारण होत नाही, ती अर्धमात्रा ही तुच आहेस. हे देवी, तुच संध्या-सावित्री तथा परम जननी आहेस. देवी, तुच या विश्व ब्रह्मांडाला धारण करतेस, तुझ्यापासुनच जगताची सृष्टि होते, तुझ्यामुळेच या सृष्टीचे पालन होते आणि कल्पाच्या अंती तुच सर्वांना आपला ग्रास बनवतेस.

हे जगन्मयी देवी ! या जगताच्या उत्पत्ती समयाला तू सृष्टिरुपा स्वरुपात असते, पालण-काळात तू स्थितिरुपा असते, आणि कल्पांच्या अंताला संहार धारण करणारी असते. तुच महाविद्या, महामाया, महामेधा, महास्मृति, महामोहरुपा, महादेवी आणि महासुरी आहेस. तुच तीन गुणांना उत्पन्न करणारी आदिप्रकृती आहेस. भयंकर कालरात्रि (ब्रह्मदेवाच्या कल्पाच्या नंतर समान काळ येणारी महान रात्र-निद्रा स्थिति), महारात्रि आणि मोहरात्रि ही तुच आहेस. तुच श्री, तू ईश्वरी, तुच ह्रीं, तुच बोधस्वरुपा बुध्दी आहेस. लज्जा, पुष्टि, तुष्टि, शांति,आणि क्षमाही तुच आहेस.

तुच खड्‌गधारिणी, शूलधारिणी, घोररुपा, तसेच गदा, चक्र, शंख आणि धनुष धारण करणारी आहेस. बाण, भुशुण्डी आणि परिघ हे तुझेच अस्त्रं आहेत. तुच सौम्य आणि सौम्यतर आहेस. एवढेच नाही जितके ही सौम्य आणि सुंदर पदार्थ आहेत त्या सर्वांच्याही पेक्षा तू अधिक सुंदर आहेस. पर आणि अपर या सर्वांच्याही वर असणारी तू परमेश्वरी आहेस.

हे सर्वेश्वरी देवी, कुठेही सत् असत् ज्या काही वस्तु आहेत आणि त्या सर्वांची जी शक्ति आहे ती तुच आहेस. या अवस्थेत तुझी स्तुती काय होऊ शकते..? जे या जगताचे सृष्टि, पालन आणि संहार करणारे आहेत त्या देवालाही जर तू निद्रेच्या आधिन करु शकतेस तर तुझी स्तुती करण्यास कोण समर्थ असु शकते..? मला (ब्रह्मा), भगवान शंकराला आणि भगवान विष्णुला सुद्धा तुच शरीर धारण करण्यास उद्युक्त करतेस तर तुझी स्तुती करण्याची शक्ति कोणात आहे..?

# अध्याय पहिला

**-: अध्याय विषय :-**

या अध्यायामध्ये सुमेधा ऋषीने राजा सुरथ आणि समाधी यांना देवी भगवतीचा महिमा सांगितला आणि मधु व कैटभ या दोन राक्षसांचा संहार देवी कृपेने भगवान विष्णुने केला याचे वर्णन आले आहे.

**।। विनियोग:।।**

प्रथम अध्यायाला प्रथम चरित्र असे बोलतात. या प्रथम चरित्राचे ऋषि ब्रह्माजी असुन श्री महाकाली या चरित्राची अधिष्ठात्री देवता असुन व्याकरणाच्या गायत्री नामक छंदामध्ये या अध्यायाच्या श्लोकांची निर्मिती झाली आहे. महादेवीची नंदा नामक शक्ति या चरित्राची रक्षणकर्ती देवता आहे. रक्तदंतिका हे चरित्राचे बीज असुन अग्नि हे तत्व आहे तथा ऋगवेदाप्रमाणे पवित्र असे हे चरित्र आहे. अर्थात ऋग्वेद स्वरुप आहे. श्रीमहाकाली देवीच्या प्रसन्नतेकरिता प्रथम चरित्राच्या जपाचा विनियोग केला जातो.

**।।ध्यानम् ।।**

भगवान विष्णु क्षीरसागरात चीर निद्रा घेत असताना मधु आणि कैटभ या राक्षसांचा वध करण्याकरिता कमलातून उत्पन्न झालेल्या ब्रह्माजी ने ज्या महाकालीचे स्तवन केले त्या परम महादेवीचे मी ध्यान करतो. तिने आपल्या दश भूजात खड्ग, चक्र, गदा, बाण, धनुष, परिघ, शूल, भुशुण्डी, मस्तक आणि शंख धारण केलेले आहेत. ती त्रिनेत्रधारी असुन संपुर्ण देहावर अनेक दिव्य अभूषण परिधान केलेले आहेत. महाकालीच्या शरीराची कांती ही निलमण्याप्रमाणे प्रकाशमान असून ती दहा मुख आणि दहा पाय असणारी आहे.

**।। ॐ नमश्चण्डिकायै ।।**

**मार्कण्डेय उवाच ।।**

सुर्यपुत्र सावर्णि जे भविष्यातील आठवे मनु समजले जातात त्यांच्या उत्पत्तीची कथा विस्तारपूर्वक सांगतो. सुर्य देवाचे (आणि छाया संज्ञाचे) सुपुत्र महाभाग सावर्णि भगवतीच्या अनुग्रहाने ज्याप्रकारे आठव्या मन्वंतराचे स्वामी झाले त्या प्रसंगाचे वर्णन करतो. फार पुर्वीची गोष्ट आहे. स्वारोचिष या द्वितिय मन्वंतरात सुरथ नामक एक महान राजा होते ज्यांची उत्पत्ती चैत्रवंशात झाली होती. त्यांचे राज्य समस्त भूमंडलावर विस्तारले होते. ते आपल्या प्रजेचे पालनपोषण औरस (सख्या) पुत्राप्रमाणे करत होते. काही काळानंतर कोलाविध्वंसी (हे विषेश घराण्याचे क्षत्रिय कुल आहे. दक्षिण भागात कोला नामक नगरी आहे जी प्राचीन काळात राजधानी होती. ज्या क्षत्रिय कुळाने आक्रमण करुन त्या नगरीचा विध्वंस केला त्या कुळाला पुढे कोलाध्वंसी ही राजसंज्ञा प्राप्त झाली.) नामक राजघराणे त्यांचे शत्रु बनले. राजा सुरथ याची दंडनिती प्रबळ होती. त्यांचा शत्रु सोबत संग्राम झाला. जरी कोलाविध्वंसी संख्यामध्ये कमी होते तरीही सुरथ राजाला युद्धात त्यांच्याकडुन हार पत्कारावी लागली. त्यावेळी ते युद्धभूमीतुन आपल्या नगरात परत आले आणि संपुर्ण पृथ्वीवर त्यांचा अधिकार न राहता ते केवळ एका देशाचे राजा बनून राज्य करु लागले. मात्र तिथेही त्याच्या प्रबळ शत्रुने त्यांच्यावर आक्रमण केले. राजाचे बळ क्षीण होत चालले होते, त्यामुळे त्यांच्या बलवान मात्र दृष्ट व दुरात्मा मंत्र्यांनी त्यांच्या राजधानीतील राजकीय सेना व राजद्रव्याचा अपहार केला. थोड्याच काळात त्या राज्यातूनही सुरथ राजाचा प्रभाव नष्ट होऊ लागला म्हणून ते शिकार करण्याच्या बहान्याने घोड्यावर स्वारी करुन एकटेच दाट जंगलात गेले. त्या ठिकाणी त्यांनी विप्रवर श्रीसुमेधा मुनीचा आश्रम पाहिला. त्या आश्रम परिसरात अनेक हिंस्त्र प्राणी आपली स्वाभाविक हिंसावृत्ति सोडुन परम शांतिभावाने एकत्र नांदत होते. मुनीचे अनेक शिष्य त्या वनाची शोभा वाढवत होते. त्या आश्रमात गेल्यावर मुनीने त्यांचा यथोचित सत्कार केला. राजा सुरथ मुनिश्रेष्ठ सुमेधाच्या आश्रमात काही काळ निवास करुन राहिले.

ममतेने आकृष्टचित्त होऊन ते त्या आश्रम परिसरात चिंताक्रांत झाले. पूर्वकाळात माझ्या पुर्वजांनी ज्या नगराचे पालन केले तेच नगर आज माझ्यापासुन हिरावले गेले. काय माहिती की, माझे दुराचारी सेवक त्या नगराचे रक्षण धर्मपूर्वक करत असतील की नाही..? जो नियमीत मदाची वर्षा करणारा आणि माझा अत्यंत प्रिय व शुर हत्ती आता शत्रुंच्या आधिन होऊन कोणत्या यातना सहन करत असणार..? जे लोक माझी कृपा, धन आणि भोजनाच्या प्राप्तिमुळे निरंतर माझ्या मागे मागे चालत होते ते निश्चितच आता दुसऱ्या राजांचे अनुकरण करत असणार! त्या अपव्ययी (खर्चिक वृत्तिच्या) लोकांमुळे मी अत्यंत कष्टाने अर्जित केलेले धन नष्ट होऊन जाईल. या प्रकारे अनेक प्रकारचे विचार राजा सुरथच्या मनात येत होते.

अशाच प्रकारे त्या आश्रमात निवास करताना एक दिवस त्यांनी सुमेधा ऋषिच्या आश्रमाच्या निकट येणाऱ्या एका वैशाला पाहुन प्रश्न विचारला, आपण कोण आहात..? आपले येथे येण्याचे कारण काय..? आपण शोकग्रस्त का दिसत आहात..? सुरथ राजाचे हे प्रेमपूर्वक वचन ऐकुण वैश्याने विनम्रतापुर्वक प्रणाम करुन उत्तर दिले.

**वैश्य उवाच :-**

हे राजन, मी धनिक लोकांच्या कुळात जन्म घेतलेला एक वैश्य असुन माझे नाव समाधि असे आहे. माझ्या दुष्ट स्त्री-पुत्रांनी धनाच्या लोभाने मला घरातून बाहेर हाकलून दिले. मी या समयाला धन, पुत्र आणि स्त्री यापासुन वंचित आहे. माझ्या विश्वसनिय बंधूंनी माझे धन घेऊन मलाच दूर केले. त्यामुळे दु:खी होऊन मी वनात निघुन आलो आहे. याठिकाणी राहून मला हे समजत नाहिये की, माझे पुत्र, स्त्री आणि स्वजन या समयाला कुशल आहेत की त्यांना कोणत्या संकटाचा सामना करावा लागतो आहे..? माझे पुत्र आता सदाचारी आहेत की दुराचारी झाले..?

**राजोवाच :-**

ज्या लोभी स्त्री, पुत्र, स्वजनांनी धनाच्या लोभाने तुला घरातून बाहेर काढून दिले त्यांच्या विषयी तुझ्या मनात इतका स्नेह व ममता कशी आहे..?

**वैश्य उवाच :-**

आपण माझ्याबद्दल जे बोलत आहात ते सर्व ठीक आहे, मात्र मी काय करु, माझ्या मनात त्यांच्या बद्दल निष्ठूरता उत्पन्नच होत नाहिये. ज्यांनी धनाच्या लोभाने पित्याच्या प्रति स्नेह, पतिच्या प्रति प्रेम आणि नातलगाविषयी अनुरागाला तिलांजली देऊन मला घरातून बाहेर काढले, त्यांच्या विषयी माझ्या मनात स्नेह भावनाच आहे. हे राजन, गुणहीन बंधूंच्या बद्दल माझे चित्त याप्रकारे प्रेममग्न होत आहे हे काय आहे..? या भावनेला मी जाणून सुद्धा समजुन घेऊ शकत नाहीये. त्यांच्यासाठी माझे मन व्याकूळ झाले आहे, आणि ह्रदय अत्यंत दु:खित झाले आहे. त्या माझ्या बांधवांमध्ये माझ्याविषयी प्रेमाचा सर्वथा अभाव आहे तरिही त्यांच्याबद्दल माझे चित्त निष्ठूर होत नाहिये. या करिता मी काय करु शकतो..?

**मार्कण्डेय उवाच :-**

ब्रह्मण, त्यानंतर राजामध्ये श्रेष्ठ सुरथ आणि समाधी नामक वैश्य दोघेही सोबतच मेधा मुनिच्या सेवेत उपस्थित झाले, आणि त्यांच्या सोबत यथायोग्य न्याय अनुकुल विनयपुर्वक आचरण करत त्यांनी वार्तालाप आरंभ केला.

**राजोवाच :-**

हे मुनीवर, मी आपणास एक गोष्ट विचारु ईच्छितो त्याबद्दल कथन करावे. माझे चित्त स्वत:च्या अधीन नसल्याने एक गोष्ट माझ्या मनाला खुप दु:ख देते, माझे जे राज्य माझ्या हातातून निघुन त्या राज्याप्रती आजही

माझी ममता नष्ट झालेली नाही. हेही माहिती आहे की ते राज्य आज माझे नाही तरीही अज्ञानी पणाने मला त्यामुळे दु:ख होत आहे. आणि हा वैश्यही घरातून अपमानित होऊन आला आहे, याचे पुत्र, बंधु आणि पत्नीने त्याचा धन लोभाने त्याग केला आहे. तरीही त्याच्या मनात त्यांच्या विषयी अत्यंत स्नेह दिसुन येत आहे. याप्रकारे मी आणि हा वैश्य दोघेही दु:खी आहोत. ज्यामध्ये प्रत्यक्ष दोष नजरेत येत आहे त्या विषयाबाबत आमच्या मनात ममताजनीत आकर्षण उत्पन्न होत आहे. हे महामुनि, आम्ही दोघे ही समजदार आहोत, तरीही आमच्या मनात हा मोह उत्पन्न झाला आहे, हे काय आहे..? विवेकशून्य पुरुषाप्रमाणे आमच्या मनातील ही मूढता प्रत्यक्ष दिसुन येत आहे.

**ऋषिरुवाच:-**

हे महाभाग! विषयमार्गाचे ज्ञान तर सर्वच जीवांना असते. याप्रमाणे विषयही सर्वांकरिता वेगवेगळा असु शकतो. काही प्राणी दिवसा पाहू शकत नाहीत तर काही प्राणी रात्री पाहू शकत नाहीत. काही जीव असे आहेत की ते दिवस रात्र पाहू शकतात. हे तर योग्यच आहे मनुष्य समजदार मानला गेला आहे, पण केवळ मनुष्यच समजदार आहे असे नाही. पशु -पक्षी, मृग आदि प्राणी ही समजदार आहेत. मनुष्याची समज पण तशीच आहे जी सर्व प्राण्यात आहे. तसेच अन्य गोष्टीही मनुष्य आणि प्राणी यात समान आहेत. समझ असुनही या पक्षांना बघा, स्वत: भूकेने व्याकूळ झालेले असुनही मोहित होऊन आपल्या पिलांच्या चोचित अन्नाचे कण भरत आहेत. हे राजन, तू तर पाहिलेच असेल की, मनुष्यही समजदार असुन सुद्धा मोहाने मोहित होऊन आपल्या उपकारांचा मोबदला म्हणून आपल्या पुत्रांद्वारे अभिलाषा ठेवतो. जरी सर्वात समज कमी नाहीये तरीही जगताची उत्पत्ति-स्थिती-लय आदि परंपरा कायम ठेवण्यासाठी भगवती महामायेच्या प्रभावाने ममतामय गर्तेत खोलवर बुडविले जातात. त्यामुळे यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. जगदीश्वर भगवान विष्णूची योगनिद्रारुपी भगवती महामायाच्या प्रभावाने सर्व जग मोहित आहे. हीच भगवती महामाया देवी ज्ञानी जनांच्या चित्तालाही बलपूर्वक खेचुन मोहात पाडते. तीच देवी संपूर्ण चराचर जगताची उत्पत्ती करणारी, तसेच प्रसन्न होताच मनुष्यांना मुक्तिकरिता वरदान देणारी आहे. ही महामायाच पराविद्या संसारबंधन आणि मोक्षाची इच्छा पुर्ण करणारी सनातनीदेवी सर्व ईश्वराची अधीश्वरी आहे.

**राजोवाच:-**

हे मुनिवर! ज्या देवीला आपण महामाया बोलता ती देवी कोण आहे..? तिचे प्रकटीकरण कसे झाले..? तसेच तीचे चरित्र कोणकोणते आहेत..? हे ब्रह्मवेत्ता मध्ये श्रेष्ठ मुनिवर, त्या भगवतीचा जो प्रभाव आहे, जे स्वरुप आहे, ज्या प्रकारे ती प्रकट झाली, हे सर्व आपल्या मुखातुन ऐकण्याची माझी इच्छा आहे.

**ऋषिरुवाच :-**

हे राजन! वास्तवात ती देवी नित्य स्वरुपातच आहे. संपूर्ण दृष्य-अदृष्य जगत -ब्रह्मांड तिचेच रुप आहे तसेच तिनेच सर्व विश्वाला व्याप्त केले आहे तथापि तिचे प्रकटीकरण विविधप्रकारे होत असते. ते श्रवण करावे. जरी ती नित्य आणि अजन्मा आहे, तरिही ती प्रसंगी देवतांचे कार्य सिद्ध करण्याकरिता प्रकट होते. त्यावेळी ती उत्पन्न झाली असे म्हटले जाते.

कल्पाच्या अंतामध्ये ( अर्थात ब्रह्म देवाचा दिवस संपून रात्र सुरु झाली असता)संपूर्ण ब्रह्मांड एकार्णवात निमग्न झाले होते, आणि भगवान महाविष्णू शेषनागाच्या शय्येवर योगनिद्रा घेत क्षीरसागरात पहुडले होते, तेव्हा श्रीविष्णुच्या कानातील मळापासून दोन भयंकर असूर उत्पन्न झाले जे मधु आणि कैटभ या नावाने विख्यात झाले. (महासागरात हे राक्षस सर्वत्र संचार करु लागले. आपल्या उत्पत्तीचे कारण शोधू लागले मात्र त्या विस्तीर्ण क्षीरसागराचा त्यांना अंत कोठेही दिसला नाही. त्यावेळी त्यांनी विचार केला की कोणती तरी दिव्य शक्ति या जलाला धारण करुन आहे. त्यावेळी आकाशात “ऐं” हे बीज त्याच्या कानावर पडले आणि त्यांनी ते बीज धारण करुन एक हजार वर्षपर्यत कठोर तपस्या केली. त्या तपस्येने प्रसन्न होऊन देवीने आकाशवाणी ने त्यांना वर

मागण्यास सांगितले, त्यावेळी दानव म्हणाले की, आमचा मृत्यु आमच्याच ईच्छेने व्हावा. हेच वरदान आपण आम्हाला द्यावे. त्यावेळी आकाशवाणीने देवीने वचन दिले की, हे दानवगण आपणांस आपल्या इच्छेनेच मृत्यु प्राप्त होईल, आणि कोणीही दानव, देवता तुम्हाला पराजीत करु शकणार नाही. भगवतीद्वारे वर प्राप्त झाल्यावर दानव उन्मत्त होऊन सागरात विहार करु लागले. (देवी भागवत-प्रथम स्कंद अ.क्र.६ )

काही काळानंतर त्यांची दृष्टी विष्णूच्या नाभीतून उमललेल्या कमलासनावर बसलेल्या ब्रह्मदेवावर गेली. ते ब्रह्मदेवाचा वध करण्यास तयार झाले. ज्यावेळी ब्रह्मदेवाने त्या दोन राक्षसांना आपल्याकडे आलेले पाहिले तेव्हा त्यांनी भगवान विष्णुकडे धाव घेतली. भगवान विष्णुला त्यांनी योग निद्रामध्ये निमग्न पाहिले तेव्हा त्यांनी एकाग्रचित्त होऊन भगवान विष्णुला जागे करण्याकरिता त्यांच्या नेत्रकमलात निवास करणाऱ्या योगनिद्रेचे स्तवन करण्यास आरंभ केला. जी या विश्वाची आधीश्वरी, जगताला धारण करणारी, संसाराचे पालन तसेच संहार करणारी, तेजरुप भगवान विष्णुची अनुपम शक्ति आहे, त्याच भगवती निद्रा देवीची भगवान ब्रह्मा स्तुती करु लागले.

**ब्रह्मोवाच :-**

हे देवी, तूच स्वाहा, तूच स्वधा आणि तूच वषट्कार आहेस. स्वर ही तूझेच स्वरुप आहेत. तूच जीवन प्रदान करणारी सुधा आहेस. नित्य अक्षर प्रणवात (ॐ)अकार, उकार, मकार, या तीन मात्रांच्या रुपात तूच स्थित आहेस. या तीन मात्रांच्या व्यतिरिक्त जी बिन्दुरुप नित्य अर्धमात्रा आहे, जिचे विशेषरुपात उच्चारण होत नाही, ती अर्धमात्रा ही तुच आहेस. हे देवी, तुच संध्या-सावित्री तथा परम जननी आहेस. देवी, तुच या विश्व ब्रह्मांडाला धारण करतेस, तुझ्यापासुनच जगताची सृष्टि होते, तुझ्यामुळेच या सृष्टीचे पालन होते आणि कल्पाच्या अंती तुच सर्वांना आपला ग्रास बनवतेस.

हे जगन्मयी देवी! या जगताच्या उत्पत्ती समयाला तू सृष्टिरुपा स्वरुपात असते, पालण-काळात तू स्थितिरुपा असते, आणि कल्पांच्या अंताला संहार धारण करणारी असते. तुच महाविद्या, महामाया, महामेधा, महास्मृति, महामोहरुपा, महादेवी आणि महासुरी आहेस. तुच तीन गुणांना उत्पन्न करणारी आदिप्रकृती आहेस. भयंकर कालरात्रि (ब्रह्मदेवाच्या कल्पाच्या नंतर समान काळ येणारी महान रात्र-निद्राा स्थिति), महारात्रि आणि मोहरात्रि ही तुच आहेस. तुच श्री, तू ईश्वरी, तुच ह्रीं, तुच बोधस्वरुपा बुध्दी आहेस. लज्जा, पुष्टि, तुष्टि, शांति,आणि क्षमाही तुच आहेस.

तुच खड्गधारिणी, शूलधारिणी, घोररुपा, तसेच गदा, चक्र, शंख आणि धनुष धारण करणारी आहेस. बाण, भुशुण्डी आणि परिघ हे तुझेच अस्त्रं आहेत. तुच सौम्य आणि सौम्यतर आहेस. एवढेच नाही जितके ही सौम्य आणि सुंदर पदार्थ आहेत त्या सर्वांच्याही पेक्षा तू अधिक सुंदर आहेस. पर आणि अपर या सर्वांच्याही वर असणारी तू परमेश्वरी आहेस.

हे सर्वेश्वरी देवी, कुठेही सत् असत् ज्या काही वस्तु आहेत आणि त्या सर्वांची जी शक्ति आहे ती तुच आहेस. या अवस्थेत तुझी स्तुती काय होऊ शकते..? जे या जगताचे सृष्टि, पालन आणि संहार करणारे आहेत त्या देवालाही जर तू निद्रेच्या आधिन करु शकतेस तर तुझी स्तुती करण्यास कोण समर्थ असु शकते..? मला (ब्रह्मा), भगवान शंकराला आणि भगवान विष्णुला सुद्धा तुच शरीर धारण करण्यास उद्युक्त करतेस तर तुझी स्तुती करण्याची शक्ति कोणात आहे..? हे देवी तू आपल्या उदार प्रभावानेच प्रशंसित आहेस. हे जे दोन दुर्धर असुर"मधु" आणि "कैटभ" आहेत त्यांना तू मोहात टाक आणि जगदीश्वर भगवान विष्णुला लवकर जागे कर. तसेच भगवान विष्णुच्या मनात या दोन असुरांना मारण्याची बुद्धी उत्पन्न कर.

**ऋषिरुवाच :-**

हे राजन! ब्रह्माजीने जेव्हा मधु कैटभाला मारण्याच्या उद्देशाने भगवान विष्णुला जागृत करण्याकरिता

तमोगुणी अधिष्ठात्री देवी योगनिद्रेची स्तुती केली तेव्हा ती भगवान विष्णुच्या नेत्र, मुख, नासिका, बाहु, ह्रदय आणि वक्षस्थल आदि भागातून निघुन अव्यक्त जन्मा ब्रह्माजीच्या समोर उभी राहिली. योगनिद्रेच्या प्रभावातुन मुक्त झालेले जगताचे स्वामी भगवान जनार्दन त्या एकार्णव जलातील शेषशैय्येवर जागे झाले व त्यांनी भयाने कापणाऱ्या ब्रह्मदेवाला पाहिले आणि त्यांच्या चिंतेचे कारण विचारले. ब्रह्माजीने त्यांना सर्व हकीकत सांगितली. भगवान विष्णूने त्या दोन बलवान रक्षसांना पाहिले. त्या वेळी क्रोधाने डोळे लाल केलेले ते राक्षस ब्रह्माजींना गिळंकृत करण्याकरिता उद्युक्त झाले होते. त्यावेळी भगवान श्रीहरिने त्यांना युद्धाचे आवाहन केले. ते दोन महाराक्षस भगवान विष्णु सोबत युद्ध करु लागले. ते क्रमाक्रमाने विष्णु सोबत युद्ध करत असल्याने थकत नव्हते. या प्रमाणे ५हजार वर्ष परस्परांचे युद्ध चालले. त्यावेळी भगवान विष्णूने युद्ध विराम घेऊन आदिशक्तिचे चिंतन आणि आराधना केली तेव्हा त्यांना आदिमायेकडुन ईच्छा मरणाचे वरदान प्राप्त झाले आहे, हे समजले. त्यावेळी भगवान विष्णुने आदिमायेला प्रार्थना केली की त्यांना आपल्या मायेने मोहित करावे. त्या दोन्ही राक्षसांना आदिमायेने तिच्या प्रभावाने मोहित केले. आदिमायेला समोर पाहून ते कामातुर राक्षस उन्मत्त झाले, तेव्हा विष्णुने पुन्हा युद्ध आरंभ करत त्यांना सांगितले की, मी तुमच्यावर प्रसन्न झालो आहे, आपण हवा तो वर मागून घ्या. मदाने उन्मत्त झालेले ते राक्षस म्हणाले की, आम्ही याचक नाही तर दाता आहोत, आपल्या विरतेने आम्ही प्रसन्न झाले आहोत, आपणच इच्छित वरदान मागावे.

**श्री भगवानुवाच :-**

जर आपण खरेच माझ्यावर प्रसन्न झाला असाल तर मला हेच वरदान द्यावे की, तुम्ही दोन्ही भावांनी माझ्या हाताने मरण स्विकारावे. यापेक्षा अधिक वर तो काय मागावा.

**ऋषिरुवाच :-**

याप्रमाणे स्वत:ला आपल्याच शब्दात विष्णुने पकडले आहे हे समजताच सर्वत्र पाणी आहे हे जाणून ते राक्षस म्हणु लागले की, आपणही वर मागण्यास सांगितले होते, त्यानुसार आम्हालाही एक वर द्यावा, आपणाद्वारे आम्ही मरण्यास तयार आहोत मात्र आम्हाला अशा जागी मारावे ज्याठिकाणी जलविरहित जमीन असेल.

**ऋषिरुवाच :-**

तेव्हा तथास्तु बोलुन शंख, चक्र, गदा धारण करणाऱ्या भगवान विष्णुने आपल्या मांडीचा भाग वाढवला त्यावेळी राक्षसांनी आदिमायेने मोहित असल्याने आपली वाणी खरी करण्याकरिता दोन्ही राक्षसांनी आपले मस्तक भगवान विष्णूच्या मांडीवर ठेवले आणि भगवान विष्णुने त्यांचे मस्तक आपल्या चक्राने कापले. याप्रकारे त्या विष्णुच्या कानाच्या मळापासून उत्पन्न झालेल्या मधु आणि कैटभ या राक्षसांचा संहार झाला.

ऋषीवर पुढे म्हणाले, याप्रकारे ही देवी कमलोद्भव ब्रह्माच्या स्तुती करण्याने प्रगट झाली होती. हे राजन आदिशक्ति प्रभावाचे वर्णन करतो.

**याप्रकारे श्रीमार्कण्डेय पुराणातील सावर्णिक मन्वंतराच्या कथा अंतर्गत देवी महात्म्यातील मधु-कैटभ वध नामक प्रथम अध्याय पुर्ण झाला.**

# अध्याय दुसरा

**-: अध्याय विषय :-**

**या अध्याय मध्ये सुमेधा ऋषी ने राजा सुरथ आणि समाधी यांना देवी महात्म्याचा प्रभाव वर्णण करताना देवतांच्या तेजातून देवीची उत्पत्ती कशी झाली आणि देवी ने महिषासुराच्या सेनेचा वध कसा केला याचे वर्णन आले आहे.**

(दनुचे रंभ आणि करंभ हे दोन पुत्र असणारे दानव पृथ्वीवर प्रसिध्द होते. त्यांनी पुत्र प्राप्ति करिता कठोर पंचाग्नि साधना केली. त्याने चिंतीत झालेल्या इंद्राने करंभ दैत्याचा नाश केला. त्यामुळे रंभ दैत्याने आपले शिर अग्निमध्ये अर्पण करण्याचा विचार करुन त्याप्रमाणे तलवारीने आपलेच मस्तक कापू लागला, तेव्हा अग्नि देवता प्रकट झाले. अग्नि देवाने वरदान मागण्यास सांगितले. तेव्हा रंभ दैत्याने तीन लोकांवर विजय मिळवेल असा पुत्र मला व्हावा अशी इच्छा व्यक्त केली. तेव्हा अग्नि देवाने सांगितले कि, ज्या स्त्रीवर तुझी आसक्ति होइल त्या स्त्री पासुन तुला महाबलशाली पुत्राची प्राप्ति होईल. त्यानंतर काही काळात यक्ष नगरीत फिरताना त्याची नजर मदमत्त महिषीवर गेली, ते पाहून तो दानव अन्य स्त्री ला सोडुन त्या महिषी वर आसक्त झाला. त्यांच्या समागमातून महिषीला गर्भधारणा झाली. रंभ दैत्य त्या महिषीसोबत पाताल लोकात गेला आणि तिचे रक्षण करत तो सुखात राहू लागला. एक दिवस एक मोठा रेडा त्या महिषीवर आसक्त होऊन तिच्या दिशेने येऊ लागला, हे पाहून रंभ दैत्य त्या रेड्याला मारण्याकरिता त्याच्यावर चाल करुन गेला. मात्र त्या रेड्याच्या द्वारे रंभ दैत्य मारला गेला. पतीच्या निधनानंतर महिषीने त्या ठिकाणावरुन पळ काढला आणि यक्ष लोकात स्वत:चा जीव वाचविण्याकरिता गेली. यक्षांनी तिचे रक्षण केले व त्या युद्धात तो मदोन्मत्त रेडा मारला गेला. त्या नंतर यक्षांनी रंभ दैत्याचा देह आणून त्याची चिता पेटवली त्यात महिषी सति गेली. त्या चितेतून महिषासुर आणि रक्तबीज यांचा जन्म झाला. त्यानंतर त्यामहिषासुराने सुमेरु पर्वतावर जाऊन घोर तपस्या केली. त्या तपाने प्रसन्न होऊन ब्रह्मदेवाने त्यांना वर मागण्यास सांगितले. त्यावेळी तो महिषासुर बोलला की, मला मृत्यु भयापासुन मुक्त करावे. मात्र ब्रह्म देवाने त्यास असमर्थता दर्शविल्यावर महिषासुर बोलला की, देव, दानव आणि मानव यांच्याहस्ते माझा मृत्यु होऊ नये तर माझा मृत्यु स्त्रीच्या हातुन व्हावा. कारण कोणती ही अबला मला मारु शकणार नाही.तेव्हा ब्रह्मदेव तथास्तु म्हणून अंतर्धान पावले. महिषासुराला दानवांनी अभिषेक केला व महिषासुर दानव सैन्याधिपति बनला.
(श्रीमद्देवी भागवत महापुराण पंचम स्कंद- अध्याय २)

**।। विनियोग:।।**

द्वितीय अध्यायापासुन मध्यमचरित्र आरंभ होते. या मध्यम चरित्राचे ऋषि विष्णुजी असुन श्री महालक्ष्मी या चरित्राची अधिष्ठात्री देवता असुन व्याकरणाच्या उष्णिक नामक छंदामध्ये या अध्यायाच्या श्लोकांची निर्मिती झाली आहे. महादेवीची शाकम्भरी नामक शक्ति या चरित्राची रक्षणकर्ती देवता आहे. दुर्गा चरित्राचे बीज असुन वायु हे तत्व आहे तथा यजुर्वेदाप्रमाणे पवित्र असे हे चरित्र आहे. अर्थात यजुर्वेद स्वरुप आहे. श्रीमहालक्ष्मी देवीच्या प्रसन्नतेकरिता द्वितिय चरित्राच्या जपाचा विनियोग केला जातो.

**।।ध्यानम् ।।**

मी कमलाच्या असनावर बसलेल्या प्रसन्न मुख असणाऱ्या महिषासुरमर्दिनी भगवती महालक्ष्मी देवी चे भजन करतो, जीने आपल्या हातात अक्षमाला, फरस, गदा, बाण, वज्र, पद्म, धनुष, कुण्डिका, दण्ड, शक्ति, खड्ग, ढाल, शंख, घण्टा, मधुपात्र, शूल, पाश आणि चक्र धारण केले आहे.

**ऋषिरुवाच :-**

पुर्वकाळात देवता आणि असुर यांच्यात शंभर वर्षापर्यंत घनघोर युध्द झाले. ज्यात असुरांचा स्वामी महिषासुर होता, ते देव सैन्याचे स्वामी देवराज इंद्र होते. या युध्दात देवतांची सेना महाबली असुर सेनेपुढे निर्बल झाली. संपुर्ण देवतांना जिंकून महिषासुर स्वत: इंद्र बनला. तेव्हा पराजित देवता प्रजापति ब्रह्माजींना पुढे करुन त्या स्थानी गेले जेथे भगवान शंकर आणि विष्णु विराजमान होते. सर्व देवतांनी महिषासुराचा पराक्रम तथा आपल्या पराजयाचा वृतांत दोन्ही देवेश्वरांना विस्तारपुर्वक सांगितला. देवता गण बोलले, भगवान, महिषासुर सुर्य, इंद्र, अग्नि, वायु, चंद्र, यम, वरुण आणि अन्य देवतांचे अधिकार हिरावून घेऊन स्वत: सर्वांचा अधिष्ठाता बनला आहे. त्या दुरात्मा महिषासुराने समस्त देवतांनाही स्वर्गातुन हाकलून दिले आहे. आता देवता गण सामान्य मनुष्याप्रमाणे पृथ्वीवर फिरत आहेत. दैत्यांचा हा सारा प्रताप आपणास सांगितला आहे, हे परमेश्वर, आम्ही आता अपल्याला शरण आलो आहोत. महिषासुराच्या वध करावा आणि आम्हाला या त्रासातुन मुक्त करावे.

या प्रकारे देवतांचे वचन ऐकुन भगवान विष्णु आणि शंकर यांना सर्व असुरावर खुप क्रोध आला. त्या क्रोधाच्या प्रभावाने त्यांचे डोळे लाल झाले आणि त्यावेळी विष्णुच्या मुखातुन एक महान तेज प्रकट झाले. या प्रकारे ब्रह्मा, शंकर, आणि इंद्र तसेच इतर देवतांच्या शरिरातुनही महान तेज बाहेर पडले व ते सर्व एकत्रित झाले. महान तेजाचा तो पुंज एका पर्वताप्रमाणे दिसु लागला.देवतांनी पाहिले तर त्या ज्वाला संपुर्ण दिशेला पसरल्या होत्या. सर्व देवतांच्या शरिरातुन प्रगट झालेल्या त्या तेजाची तुलना करणेच अशक्य होते. एकत्रित झाल्यावर त्या तेजाने एका स्त्री चे रुप धारण केले व आपल्या प्रकाशाने तिन्ही लोकांत त्या तेजाची प्रभा फाकली. भगवान शंकराचे जे तेज होते त्यातुन देवीचे मुख निर्माण झाले. यमराजाच्या तेजातुन डोक्याचे केस निर्माण झाले. श्री विष्णुच्या तेजापासुन दोन्ही भूजा उत्पन्न झाल्या. चंद्राच्या तेजाने दोन स्तन निर्माण झाले, इंद्राच्या तेजाने कटिप्रदेशाची उत्पत्ती झाली. वरुणाच्या तेजाने जंघा व पिंढरी उत्पन्न झाली. पृथ्वीच्या तेजाने नितंब भाग तयार झाला. ब्रम्हाच्या तेजाने दोन चरण, सुर्याच्या तेजाने पायाची बोटे, अष्टवसुंच्या तेजाने हातांची बोटे, कुबेराच्या तेजाने नासिका, प्रजापति च्या तेजाने दात, अग्निच्या तेजाने तीन नेत्र, संध्याच्या तेजाने भुवया, वायुच्या तेजाने कान आदिंची उत्पत्ती झाली. या प्रकारे सर्व देवतांच्या तेजातुन देवी साकार झाली.

समस्त देवतांच्या देवतांच्या श्रेष्ठ तेजातुन प्रकट झालेल्या देवीला पाहुन महिषासुराद्वारे त्रासलेले देवता गण आनंदित झाले.

पिनाकधारी शंकराने एक शूल देवीला अस्त्र म्हणून प्रदान केला.विष्णुने अपल्या दक्रातुन एक चक्र उत्पन्न करुन ते देवीला प्रदान केले. वरुणाने देवीला शंख, अग्निने शक्ति, वायूने धनुष व बाणाने भरलेले भाते दिले. सहस्त्रनेत्र धारि देवराज इंद्राने आपल्या ऐरावत नामक हत्तीची एक घचटा व वज्रशक्तिच्या प्रभावातुन एक वज्र निर्माण करुन देवीला दिले. यमराजाने दंड, वरुणाने पाश, प्रजापतिने स्फटिकमाला, ब्रह्माजीने कमंडलु दिले, तर सुर्याने आपल्या सहस्त्र किरणांच्या तेजाने देवीच्या रोमारोमात शक्ति प्रदान केली. कालाने चमकणारी ढाल-तलवार, क्षीरसमुद्राने उज्वल हार व कधी ही जीर्ण न होणारे वस्त्र तसेच दिव्य चुडामणि, दोन कुंडल, कडे, अर्धचंद्र, सर्व बाहु करिता, केयुर, चरणांकरिता नुपुर (पैंजन), गळयातील विविध अलंकार,सर्व बोटांकरिता अंगठी दिली. विश्वकर्मा ने त्यांना फरस भेट केली त्याच सोबर अनेक प्रकारचे अभेद्य कवच आणि अस्त्र प्रदान केले. याच समवेत उमललेल्या कमळांची माळ प्रदान केली. समुद्राने देवीला सुंदर कमळ प्रदान केले. हिमालयाने स्वार होण्याकरिता सिंह आणि विविध रत्न प्रदान केले. धनकुबेराने मधु ने भरलेले पात्र आणि सर्व पृथ्वीला धारण करणाऱ्या शेषाने देवीला सुंदर नागहार प्रदान केला. या प्रमाणे अन्य देवतागणांनी देवीला विविध प्रकारचे अलंकार व विविध अस्त्र, शस्त्र प्रदान करुन देवीचा सन्मान केला.

यावेळी देवीने उच्च हट्टहास पुर्वक गर्जना केली.त्या भयंकर नादाने संपुर्ण आकाश व्यापले.देवीच्या उच्च नादापुढे सर्व अकाश ठेंगणे वाटू लागले. त्या नादाचा जो मोठा प्रतिध्वनि झाला त्याने संपुर्ण विश्व व्यापले आणि समुद्र कापू लागले.पृथ्वी डोलू लागली व पर्वत हालू लागले.त्यावेळी सर्व देवतांनी अत्यंत प्रसन्नता पुर्वक सिंहवाहिनी भवानीचा जयजयकार केला! सर्व उपस्थीत महर्षिंनी तीचे स्तुति-स्तवन गायले.

संपुर्ण त्रिलोकाला क्षोभ ग्रस्त पाहून सर्व दैत्यगण हातात शस्त्र धारण करुन, सेनेला कवच आदिने सुसज्ज करुन युध्द करण्यास तत्पर झाले. त्यावेळी महिषासुर क्रोधाने म्हणु लागला, हे काय होत आहे..?त्यानंतर तो आपल्या असूर सैन्यासोबत सिंहनादाच्या दिशेला लक्ष करुन त्या दिशेने धावू लागला.पुढे जाऊन त्याने देवीला पाहिले जीच्या प्रभेने तीन लोक प्रकाशित होत होते. तीच्या चरणांच्या भाराने पृथ्वी खाली खचत होती. माथ्यावरील मुकुटाने अकाशात एक रेखा खेचली गेली व देवीच्या धनुष्याच्या झंकाराने सातही पाताल क्षुब्ध झाले. देवीने जनु आपल्या हजारो भूजांनी संपुर्ण दिशाला अच्छादित केले. यानंतर देवीचे दैत्यांसोबत युध्द आरंभ झाले. नाना प्रकार च्या अस्त्र शस्त्राने सर्व दिशांना उजळून टाकले. चिक्षुर नामक असुर महिषासुराच्या सैन्याचा सेनापति होता. त्याने दवीच्या सोबत युध्द आरंभ केले. अन्य दैत्यांची चतुरंग सेना सोबत घेऊन चामरानेही लढण्यास सुरवात केली. साठ हजार दैत्य सैन्यासह उदग्र नामक महादैत्याने लढा सुरु केला. एक करोड दैत्य सैन्याच्या रथासह महाहनु नामक दैत्य युध्द करु लागला.ज्याचे शरिरावरील केस तलवारी प्रमाणे होते तो असिलोमा नामक दैत्य पाच कोटी रथ सैन्यासह युध्दभुमीवर आला.साठ लाख रथांसह बाष्कल दैत्य देवी समवेत युध्द करु लागला. परिवारित नामक राक्षस अनेक हत्तीस्वार, घोडस्वारांसह एक कोटी ची सेना घेऊन युध्द करु लागला. बिडाल नामक दैत्य ५ अब्ज रथधारी सैन्यासह देवी समोर चालुन आला. या शिवाय ही अनेक महादैत्य आपली राक्षस सेना घेऊन देवी समोर युध्द करण्यास रणभुमीवर आले. स्वत: महिषासुर आपल्या करोडोंच्या दैत्य सैन्यासह रणक्षेत्रात होता. ते सर्व दैत्य देवीच्या समवेत तोमर, भिन्दिपाल, शक्ति, मुसळ, खड्ग, परशु, आदि अस्त्र-शस्त्र घेऊन युध्द करु लागले. काही दैत्यांनी देवीवर शक्तिचा प्रहार केला. काहींनी पाश फेकले. तर काहींनी तलवारीचा प्रहार करत देवीला मारण्याचा प्रयत्न केला. देवीने ही खेळ-खेळात आपल्या अस्त्र शस्त्रांची वर्षा करत दैत्य सेनेचे अस्त्र-शस्त्र नष्ट केले. देवीच्या मुखावर युध्द करुनही कोण्याही स्वरुपाचा थकवा जाणवत नव्हता. देवता आणि ऋषिगण देवीची स्तुति करत होते आणि भगवतीही दैत्यांच्या शरिरावर अस्त्र-शस्त्रांचा प्रहार करत होती.

देवीचे वाहन असणारा देवीसिंह ही क्रोधाने आपली अयाळ हालवत असुरांच्या सेनेत अशा प्रकारे वार करु लागला जसा वनवा क्षणार्धात अरण्याचा घास घेतो. देवीने रणभूमीमध्ये सर्व दैत्य सैन्यासमवेत जेवढे नि:श्वास सोडले ते तत्काळ हजारो गणांचे रुप घेऊन विविध अस्त्र घेऊन असुर सैन्यासोबत युध्द करु लागले. देवीच्या शक्तिद्वारे निर्माण झालेले ते गण असुरांचा नाश करत नगाडा आणि शंखनाद करु लागले.या महासंग्रामात किती तरी गण मृदुंग वाजवत होते.त्यानंतर देवीने त्रिशुल, गदा, तलवार व शक्ति च्या वर्षावाने शेकडो महादैत्यांचा संहार केला. अनेकांना घंटेच्या भयंकर नादाने मूर्छा आली. अनेक दैत्यांना देवीने पाशाने बांधुन खाली पाडले. तलवारीच्या माऱ्याने अनेक दैत्यांचे दोन तुकडे झाले. अनेक गदा प्रहाराने जमिनीवर झोपले. मुसळाच्या माऱ्याने अनेक दैत्य रक्ताच्या उलट्या करु लागले. काही दैत्याची छाती शूलाच्या प्रभावाने फाटली व ते मृत झाले. त्या रणांगणात बाणवर्षा होऊन अनेक असुरांची कंबर तुटली. देवीच्या प्रभावाने पिडीत झालेले दैत्य प्राणांना मुकले. कित्तेकांचे बाहुबळ संपुष्टात आले. अनेकांच्या माना कापल्या गेल्या. अनेक दैत्यांचे मस्तक तुटून खाली पडले. काही दैत्यांच्या शरिराचे दोन भाग झाले. काही दैत्य पाय कापले जाऊन जमिनीवर पडले. अनेकांना देवीने मधुन दोन भाग करुन चिरुन टाकले. काही दैत्य मस्तक कापले गेल्यावरही केवळ धडासह हातात शस्त्र घेऊन देवीसमवेत

युध्द करण्याकरिता धावत होते. कितीतरी मस्तक कापलेले राक्षस हातात तलवार व शक्ति धारण करुन युध्द भुमीमध्ये सैरभैर धावत होते. काही राक्षस थांब थांब बोलत देवीला युध्दाकरिता ललकारत होते. ज्या ठिकाणी हा घोर संग्राम झाला तेथील धरती देवीने नष्ट केलल्या राक्षसांच्या धडाने, रथांने, अस्त्र शस्त्रांने भरुन गेली होती कि तेथे चालणे ही मुश्किल झाले होते.

दैत्यांच्या सैन्यातील हात्ती, घोडे आणि असुरांच्या शरिरातील रक्तपातामुळे तेथे थोड्याच वेळात रक्ताच्या नद्या वाहू लागल्या. जगदंबेने असुरांच्या विशाल सेनेला क्षणभरातच नष्ट केले, जसे तृण-काष्ठ ने भरलेल्या मोठ्या अगाराला अग्नि क्षणभरात नष्ट करतो. देवीसिंह ही आपली आयाळ हालवत जोर जोरात सिंहगर्जना करत दैत्यांच्या शरिरातील प्राण काढून घेत होता. तेथे देवीच्या गणांनी ही त्या महादैत्यांवर असे युध्द केले कि, ज्यामुळे आकाशात सर्व दिव्य युध्द पाहणारे देवता गण अत्यंत संतुष्ट होऊन त्यांच्यावर पुष्पवृष्टी करु लागले.

**या प्रकारे श्रीमार्कण्डेय पुराणातिल सावर्णिक मन्वंतराच्या कथा अंतर्गत देवी महात्म्यातील महिषासुर सेना वध नामक द्विंतिय अध्याय पुर्ण झाला.**

# अध्याय तिसरा

**-: अध्याय विषय :-**

**या अध्याय मध्ये सुमेधा ऋषी ने राजा सुरथ आणि समाधी यांना देवी महात्म्याचा प्रभाव वर्णन करताना देवी ने महिषासुरासह सेनापतींचा वध कसा केला याचे वर्णन आले आहे.**

**।। ध्यानम् ।।**

जगदंबेच्या अंगाची कांति उदय पावणाऱ्या सहस्त्र सुर्यांच्या तेजाप्रमाणे आहे. तीने लाल रंगाची रेशमी साडी धारण केली आहे. गळयात मुंडमाळा आहे, दोन्ही स्तनांवर रक्तचंदनाचा लेप लावला आहे. आपल्या करकमलात जपमाळा, विद्या, अभय व वर आदि मुद्रा धारण केल्या आहेत. तीच्या तीन नेत्रांच्या तेजाने मुखाची शोभा अधिक वाढली आहे. देवीच्या मस्तकावर चंद्रमासाह रत्नमय मुकुट असुन ती कमलासनावर विराजमान आहे.अशा देवीला मी भक्तिपुर्वक नमस्कार करतो.

**ॐ ऋषिरुवाच :-**

दैत्य सैन्याचा अशा प्रकारे पाडाव झालेला पाहून महादैत्य चिक्षुर युध्दाच्या अवेशाने देवी सोबत युध्द करण्यास रणांगणात चालून आला. तो असूर रणभूमी मध्ये देवीवर अशा प्रकारे बाणांची वर्षा करु लागला जसे काळे ढग मएरु पर्वताच्या शिखरावर पाण्याच्या धारा बरसवतात. तेव्हा देवीनेही आपल्या बााणाच्या साह्याने त्याच्या बाण समुहास तात्काळ नष्ट केले तसेच त्याच्या घोड्यांना आणि सारथीला मारुन टाकले. त्याचसमवेत त्याची उंच ध्वजा व धनुषालाही कापले. धनुष कपल्यावर त्याच्या शरिरावर देवीने आपल्या तीक्ष्ण बाणांनी छेद केले. धनुष, घोडे, रथ आणि सारथी नष्ट झाल्यावर तो राक्षस ढाल व तलवार घेऊन देवीच्या दिशेने धावू लागला. त्याने तेज धार असणाऱ्या तलवारीने सिंहाच्या मस्तकावर प्रहार करत देवीच्या्जव्या भुजावर वेगाने प्रहार केला. हे राजन, देवीच्या बाहु पर्यंत पोहोचताच ती तलवार तुटली. त्यानंतर क्रोधाने डोळे लाल झालेल्या चिक्षुराने हातात शूल घेतले व तो भगवती भद्रकालीवर वार करण्याचा प्रयत्न करु लागला. तो शूल अकाशातुन पडताना सुर्यमंडलाप्रमाणे आपल्या तेजाने प्रज्वलीत झाला. त्या शूलाला आपल्या दिशेने आलेले पाहून देवीनेही शूलाचा प्रहार केला. त्या शूल प्रहाराने राक्षसाच्या शूलाचे शेकडो तुकडे झाले तसेच देवीच्या प्रहाराने महादैत्य चिक्षूराचेही तुकडे-तुकडे झाले.

महिषासुराच्या सेनापती चिक्षूराचा देवीच्या हाताने वध झाल्यावर देवतांना पीडा देणारा चामर नामक राक्षस हातीवर चढुन देवी समवेत युध्द खेळण्याकरिता आला. त्यानेही देवीवर शक्तिचा प्रहार केला मात्र जगदंबेने आपल्या हुंकारानेच आहत करुन त्यास तत्काळ पृथ्वीवर पाडले. शक्ति ही निष्प्रभ झाली हे पाहून चामराला खुप राग आला. आता त्याने शूल हाती घेऊन देवीवर वार केला. मात्र देवीने त्याचे शूल ही बाणांद्वारे कापुन टाकले. याच समयाला देवी सिंहाने जोरदार उडी घेऊन तो हातीच्या मस्तकावर चढून बसला व त्या दैत्याबरोबर मोठ्या ताकतीने बाहुयुध्द आरंभ केले. ते दोघे लढता लढता हत्तीवरुन पृथ्वीवर आले आणि अत्यंत क्रोधाने एक - मेकांवर प्रहार करत लढू लागले. त्यानंतर देवी सिंहाने जोरदार गर्जना करत आकाशाच्या दिशेने वेगाने उडी घेतली व तितक्याच वेगाने तो खाली येताना त्याने चामरावर आपल्या पंजाने प्रहार केला व त्याचे शिर धडापासुन वेगळे केले. त्याचा देवीसिंहाच्या हातुन नाश झाला.

याप्रकारे उदग्र नामक दैत्य शिला आणि वृक्ष यांचा मार खात रणभुमीमध्ये देवीच्या हातून मारला गेला आणि कराल ही दात, बुक्का आणि चापटीच्या प्रहाराने धाराशायी झाला. क्रोधाने भरलेल्या देवीने आपल्या

गदेच्या प्रहाराने उध्दत नामक राक्षसाचा संहार केला. देवीने त्याच वेगाने आपल्या भिंदिपाल नामक शस्त्राने वाष्कल ला, व बाणंच्या प्रहाराने ताम्र व अंधकाला मारले. त्रीनेत्र धारी परमेश्वरीने आपल्या त्रिशुलाने उग्रास्य, उग्रवीर्य व महाहनु नामक दैत्यांचा संहार केला. तलवारीच्या प्रहाराने विडाल या दैत्याचे मस्तक धडापासुन वेगळे केले. दुर्धर व दुर्मख या दोघांनाही देवीने यमसदनी पाठविले.

या प्रकारे आपल्या सैन्याचा पाडाव होत आहे हे पाहून महिषासुराने रेड्याचे रुप धारण केले व देवीच्या सैनिक असणाऱ्या गणांना त्रास देण्यास आरंभ केला. काही गणांना त्याने आपल्या नाकाने मारले. काहींना आपल्या खुराखाली दाबले, काही गणांना आपल्या शेपटीच्या प्रहाराने मारु लागला. काहींना आपल्या शिंगावर घेऊन दूर फेकू लागला.काही गणांना आपल्या वेगाने, काहीना आपल्या आवाजाने, काहींच्या मागे धावून तर काहींना आपल्या श्वासाने प्रभावाने धाराशायी पाडू लागला. या प्रकारे गणांच्या सेनेवर हल्ला करुन तो असुर  देवी सिंहावर हल्ला करण्याकरिता सरसावला. हा प्रकार पाहून जगदंबेला खूप क्रोध आला. पराक्रमी महिषासुर ही क्रोधाने लाल होऊन जमिन आपल्या पायाने खोदु लागला व शिंगाच्या बळाने तो पर्वत देवी गणांच्या दिशेने फेकत उच्च स्वरात गर्जना करु लागला. त्याच्या वायूच्या प्रभावाने पृथ्वीवर भेगा पडू लागल्या. त्याच्या शेपटीच्या प्रहाराने समुद्र सर्व बाजूंनी धरतीला डूबवु लागला. हालणाऱ्या शगिांच्या अघाताने विदिर्ण होऊन ढगांचे तुकडे होऊ लागले. त्याच्या श्वासाच्या प्रंचड वायूच्या वेगाने त्याने फेकलेले पर्वत अकाशातून खाली पडू लागले. याप्रकारे क्रोधाने भरलेल्या त्या महादैत्याला आपल्याकडे आलेले पाहून चंडिकाने त्याचा नाश करण्याकरिता मोठा क्रोध धारण केला. देवीने पाश फेकून त्या असुराला बांधले. त्या महासंगरामात देवी पाशाने बांधला गेलेला पाहून त्या राक्षसाने आपले रेड्याचे रुप त्यागले. आणि तत्काळ तो सिंहाच्या रुपात प्रकट झाला. त्या आवस्थेत देवीने त्याचे मस्तक कापण्याकरिता त्याच्यावर प्रहार करताच तो खड्ग धारी पुरुषाच्या रुपात प्रगट झाला. तेव्हा देवीने लक्ष बाणंची वर्षा करुन ढाल आणि तलवारीच्या साथीने त्याच्या पुरुष रुपालाही नमोहरण केले. महिषासुर क्षणाक्षणाला आपले रुप पालटून देवीला संभ्रमात टाकू लागला. त्याने आता मोठ्या गजराजाचे रुप धारण केले आणि आपल्या सोंडेने तो देवसिंहाला खेचु लागला व मोठमोठ्याने चित्कार करु लागला. त्या क्षणाला देवीने आपल्या तलवारीच्या वाराने त्याची सोंडच कापून टाकली. तेव्हा महिषासुराने पुन्हा एकदा रेड्याचे रुप धारण केले व पहिल्या प्रमाणे चराचर प्राण्यासह तो तीनही लोकांना व्याकूळ करु लागला. त्यावेळी क्रोधाने भरलेल्या जगन्माता चंडिका उत्तम मधु प्राशन करुन मोठमोठ्याने हासू लागली त्यावेळी देवीचे डोळे लाल झाले. होते.  तिकडे तो बल आणि पराक्रमाने मदोन्मत्त झालेला राक्षस गर्जना करु लागला व आपल्ता शिंगाच्या प्रभावाने चंडिकेच्या दिशेने तो पर्वत फेकू लागला. देवीने आपल्या बाणांच्या प्रहाराने त्या पर्वतांना चुर्ण करुन टाकत बोलु लागली. बोलताना मधुपात्रातील मधुप्राशनाने देवीचे मुख लाल झाले होते व वाणी क्रोधाने लडखडत होती.

**देव्युवाच :-**

अरे मुर्खा, मी जो पर्यंत मधु प्राशन करत आहे तो पर्यंत तू क्षणभर गर्जना करु घे. माझ्या हातून शिघ्र तुझा मृत्यू झाल्यावर देवताही आनंदाने गर्जना करतील.

**ऋषिरुवाच :-**

हे बोलून देवीने वायुच्या प्रंचड वेगाने उडी घेतल;ी व व ती त्या रक्षसावर उभी राहिली. तीने आपल्या पायाने त्याला दाबून शूलाच्या प्रभावाने त्याच्या कंठावर आघात केला.देवीच्या पायाखाली देबला गेलेला असुन ही महिषासूर दुसरे रुप घ्यायचा प्रयत्न करु लागला, मात्र देवीने आपल्या प्रभावाने त्याला तएथेच रोखले. अर्धे रुप घेतलेल्या आवस्थेतच तो दैत्य देवी समवेत युध्द करु लागला. त्यावेळी देवीने क्रोधाने आपल्या जवळील

तलवारीने त्याचे मस्तक कापले. हाहाकार करत सैरभैर झालेली दैत्य सेना करत रणांगणातुन पळून जाऊ लागली.

सर्व देवता गण आनंदीत झाले. देवतांनी दिव्य महर्षिंच्या समवेत देवीचे स्तवन केले. गंधर्वराज गाऊ लागले व अप्सरा नृत्य करु लागल्या.

**याप्रकारे श्रीमार्कण्डेय पुराणातील सावर्णिक मन्वंतराच्या कथा अंतर्गत देवी महात्म्यातील महिषासुर वध नामक तृतिय अध्याय पुर्ण झाला.**

# अध्याय चवथा

**या अध्याय मध्ये सुमेधा ऋषी ने राजा सुरथ आणि समाधी यांना देवी महात्म्याचा प्रभाव वर्णन करताना देवी ने महिषासुराचा वध केल्यावर प्रसन्न झालेल्या इन्द्रादि देवांनी केलेली देवीची स्तुति चे वर्णन आले आहे.**

**।। ध्यानम् ।।**

सर्वसिध्दीची इच्छा असणारे पुरुष जीची सेवा करतात, तसेच देवता गण जीच्या सर्व बाजुला पसरलेले असतात, जिच्या अंगाची प्रभा काळ्या मेघासमान आहे. ती आपल्या कटाक्षाने शत्रूसमुहाला भय प्रदान करते. जीच्या मस्तकावर मनोहर चंद्राची प्रभा शोभायमान होते. जी आपल्या हातात शंख, चक्र, कृपाण व त्रिशुल धारण करते. जीचे तीन नेत्र आहेत. जी सिंहावर आरुढ आहे व जीच्या तेजाने तीनही लोक परिपुर्ण झाले आहेत अशा जया नामक दुर्गा देवीचे ध्यान करावे.

**ऋषिरुवाच :-**

अत्यंत पराक्रमी दुरात्मा महिषासुर आणि त्याची सेना यांचा संहार देवीच्या हातून झाल्यावर इंद्रादि देव देवीला दंडवत करण्याकरिता मान आणि खांदे झुकवून त्या भगवती दुर्गेचे उत्तम वचनाने स्तवन करु लागले त्यावेळी त्याच्या सुंदर अंगावर हर्षामुळे रोमांच उभे राहिले.

देवता बोलाले, संपुर्ण देवतांच्या शक्तिचा समुदाय जीचे स्वरुप आहे, तसेच ज्या देवीने आपल्या शक्तिने संपुर्ण जगताला व्यापून टाकले आहे, समस्त देवता आणि महर्षि गण जिला नित्य स्मरण करतात व जी नित्य पुजनिय आहे त्या जगदंबेला आम्ही भक्तिपुर्वक नमस्कार करतो, हे देवी आमचे कल्याण कर!

जिचा अनुपम प्रभाव आणि बल यांचे वर्णन करण्यास भगवान शेषनाग, ब्रह्माजी आणि भगवान महादेवजी ही समर्थ नाहित, ती भगवती संपुर्ण जगताचे पालन आणि अशुभकारी भयाचे नाश करण्याचा विचार करो!

जी पुण्यात्मांच्या घरात लक्ष्मी रुपात, पापीजनांच्या घरात दरिद्रता च्या रुपात, शुध्द अंत:करण असणाऱ्या पुरुषांच्या हृदयात बुध्दी रुपात, सत्पुरुषांच्या मनात श्रध्दारुपात, तसेच कुलवान मनुष्यांच्या मनात लज्जा रुपात निवास करते, त्या भगवती दुर्गा देवीला आम्ही नमस्कार करतो. देवी आपण सपुर्ण विश्वाचे पालण लरावे.

हे देवी, आपल्या या अचिंत्य रुपाचे, असुरांचा नाश करणाऱ्या भारी पराक्रमाचे तसेच समस्त देवता आणि दैत्यांच्या समक्ष युध्दात प्रकट केलेल्या आपल्या अत्यंत अद्भूत चरित्राचे वर्णण आम्ही कशा प्रकारे करावे..!

आपणच सपुर्ण जगताच्या उत्पत्तीचे महाकारण आहात, आपल्यातच सत्वगुण,रजोगुण, तमोगुण आदि तीन गुण आहेत. ( आपल्यापासुनच या तीन गुणांची उत्पत्ती झाली आहे.) तरीही आपणास कोणत्याही दोषाचा संसर्ग झालेला दिसत नाही. साक्षात भगवान विष्णु आणि महादेवजी ही आपल्या रुपाला जाणू शकत नाहीत. आपणच सर्वांचे आश्रय स्थान आहात. हे समस्त दृष्य जगत आपलेच अंश रुप आहे. कारण हे देवी केवळ आपणच सर्व आदिभूत अव्याकृता, परा आणि प्रकृति आहात. ( सर्वात आपण आहात, सर्व आपल्यातच व्यापलेले आहे, आपण सर्वात असुनही सर्वांच्या वर -परा- आहात.)

देवी! सपुर्ण यज्ञात जीच्या केवळ उच्चारण्यामुळे सर्व देवता गण तृप्तिचा अनुभव करतात,ती स्वाहा देवी आपणच आहात. या व्यतिरिक्त आपणच पितृजनांच्या तृप्तिचेही कारण आहत याकरिता सर्वजन आपणास स्वधा ही बोलतात.(स्वधा नावाने आपण समस्त पितृंना ही तृप्त कराता.)

देवी, जे मोक्षाच्या प्राप्तिचे साधन आहे, सामान्यांना जाणण्याच्या, चिंतनाच्या पलिकडे -अचिंत्य - महाव्रतस्वरुप आहे, समस्त दोषांने विरहित, जितेंद्रिय, तत्वालाच सार (मूळ आत्म रुपाची अनुभूतु प्राप्त करण्याचे साधन) मानणारे तसेच मोक्षाची अशा करणारे मुनिजन ज्या आदिशक्तिचा, मुळ प्रकृतिचा आभ्यास करतात ती

भगवती परा विद्या आपणच आहात.

आपण शब्दस्वरुपा आहात, अत्यंत निर्मल आणि सुकोमल ऋगवेद, यजुर्वेद व ऋचांच्या मनोहर पाठाने युक्त असणारा सामवेद आदि वेदांचा आधार ही आपण च आहात. देवी आपणच तीन वेदाने तसेच सहा ऐश्वर्याने युक्त आहात. या विश्वाची उत्पत्ती आणि पालन या आदि क्रियाकरिता आपणच प्रकट झालात. आपणच सर्व जगताच्या घोर पिडा वा दु:खाचे नाश करणारी मूळ शक्ति आहात.

देवी! ज्यामुळे सर्व शास्त्रांच्या ज्ञानाचे सार प्राप्त होते ती मेधाशक्ति आपणच आहत, दुर्गम भवसागराला पार करणारी नौकारुप दुर्गादेवी ही आपणच आहात. आपली कशातच आसक्ति -इच्छा - नाही. कैटभाचे शत्रु असणारे भगवान विष्णुच्या वक्ष:स्थलात एकमात्र निवास करणारी भगवती महालक्ष्मी तसेच भगवान चंद्रशेखर द्वारा सन्मानित असणारी गौरादेवी केवळ आपणच एकमेव आहात.

आपले मुख मंद हास्यामुळे सुशोभित, निर्मल आणि पूर्ण चंद्रबिंबांच्या प्रमाणे दैदिप्यमान, उत्तम सुवर्णाच्या मनोहर कांतिप्रमाणे सुकोमल असुनही त्या दृष्ट, दुरात्मा असणाऱ्या महिषासुराला असा चेहरा पाहून क्रोध यावा व त्याने या सुकोमल मुख कमलावर प्रहार करण्याचे दु:साहस करावे ही खुप मोठी आश्चर्य वाटणारी गोष्ट आहे.

हे देवी! तेच सुकोमल मुखकमल क्रोधाने युक्त झाल्यावर उदय पावणाऱ्या चंद्राप्रमाणे लाल आणि रागाच्या भरात धनुष्याप्रमाणे विक्राळ झालेल्या भुयवा पाहून महिषासुराने प्राण तत्काळ कसे त्याग केले नाहीत हे त्याहुन ही अधिक अश्चर्य वाटणारी गोष्ट आहे. कारण क्रोधाने भरलेल्या यमराजाला पाहून कोण जीवंत राहू शकतो..?

देवी! आपण प्रसन्न व्हावे! हे परमात्मस्वरुपा आपल्या प्रसन्न होण्यानेच जगताचा अभ्युदय होतो आणि क्रोधाने भरल्यावर आपण किती कुळांचा नाश करु शकता ही बाब आता आमच्या अनुभवास आली आहे. कारण महिषासुराची ही विशाल सेना आमच्या समक्ष क्षणभरातच आपल्या कोपाने नष्ट झाली.

नित्य अभ्युदय प्रदान करणारी हे देवी, आपण ज्यांच्यावर प्रसन्न होता केवळ तेच देशात सन्मान प्राप्त करतात, त्यांनाच धन आणि यशाची प्राप्ति होते. त्याचे धर्माचरण कधीच शिथील होत नाही, केवळ तेच आपल्या स्त्री, पुत्र व बंधु जनांसोबत जीवन व्यतित करुन धन्य होतात.

देवी! आपल्या कृपेनेच जे धर्मात्मा व पुण्यात्मा पुरुष प्रतिदिन अत्यंत श्रध्दापुर्वक नित्य धर्माला अनुकूल असणारे आचरण करतात त्यांनाच केवळ स्वर्गलोकाची प्राप्ति होते. अर्थात केवळ आपणच तीनही लोकांत मनोवांछित फळ प्रदान करणारी आदिशक्ति आहात.

हे दुर्गा देवी! आपण स्मरण करताक्षणीच कार्यन्वित होऊन सर्व प्राण्यांचे भय हरण करता! स्वस्थ पुरुषांच्या द्वारे चिंतन केल्यावर त्यांना परम कल्याणमयी बुध्दी प्रदान करता. दु:ख दरिद्रता आणि भय हरण करणारी हे देवी, आपल्या शिवाय या अखिल जगतात आहेच कोण कि ज्यांचे चित्त सर्वांवर उपकार आणि दया प्रदान करण्याकरिता दयार्द्र असते.

हे देवी! या राक्षसांना मारुन जगताला सुख प्राप्त व्हावे, व या सर्व राक्षसांनी चिरकाल पर्यंत नरकात राहण्याइतके पाप केले आहे. मात्र या समयाला संग्रामात मृत्यू प्राप्त होऊन त्यांनी सर्व पापाद्वारे मुक्ति मिळवून स्वर्गलोक प्राप्त करुन घ्यावा या विचारानेच आपण शत्रुंचा वध केला हे निश्चित!

हे देवी! आपण सर्व शत्रूंवर शस्त्रांचा प्रहार का करात..? आपण असुरांना केवळ आपल्या दृष्टीपातानेच भस्म करुन का नाही टाकत..? यातही एक रहस्य आहे. हे शत्रुही आपल्या शस्त्रांने पवित्र होऊन त्यांना उत्तम गती प्राप्त व्हावी त्यांच्या प्रति आपला हा विचार अत्यंत उत्तम आहे.

खड्गाच्या तेजपुंजाच्या भयंकर प्रकाशाने तसेच आपल्या त्रिशुलाच्या घनीभुत प्रभेने असुरांचे डोळे कधीच फुटले असते मात्र युध्द समयाला त्यांना आपल्या मनोहर प्रकाशाने युक्त अशा चंद्राच्या समान सौम्यता प्रदान करणाऱ्या मुखकमलाचे दर्शन होत होते.

हे देवी! आपले शील दुराचाऱ्यांच्या वाईट वागण्यालाही दुर करणारे आहे. याच समवेत आपले हे रुप असे आहे कि जे कधीच चिंतन करुन ही दृष्यमान होत नाही ज्याची तुलना दुसऱ्या कशाची ही होऊ शकत नाही. तसेच आपले बल आणि पराक्रम त्या दैत्यांचाही नाश करणारे आहे ज्यांनी कधी देवतांच्या पराक्रमाला नष्ट केले होते. या प्रकारे देवी आपण आपल्या शत्रुंवर ही दयाच प्रक; केली आहे.

हे नित्य वर प्रदान करणारी देवी! आपल्या या पराक्रमाची कशासोबत तुलना होऊ शकते..? शत्रुंना भय प्रदान करणारे व अत्यंत मनोहर रुप आपल्या शिवाय इतर कोणाचे असू शकते..? ह्रदयात कृपा आणि युध्दात निष्ठुरता हे दोन विभिन्न गुण या तीन लोकांत केवळ आपल्याकडेच पहायला मिळतात.

हे माते! आपण सर्व दैत्यांचा नाश करुन समस्त त्रीलोकांची रक्षा केली आहे. त्या शत्रुंनाही आपण रणांगणात मारुन स्वर्गलोकातच पोहचविले आहे. तसेच उन्मत्त दैत्यामुळे जे भय आम्हा देवगणांमध्ये निर्माण झाले होते ते भय ही आपण दूर केले आहे. आपणास आम्ही नमसकार करतो!

देवी! आपण आपल्या शूलाद्वारे आमचे रक्षण करावे! हे अंबिके, आपल्या खड्गाच्या माध्यमातुन आमचे रक्षण करावे! घंटेचा ध्वनि आणि धनुष्याच्या नादानेही आपण आमचे रक्षण करावे. चंडिके, पुर्व-पश्चिम -दक्षिण दिशेला आपण आमची रक्षा करावी व त्रिशुलाला फिरवून आपण उत्तर दिशेलाही आमची रक्षा करावी. तीन ही लोकात आपले परम सुंदर आणि अत्यंत भयंकर असे दोन्ही रुप विचरण करतात त्या दोन्ही शक्तिने ही आपण आमची व समस्त भूलोकाची रक्षा करावी. हे अंबिके आपल्या करकमलात शोभायमान असणारे हे खड्ग, शूल आणि गदा आदि जे सर्व अस्त्र आहेत त्या सर्व अस्त्र -शस्त्रांच्या साह्याने आपण समस्त देवतांचे रक्षण करावे.

**ऋषिरुवाच :-**

या प्रकारे जेव्हा इंद्रादि देवतांनी जगन्माता दुर्गादेवीची स्तुति केली आणि नंदनवनातील दिव्य पुष्प आणि दिव्य गंध-चंदन द्वारे देवीची पूजा केली व सर्व देवतांनी मिळून जेव्हा भक्तिपुर्वक दिव्य धुपाचा सुगंध देवीला अर्पण केला तेव्हा देवीने प्रसन्नवदन होऊन नतमस्तक झालेल्या सर्व देवतांना सांगितले,

**देव्युवाच :-**

हे देवता गण, आपण माझ्याद्वारे ज्या वस्तुची अभिलाषा ठेवतात ती गोष्ट मागावी!

**देवा ऊचु: :-**

हे माते, आपण आमच्या सर्व इच्छा पुर्ण केल्यात आता काहीच मागण्यासारखे उरले नाही. कारण समस्त देवतांचा शत्रु असणारा महिषासुराचा आता आपल्या हस्ते संहार झाला आहे. हे माहेश्वरी हे प्रचंड कार्य करुन आम्हाला भय मुक्त करुन आपण तरीही आम्हाला वर देऊ ईच्छीता.तर आम्हाला केवळ एकच वर प्रदान करावा, आम्ही जेव्हा जेव्हा आपले स्मरण करु तेव्हा तेव्हा आपण दर्शन देऊन आमचे संकट दुर करावे. हे प्रसन्न मुखी अंबे! जो मनुष्य या स्तोत्राद्वारे आपली स्तुति करेल त्यास आपण वित्त, समृध्दी आणि समस्त वैभव देण्यासोबतच त्याच्या धन आणि स्त्री आदि संपत्तीलाही वाढ होण्याकरिता आपण सदैव आमच्यावर प्रसन्न रहावे!

**ऋषिरुवाच :-**

हे राजन! देवतागणांनी जेव्हा आपल्या आणि जगताच्या कल्याणाकरिता भद्रकालीला या प्रकारे प्रसन्न करुन घेतले ते३व्हा ती समस्त देवतांना आशिर्वाद प्रदान करुन तथास्तु बोलत अंतर्धान पावली. या प्रकारे पुर्वकालात तीनही

लोकांचे हीत व्हावे ही अपेक्षा असणारी देवी ज्या प्रकारे समस्त देवतांच्या शरिरातून प्रकट झाली होती याची सर्व कथा मी सांगितली. आता पुन्हा देवतांवर उपकार करणारी ती देवी दुष्ट दैत्य तसेच शुम्भ - निशुम्भ या दानवांचा वध करुन सर्व लोकांची रक्षा करण्याकरिता गौरीदेवीच्या शरिरातून ज्या प्रकारे प्रकट झाली होती त्या प्रसंगाचे मी वर्णन करतो, सर्व प्रसंग आता तू श्रवण कर!

या प्रकारे श्रीमार्कण्डेय पुराणातिल सावर्णिक मन्वंतराच्या कथा अंतर्गत देवी महात्म्यातील शक्रादिस्तुति (इंद्रादि देवतांनी देवीची केलेली स्तुति) नामक चतुर्थ अध्याय पुर्ण झाला.

# पाचवा अध्याय

या अध्यायामध्ये सुमेधा ऋषी ने राजा सुरथ आणि समाधी यांना देवी महात्म्य वर्णन करताना देवतांनी केलेली देवीची स्तुति व चंड - मुंड यांनी केलेली अंबिकाच्या रुपाची प्रसंसा ऐकून शुंभ नामक दैत्याने देवीकडे आपला दूत पाठवला व तो दूत निराश होऊन परतला याचे वर्णन आले आहे.

(पुर्वकाळात शुंभ आणि निशुंभ हे दोन दैत्य पालाळ लोकातून पृथ्वीवर आले. ते दिसायला सुंदर होते. यौवनावस्था प्राप्त झाल्यावर त्यांनी जगत्पावन श्री पुष्कर तीर्थात स्नान करुन अन्न व जल यांचा त्याग करुन कठोर तप आरंभ केले. योगसाधनेत तत्पर राहणाऱ्या या दैत्यांनी एकास सनावर राहून दहा हजार वर्ष घोर तपस्या केली. त्या तपाने वर प्रदान करण्याची इच्छा असणारे प्रजापति ब्रह्मा त्यांना प्रसन्न झाले. उभयतांनी ब्रह्म देवाला अमरत्वाचा वर मागितला, मात्र जन्म- मृत्यु हे अचल चक्र असुन भगवान विष्णुने जगत पालनाकरिता हे निर्धारित केले आहे त्यामुळे अमरत्वाच्या वरदानाला त्यांनी असमर्थता दर्शविली. तेव्हा दोन्ही भावांनी विचार करुन वर मागितला कि, आम्हाला देवता-मनुष्य, मृग-पक्षी या पैकी कोणत्याही पुरुषाजातीकडून मृत्यू नको. चराचर त्रिलोकांत आम्ही कोण्याही स्त्रीला घाबरत नाही. त्यामुळे कोणीही स्त्री आमचा संहार करु शकणार नाही.ब्रह्माजी वरदान देऊन स्वस्थानी गेले. नंतर या दोन्ही दानवांनी शुक्राचार्य यांना आपले आपले पुरोहित बनविले. शुक्राचार्याने आपल्या शुक्रबुध्दीने शुंभ दैत्याला योग्य समयी राजसिंहासनावर बसविले. त्यानंतर शुक्राचार्यांनी एक एक करत चंड-मुंड, धुम्रलोचन, रक्तबीज आदि सर्व दैत्य सैन्याला शुंभाच्या छत्राखाली एकत्र केले. या सर्व असूरांनी आपल्या बळाच्या घमेंड मुळे शचिपति इंद्राच्या हातून तीन लोकांचे राज्य आणि सर्व देवतांचे यज्ञभाग काढून स्वत: शुंभ त्या सर्व यज्ञाचा उपभोग घेऊ लागला. - श्रीमद्देवी भागवत पंचम स्कंद अध्यात २१)

**।। विनियोग:।।**

पंचम अध्यायापासून उत्तर चरित्र आरंभ होते. या उत्तर चरित्राचे ऋषि रुद्र असुन श्री महासरस्वती ही या चरित्राची अधिष्ठात्री देवता आहे. व्याकरणाच्या अनुष्टुप् नामक छंदामध्ये या अध्यायाच्या श्लोकांची निर्मिती झाली आहे. महादेवी ची भीमा नामक शक्ति या चरित्राची रक्षणकर्ति देवता आहे. भ्रामरी हे चरित्राचे बीज असुन सुर्य हे तत्व आहे तथा सामवेदाप्रमाणे पवित्र असे हे चरित्र आहे. अर्थात सामवेद स्वरुप आहे. श्रीमहासरस्वती देवीच्या प्रसन्नतेकरिता उत्तर चरित्राच्या जपाचा विनियोग केला जातो.

**।।ध्यानम् ।।**

जीने आपल्या करकमलात घंटा, शूल, नांगर, शंख, मूसळ, चक्र, धनुष आणि बाण धारण केले आहे, शरद ऋतुसमान शोभासंपन्न चंद्राप्रमाणे ज्यांची मनोहर कांती आहे, जी तीनही लोकांची आधारभुता आहे आणि शुंभादि दैत्यांचा नाश करणारी तसेच गौरीच्या शरिरातुन जीचे प्राकट्य झाले आहे. त्या महासरस्वती देवीचे मी निरंतर भजन करतो.

**ऋषिरुवाच :-**

पूर्वकाळात शुंभ आणि निशुंभ नामक असूरांनी आपल्या बळाच्या घमेंड मुळे शचिपति इंद्राच्या हातून तीन लोकांचे राज्य आणि देवतांचे यज्ञभाग काढून घेतला. तसेच ते दोन राक्षस सूर्य, चंद्र, कुबेर, यम आणि वरुण यांचे अधिकार ही सवत:च उपभोगू लागले. वायू आणि अग्नि यांचे कार्यही तेच करु लागले. त्या दोन असुरांनी सर्व देवतांना अपमानित, राज्यभ्रष्ट, पराजित आणि आधिकारहीन करुन स्वर्गातून हाकलून दिले. त्या दोन महान असुरांच्या द्वारे तिरस्कृत देवता गणांनी महादेवी अपराजिताचे स्मरण केले व विचार करु लागले, भगवती जगदंबेने वर दिला होता कि. आपत्तीकाळात स्मरण करताक्षणी मी आपल्या सर्व आपत्तींचा तत्काळ नाश करेल। हा विचार

करत देवतागण गिरिराज हिमालयावर गेले आणि तेथे त्यांनी भगवती विष्णुमायाची स्तुति आरंभ केली.

**देवाऊचु: :-**

देवीला नमस्कार असो! महादेवी शिवा ला सदा नमस्कार असो! प्रकृति स्वरुप आणि नित्य कल्याण करणाऱ्या(भद्रा) अंबिकेला नमस्कार असो! आम्ही देवतागण विनयपुर्वक जगदंबेला नमस्कार करतो! रौद्राला नमस्कार असो! नित्या, गौरी तसेच धात्रीला वारंवार नमस्कार असो! ज्योत्स्नामयी, चंद्ररुपिणी व सुखस्वरुपा देवीला सतत प्रणाम असो! शरणागतांचे कल्याण करणाऱ्या वृध्दि व सिध्दरुपा देवीला नमस्कार असो! नैऋति (राक्षसांची लक्ष्मी व नैऋत्य दिशेची अधिपती असणारी देवी), राजलक्ष्मी (राजालोकांची कक्ष्मी असणारी देवी), शर्वाणी (शिवाची पत्नि), स्वरुपा जगदंबा आपणास नमस्कार असो! दुर्गा, दुर्गपारा (दुर्गम संकटातुन सावरणारी), सारा(सर्व जगताची सारभूता), सर्वकारिणि, ख्याति, कृष्णा आणि धूम्रादेवीला सदा नमस्कार असो! अत्यंत सौम्य तसेच अतिरौद्र रुप धारण करणाऱ्या देवीला आम्ही नमस्कार करतो! जगताची आधारभूता कृतिदेवीला वारंवार नमस्कार असो!

जी देवी सर्व प्राणिमात्रामध्ये विष्णुमायानावाने प्रसिध्द आहे तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये चेतना रुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये बुध्दि रुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये निद्रा रुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये क्षुधा रुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!!

जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये छाया रुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये शक्ति रुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये तृष्णा रुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये क्षमा रुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये जातिरुपाने (विविधता) राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये लज्जारुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये शांतिरुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये श्रध्दा रुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!!

जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये कांतिरुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये लक्ष्मीरुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये वृत्तिरुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये स्मृति रुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये दया रुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये तुष्टीरुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये मातारुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!! जी देवी सर्व प्राणि जनांमध्ये भ्रांतिरुपाने राहते तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार

नमस्कार असो!!

जी जीवाच्या इद्रियवर्गाची अधिष्ठात्री आहे तसेच सर्व प्राण्यामध्ये सर्वव्याप्त आहे त्या व्याप्तिदेवीला नमस्कार असो! जी देवी चैतन्यरुपाने या संपुर्ण जगताला व्याप्त करुन उरली आहे, तिला नमस्कार असो! तिला नमस्कार असो! तिला वारंवार नमस्कार असो!!

पुर्वकाळात आपल्या इच्छित कामनाच्या पुर्तिकरिता देवतांनी ज्या देवीची स्तुति केली होती तसेच देवराज इंद्राने अनेक दिवस जिचे स्तवन केले, पुजन केले ती कल्याणकारी ईश्वरी आमचे कल्याण व मंगल करो तसेच सर्व प्रकारच्या आपत्तींना दुर करो! महाबळी दैत्याद्वारे सतवले गेलेले आम्ही देवतागण ज्या परमेश्वरीला या क्षणी नमस्कार करतो, तसेच विनम्र होऊन भक्ति करणाऱ्या पुरुषाद्वारे स्मरण करताक्षणी तत्काळ संपुर्ण आपत्तींचा नाश करणारी जगदंबा आमचे घोर संकट दुर करो!

**ऋषिरुवाच :-**

हे राजन! या प्रकारे देवतागण स्तुति करत होते तेव्हा पावर्तीदेवी गंगाजलात स्नान करण्याकरिता तेथे आली. सुंदर भुवया असणाऱ्या भगवतीने सर्व उपस्थित देवता गणांना विचारले, आपण या ठिकाणी कोणाची स्तुति करत आहात..? तेव्हा पार्वती च्या शरीर कोषातून प्रकट झालेली शिवादेवी बोलु लागली, शुंभ दैत्याद्वारे त्रासले गेलेले आणि युध्दामध्ये पराजित झालेले सर्व देवता गण एकत्र येऊन माझीच स्तुति करत आहेत. पार्वतीच्या शरीरकोषातून अंबिकेची उत्पत्ती झाली होती म्हणुन ती देवी समस्त लोकांत कौशिकी या नावाने प्रसिध्द झाली. कौशिकीच्या प्रकट झाल्यानंतर पार्वती देवीचे शरीर काळे रंगाचे झाले त्यामुळे ती हिमालयावर राहणाऱ्या कालिका देवीच्या रुपात विख्यात झाली. त्यानंतर शुंभ निशुंभ यांचे बंधुगण चंड-मुंड त्या ठिकाणी आले व त्यांनी परम मनोहर रुप धारण करणाऱ्या अंबिकाला पाहिले. नंतर ते दैत्यराज शुंभाकडे झाऊन बोलले, महाराज! एक अत्यंत ममोहर स्त्री जी आपल्या दिव्य कांतीने सर्व हिमालयाला प्रकाशित करत आहे. या प्रकारचे उत्तम रुप आज पर्यंत कोणीही कुठेही पाहिले नसेल. असुरेश्वर! शोध घ्यावा कि देवी कोण आहे व तिला आपण आपलेसे करावे. समस्त स्त्रीयांमध्ये ती एक रत्नाप्रमाणच वाटते. तिचे प्रत्येक अंग सुंदर आहे. तसेच ती आपल्या कांतीने सर्व हिमालयात प्रकाश पसरवत आहे. दैत्यराज! आताही ती हिमालयातच उपस्थित आहे, आपण पाहू शकता. हे प्रभो, तीन लोकांत जे काही मणि, हत्ती व घोडे आदि रत्न आहेत ते सर्व या समयाला आपल्याच घराची शोभा वाढवत आहेत. इंद्राचा सर्वात प्रिय हत्ती ऐरावत, हा पारिजातकाचा वृक्ष, तसेच उच्चै:श्रवा घोडा हे सर्व मंथनसमयी प्राप्त झालेले रत्न आपण इंद्राकडून घेतले आहेत. हसं जोडले आहे असे विमान ही आपल्याच अंगणाची शोभा वाढवत आहेत. हे रत्नजडित अद्भुत विमान पहिले ब्रह्माजीच्या जवळ होते, आता ते आपनाकडे आहे. महापद्म निधि ही आपण कुबेराकडुन खेचुन आणला आहे. समुद्रानेही आपणास किंजल्किनी नामक माला प्रदान केली आहे. जी केशराने सुशोभित आहे आणि जिचे कमळ कधिच सुकत नाहीत. सुवर्णाची वर्षा करणारे वरुणाचे छत्रही आपल्याच घराची शोभा वाढवत आहे, जो पहिले प्रजापतिच्या अधिकारात होतें.

दैतेश्वर! मृत्युची उत्क्रांतिदा शक्तिही आपण हस्तगत केली आहे व वरुणाचा पाश आणि समुद्रात उत्पन्न होणारे रत्न ही आपले बंधु निशुंभाच्याच अधिकारात आहेत. अग्निनेही स्वत: शुध्द केलेले वस्त्रही आपल्यासेवेत अर्पित केले आहेत. दैत्यराज या प्रकारे सर्व प्रकारचे मौल्यवान रत्न आपण एकत्र केलेले आहेत. मग समस्त स्त्रीयांमध्ये रत्नाप्रमसणे असणारी ही जी हिमालयात वावरणारी कल्याणमयी देवी आहे ती आपण आपल्या आधिकारात का नाही घेत..?

**ऋषिरुवाच :-**

चंड-मुंडाचे हे वचन ऐकुण शुंभ महादैत्याने आपला सुग्रिव नामकक दूत देवीकडे पाठविला. आणि आपला निरोप दिला, तू माझ्या आज्ञेने त्या सुंदरी समोर माझ्या वैभवाचे सर्व वर्णन कर! आणि असा प्रयत्न कर कि ती स्वत: प्रसन्न होऊन शिघ्र माझ्याकडे आली पाहिजे. तो दूत पर्वताच्या रमणिय प्रदेशात गेला आणि जेथे देवी उपस्थित होती तेथे जाऊन मधुर वचन बोलु लागला.

**दूत उवाच :-**

हे देवी दैत्यराज शुंभ या समयाला तीनही लोकांचे अधिपती आहेत. मी त्यांचाच पाठवलेला दूत आहे. तुझ्या कडे त्यांचा विरोप घेऊन आलो आहे. दैत्यराजाची आज्ञा सर्व देवतांनाही मानने क्रमप्राप्तच आहे. त्याच्या आज्ञेचे कोणी उलंघन करुच शकत नाही. त्यांनी सर्व देवतागणांनाही यूध्दामध्ये जिंकुन घेतले आहे.त्या सर्वशक्तिमान दैत्यराज शुंभाने तुझ्याकरिता एक संदेश दिला आहे. तो ऐक, संपुर्ण त्रिलोक या समयाला माझ्या अधिकारात आहेत. देवता ही माझ्या आज्ञेच्या अधिन आहेत. विश्वात जे काही यज्ञ आदि कर्म होत आहेत त्यात अपर्ण होणाऱ्या आहूत्यांचा उपभोगही सध्या मीच घेत आहे. तीनही लोकांत जे काही श्रेष्ठ रत्न आहेत ते सर्व सांप्रत काळात माझ्या आधिकारात आहेत. देवराज इद्राचे वाहन असणारा ऐरावत हत्ती, जो समस्त गजामध्ये रत्नाप्रमाणे आहे तो माझ्या दाराची  चाकरी करत आहे. त्यामुळे सर्व गजसेना माझ्याच ताब्यात आहेत. क्षीरसागरात मंथन समयाला अश्वांमध्ये जो श्रेष्ठ रत्न असणारा उचै:श्रवा घोडा प्रकट झाला ते देवतांनी माझ्या पायावर समर्पित केला आहे. पयार्ययाने विश्वातील सर्व अश्वसेना माझ्याच अंकित आहे.

हे सुंदरी या शिवायही इतर सर्व रत्नभूत पदार्थ जे पुर्वी देवता, गंधर्व आणि नागलोकांत होते ते सर्व आता माझे अंकित झाले आहेत. देवी आम्ही दैत्य गण तुला संसारातील सर्व स्त्रीयांमध्ये रत्नाप्रमाणे मानतो.त्यामुळे तु आमची अंकित हो, कारण या तीनही लोकांत रत्नांचा उपभोह घेणारे केवळ आम्हीच आहोत. हे चंचल कटाक्ष टाकणारी सुंदरी तू माझ्या किंवा माझा भाऊ असणाऱ्या निशुंभाच्या सेवेमध्ये शिघ्रतेने दाखल हो कारण तू रत्नाप्रमाणेच अनमोल आहेस! माझ्या समवेत तू विवाह संपन्न हो, त्याने तुला अतुलनिय ऐश्वर्याचा उपभोग घेता येईल. आपल्या बुध्दीने विचार करुन तू माझी पत्नी होण्याचे स्विकार कर!

**ऋषिरुवाच :-**

दूताने या प्रकारे दैत्यराज शुंभाचा निरोप प्रदान केल्यावर संपुर्ण जगताची आधारभूता असणारी कल्याणकारी दुर्गादेवीने मनातल्या मानात गंभीर भावात हास्य प्रकट केले आणि दूताला म्हणाली,

**देव्युवाच :-**

हे दूता तुझे वचन सत्यच आहे. यात काहीच मिथ्याभाव नाही. शुंभ हा सांप्रत काळात तीनही लोकांचा स्वामी आहे आणि निशुंभही त्याच्याच समान पराक्रमी आहे. मात्र विवाह विषयक कार्यात मी जी प्रतिज्ञा केली आहे ती मी कशी सोडून देऊ..? मी पुर्वीच आपल्या अल्प बुध्दीच्या प्रभावाने जी प्रतिज्ञा केली आहे ती ऐक, जो कोणी रणसंग्रामात मला जिंकून घेईल आणि माझ्या अभिमानाचा नाश करिल तसेच या जगतात जो कोणी माझ्यासमान बलवान व पराक्रमी असेल तोच माझा स्वामी बनेल! याकरिता माझी इच्छा आहे की दैत्यराज शुंभ किंवा त्यांचे पराक्रमी भाऊ निशुंभ यांनी या ठिकाणी यावे, माझ्या समवेत युध्द करावे मला जिंकुन घ्यावे त्या नंतर मी त्याच्या समवेत शिघ्र पाणिग्रहण करिल, यात विलंबाची काय आवश्यक्ता आहे.

**दूत उवाच :-**

हे देवी, तू घमंडाने भरलेली आहेस माझ्यासमोर या प्रकारे वार्तालाप तू करु नकोस! या तीन लोकांत असा कोण पुरुष आहे जो या शुंभ आणि निशुंभ यांच्या समक्ष ऊभा राहू शकतो..? दैत्या राज तर सोडं पण त्यांच्या

सैन्यासमोर ही अन्य देवतांचा टिकाव लागू शकत नाही मग तू एकटी अबला स्त्री कसा तग धरु शकणार..? ज्या शुंभादि दैत्यांसमोर इंद्रादि देवता युध्दात समोर उभेही राहू शकले नाहीत त्या दैत्यराजासमोर तू स्त्री असुन कशी जाणार..? या करिता तू माझा सल्ला ऐक आणि दैत्यराज शुंभ व त्यांचे पराक्रमी भाऊ निशुंभ यांच्याकडे चल! यामुळे तुझ्या गौरवाची रक्षा होईल. अन्यथा ते केस पकडून तुला फरफटत घेऊन जातील तेव्हा तू स्वत:ची प्रतिष्ठा गमावून बसशिल.

**देव्युवाच :-**

हे दूता, तुझे म्हणणे अगदी बरोबरच आहे, शुंभ बलवान आहे आणि निशुंभ ही महापराक्रमी आहे. पण मी काय करु.? मी न विचार करताच विवाह विषयक प्रतिज्ञा केली आहे. त्यामुळे तू जाऊन दैत्यराज शुंभाला विनयपुर्वक माझा निरोप दे, मग बाघुया जे उचित असेल तेच घडेल!!

**या प्रकारे श्रीमार्कण्डेय पुराणातिल सावर्णिक मन्वंतराच्या कथा अंतर्गत देवी महात्म्यातील देवी-दूत-संवाद नामक पंचम अध्याय पुर्ण झाला.**

# सहावा अध्याय

**ध्यानम्:** सर्वज्ञेश्वर भैरवाच्या अंकीत राहणाऱ्या पद्मवती देवीचे मी चिंतन करतो. जी नागराजाच्या आसनावर बसलेली आहे. नागांच्या फण्यामध्ये सुशोभित असणाऱ्या नाग मन्यांच्या माळामुळे ज्यांची देहलता प्रकाशित झाली आहे. सुर्याप्रमाणे जिचे तेज आहे. तीन नेत्र तिच्या चेहऱ्याची शोभा वाढवितात. जी हातामध्ये माळा, कुंभ, कपाल आणि कमळ धारण करते. तसेच मस्तकावर अर्धचंद्राचा मुकुट सुशोभित आहे अशा पद्मावतीचे मी चिंतन करितो.

**ऋषिरुवाच:-**

देवीचे हे वचन ऐकुन दुताला खुप आश्चर्य वाटले. आणि त्याने दैत्यराजाजवळ जाऊन सर्व हकीकत विस्तारपुर्वक सांगितली. देवीचे वचन ऐकून दैत्यराज क्रोधित झाला आणि आपला सेनापती धुम्रलोचनास बोलला, हे धुम्रलोचन तू शीघ्रगतीने आपल्या सैन्याला घेऊन जा. आणि त्या दृष्ट स्त्रीचे केस पकडुन तिला फरपटत बलपुर्वक माझ्यासमोर घेऊन ये. जर तिचे रक्षण करण्याकरिता कोणी देवता-यक्ष–गंधर्व मध्ये आला तर त्यांचाही संहार करुन तिला घेऊनच ये. **ऋषिरुवाच :-**

दैत्यराज शुंभाची आज्ञा धारण करुन सेनापती धुम्रलोचन दैत्य आपल्या ६०००० असूर सैनिकांना घेऊन देवी समवेत युद्ध करण्याकरिता आला. हिमालयात आल्यावर त्याने देवीला पाहिले व मोठ्या आवाजात गर्जना केली.

अरे ! तु शुंभ आणि निशुंभासमोर चल, जर तू स्व:च्या मर्जीने प्रसन्नतापुर्वक माझ्या स्वामी असणाऱ्या दैत्यराजाजवळ आली नाहीस तर मी बलपुर्वक तुझे केस पकडून तुला फरपटत तुला घेऊन जाईन.

**देव्युवाच :-** तुला दैत्यराजाने पाठवले आहे, तू स्वत:ही बलवान आहेस. तुझ्यासोबत विशाल दैत्य सैन्यही आहे. अशा परिस्थितीमध्ये जर तू मला बळाचा वापर करुन घेऊन जाशील तर मी काय करू शकते?

**ऋषिरुवाच :-** देवीचे असे वाक्य ऐकुन धूम्रलोचन क्रोधित होऊन देवीच्या दिशेने धाऊन आला. त्यावेळी अंबिकेने **हुं** शब्दाचा उच्चार करताक्षणी तो त्या मंत्रांद्वारे उत्पन्न झालेल्या अग्निमध्ये भस्म झाला. त्यानंतर क्रोधाने भरलेली राक्षस सेना आणि अंबिका यांनी परस्परांवर तीक्ष्ण हत्यार व शक्ती यांचा वर्षाव केला. या मध्ये देवीसिंहाने क्रोधात भयंकर सिंहनाद करत आपली आयाळ हालवत असुरांच्या सेनेवर हल्ला चढविला. त्याने काही दैत्याना आपल्या पंजाच्या वज्र प्रहाराने, काहींना आपल्या जबड्याने तर काहीना खाली पाडुन, काहींना आपल्या दाढेने घायाळ करुन मारुन टाकले. त्या देवीसिंहाने आपल्या नखाच्या तीक्ष्ण घावाने कित्येकाचे पोट फाडले आणि पायांच्या प्रहाराने अनेक दैत्यांचे मस्तक धडापासुन वेगळे केले. कित्येकांच्या भुजा आणि शिर कापले व आपल्या आयाळिला हालवत काही दैत्यांचे पोट फाडून रक्त शोषुन घेतले. अत्यंत रागावलेल्या देवीचे वाहन असलेल्या देवी सिंहाने क्षणभरातच असूरांच्या ६०००० सैन्याचा संहार केला. शुंभाला जेव्हा समजले की देवीने धूम्रलोचनास मारले आणि देवि सिंहाने ६०००० सैन्याचा संहार केला तेव्हा दैत्यराजाला खुप क्रोध उत्पन्न झाला आणि त्याचे ओठ कापु लागले. त्याने चंडमुंड नामक दोन दैत्यांना आज्ञा दिली. हे चंडमुंड तुम्ही मोठी दैत्यसेना घेऊन हिमालयात जा आणि त्या देवीचे केस पकडून तिला बंदिस्त करुन इकडे घेऊन या. या प्रकारे देवीला आणताना जर काही समस्या उत्पन्न झाली तर युद्धात सर्व प्रकारच्या अस्त्रं-शस्त्रांचा वापर करुन व समस्त असूर सैन्याचा प्रयोग करुन तिची हत्या करुन टाका. तिची हत्या झाल्यावर व त्या सिहांचाही नाश झाल्यावर त्या अंबिकेला असेल त्या स्थितीमध्ये बांधून माझ्या समक्ष हजर करा.

**याप्रकारे श्री मार्कंडेय पुराणातील सावर्णिक मन्वंतराच्या कथा अंतर्गत देवी महात्म्यामधील धूम्रलोचन वधनामक सहावा अध्याय पुर्ण झाला.**

# सप्तम अध्याय

**ध्यानम्**

मी मातंगी देवीचे ध्यान करतो. ती रत्नमयी सिंहासनावर बसून पठण करणाऱ्या पोपटाचे मधुर वचन ऐकत आहे. तिचे शरीर शामवर्ण आहे . तिने आपले एक चरण कमलावर ठेवलेले असुन मस्तकावर अर्धचंद्र धारण केलेला आहे. कन्हेराच्या फुलांची माला धारण करुन वीणा वादन करीत आहे. तिने अंगात कसलेली चोळी धारण केलेली आहे. लाल रंगाची साडी घातली असुन शंखपात्र हातात घेतले आहे. तिच्या वदनावर मधु प्राशनाचा हलकासा प्रभाव दिसुन येत आहे. तसेच तिच्या ललाटावर सुंदर चमकादार बिंदी शोभायमान आहे.

**ऋषिरुवाच :-**

यानंतर शुंभाची आज्ञा घेऊन ते चंडमुंड दैत्य आपले चतुरंगिनी सैन्य घेऊन शस्त्राने सज्ज होऊन निघाले. गिरीराज हिमालयाच्या सुवर्णमयी उंच शिखराावर पोहोचुन त्या सैन्याने सिंहवाहिनी देवीला पाहिले. ती मंदमंद स्मित करीत होती. देवीला पहाताक्षणी सर्व दैत्यसेना देवीला पकडण्यासाठी प्रयत्न करु लागली. काहींनी धनुष्याला ताणले. काहीनी युद्धाच्या आवेशाने तलवार हाती घेतली. काही असूर देवीच्या जवळ येऊन उभे राहिले तेव्हा अंबिकेने त्या शत्रूवर मोठा क्रोध केला. त्या क्रोधाच्या आवेशाने देवीचे मुख काळे झाले ललाटावरील भुवया क्रोधीत भावाने वक्र झाल्या अणि त्यातुन विक्राळमुख काली प्रकट झाली. जी तलवार आणि हाती पाश घेऊन ऊभी होती. तिने विचित्र खट्वांग धारण केले होते. व चित्याच्या चर्माची साडी घातली होती. नरमुंडमाळा तिच्या गळ्यात होत्या. तिच्या शरीराचे संपूर्ण मास सुकलेले होते. व केवळ हाडांचा सांगाडा दिसत होता. ज्यामुळे तिचे स्वरुप भयंकर दिसत होते. तिचे मुख खुप विशाल होते. जीभ बाहेर असल्याने ती असूर सैन्याला भितीदायक वाटत होती. तिचे डोळेही खोलवर आत गेले होते. व ते लालसर दिसत होते. तिने आपल्या भयंकर गर्जनेने संपुर्ण दिशांना प्रभावित केले होते. मोठमोठ्या दैत्यांचा वध करत ती कालिका देवी प्रचंड वेगाने दैत्य सैन्यावर तुटुन पडली व त्यांना उचलून ती भक्षण करु लागली. रथासह अश्व, अंकुशधारी महावतासह हत्तीही ती हाताने पकडुन आपल्या मुखात टाकु लागली. याप्रकार घोडे-रथ -सारथी यांसह सैनिकांना तिने दाताने चावुन टाकले.

काही असूरांचे तिने केस ओढले तर काहींचा गळा दाबला. काहींना आपल्या पायाखाली तुडवले तर काहींना धक्के मारुन खाली पाडत यमसदनी पाठवले.

कालीदेवी असूरांनी सोडलेले अस्त्र- शस्त्रंही गिळुन टाकत होती आणि रोषाने दाताने चावून त्यांचा भुगा करीत होती. कालीने रणांगणात धुमाकुळ घालत दुष्ट दुरात्मा असूरांची सारी सेना पायदळी तुडवली आणि खाऊन टाकली. तसेच कित्येकांना पळवून लावले. काहींचा संहार तिने आपल्या तलवारीने केला. काहींना खट्वांगाच्या प्रहाराने मारले. काही असूर दातांच्या अग्रभागांच्या प्रभावाने चावले जाऊन मृत्युच्या अधीन झाले. याप्रकारे देवीने असूरांच्या सर्व सैन्याला क्षणभरात नष्ट केले. हे पाहून चंड दैत्य अत्यंत भयानक रुप धारण केलेल्या कालीदेवीच्या दिशेने धावला. तसेच महादैत्य मुंडानेही अत्यंत भयंकर बाणांच्या वर्षावाने तसेच हजारो चक्रांच्या सहाय्याने भयानक नेत्र असणाऱ्या देवीला आच्छादित केले.

ते अनेक चक्र देवीच्या मुखात सामवत असताना असे वाटत होते की, सुर्यमंडलातील प्रकाशकिरण ढगांच्या उदरात प्रवेश करीत आहेत. त्यावेळी भयंकर गर्जना करणाऱ्या कालीने अत्यंत रोषात बिकट हास्य केले. त्यावेळी तिने उघडलेल्या विक्राळ वदनाच्या आतील कठीणतेने दिसू शकणाऱ्या दातांच्या प्रभेने तिचा चेहरा उज्वल दिसू लागला. देवीने फार मोठी तलवार हातात घेऊन **हं** शब्दाचा उच्चार करुन चंडावर धावा केला व त्याचे केस पकडून धड मस्तकावेगळे केले.

चंडाचा संहार झालेला पाहून मुंड देखील देवीच्या दिशेने निघाला. तेव्हा देवीने क्रोधाने तलवारीच्या घावाने त्यालाही धारातीर्थी पाडले.

महापराक्रमी चंडमुंड धारातीर्थी पडलेले पाहून मरणापासून स्वत:ला वाचवणारी असूर सेना धावाधाव करु लागली. त्यानंतर कालीदेवीने चडमुंड यांचे तलवारीने कापलेले शीर हाती घेतले आणि चंडिकेच्या जवळ जाऊन प्रचंड अट्टहास करुन बोलली, हे देवी मी चंडमुंड नामक या दोन महापशूसमान राक्षसांना तुला भेट दिले आहे. आता युद्धामध्ये शुंभ आणि निशुंभ यांचा वध तू स्वत:च कर!

**ऋषिरुवाच :-**

कालीने जे चंडमुंड या दोन महादैत्यांच्या शिरांना चंडीकडे आणले ते पाहून कल्याणमयी चंडीने कालीला मधुर वाणीने सांगितले की, देवी तू चंड आणि मुंड या दैत्य शिरांना माझ्याकडे आणलेस म्हणून यापुढे या जगतात तू चामुंडा या नांवाने ओळखले जाईल.

**याप्रकारे श्री मार्कंडेय पुराणातील सावर्णीक मन्वंतराच्या कथा अंतर्गत देवी महात्म्याचा चंडमुंड वधनामक सातवा अध्याय पुर्ण झाला.**

# अध्याय आठवा

**ध्यानम्**

मी आणिमा आदि सिद्धमयी किरणांनी आवृत्त भवानीचे ध्यान करतो. तिच्या शरीराचा रंग लाल आहे तर नेत्रकमलात करूणा दृष्टीस येते. तसेच तिने हातात पाश अंकुश बाण व धनुष्य आदि अस्त्रं धारण केले आहे.

**ऋषिरुवाच !**

चंड आणि मुंड दोन महादैत्याचा संहार व आपल्या सेनेचाही पाडाव झाला हे ऐकताच दैत्यराज शुंभाच्या मनात खूप क्रोध उत्पन्न झाला. आणि त्यानी दैत्याच्या सर्व सैन्याला युद्ध करण्याला कुच करण्याची आज्ञा केली. तो बोलला आज उदायुध नामक ८६ दैत्य सेनापतींनी आपल्या सैन्यासह युद्ध करण्याकरिता प्रस्थान करावे. तसेच कंबु नामक दैत्याचे सेनानायक आपल्या सेनेसह कुच करा. कालक, दौह्रद , मौर्य आणि कालकेय असुरांनीही युद्धाकरिता तयार रहावे व माझी आज्ञा मिळताच प्रस्थान करावे.

भयानक शासन करणारा असुरराज शुंभ याप्रकारे आज्ञा देऊन हजारो मोठमोठ्या सेनांच्या सोबत युद्ध करण्याकरिता निघाला . त्याची भयंकर सेना पाहून चंडिकेने आपल्या धनुष्याची प्रत्यंचा ओढली आणि त्या झंकाराने पृथ्वीपासून आकाशापर्यंतचा भाग गुंजु लागला. त्यानंतर देवी सिंहाने मोठ्या आवाजात गर्जना केली. अंबिकेने घंटानाद करुन त्या ध्वनीला अजुन वाढविले. धनुष्याच्या प्रत्यंचाचा नाद सिंह गर्जना आणि घंटानाद यामुळे संपूर्ण दिशा भारावल्या . त्या भयंकर नादाने कालीने आपले विक्राळ मुख अजुनच वाढविले. याप्रकारे तीचे एक नांव"विजयीनी " झाले. त्या तुंबळ नादाचा दिव्य ध्वनी कानावर पडताच दैत्यसेनेने चारही बाजुनी चंडिका देवी , देवीसिंह आणि काली देवी यांना घेरले. या बरोबर असूरांचा विनाश आणि देवतांच्या अभ्युदयाकरिता ब्रह्मा-शिव-विष्णु- कार्तिकेय तसेच इंद्र आदि देवांच्या शक्ति ज्या अत्यंत पराक्रम आणि बल यांनी संपन्न होत्या त्या देवतांच्या शरीरातुन बाहेर पडत देवतांच्याच रुपात चंडिका देवीच्या समोर उभ्या राहिल्या. ज्या देवतांचे जसे रुप-वेशभूषा-वाहन होते तशाच साधनांनी प्रकट होत त्या दैवी शक्ति असूरांसोबत युद्ध करण्याकरिता रणांगणात आल्या .

सर्वात प्रथम हंस विमानावर बसुन अक्षमाला आणि कमंडलू धारणकरुन ब्रह्मदेवाची शक्ती प्रकट झाली जिला"ब्रह्माणी " असे म्हटले जाते. भगवान महादेवाची शक्ती वृषभावर आरूढ होऊन हातात त्रिशूल , महानागाचे कंकण धारण करत मस्तकावर चंद्रमा विराजमान असलेली माहेश्वरी प्रकट झाली. कार्तिकेयाची शक्तीरुपा देवी त्यांचेच रुप धारण करत श्रेष्ठ मयुरावर आरूढ होऊन हातात शक्ती घेऊन युद्धाकरता कौमारी आली. याप्रकारे भगवान विष्णूची शक्ती गरुडावर विराजमान होऊन शंख-चक्र -गदा -धनुष्य आणि खड्ग हातात घेऊन वैष्णवी आली. अनुपम्य यज्ञ वराहाचे रुप धारण करुन श्रीहरीची शक्ती वराहाचे शरीर धारण करुण वाराही उपस्थित झाली. नारसिंही शक्ती भगवान नरसिंहाचे शरीर धारण करुन तिथे आली. तिच्या मानेभोवतीच्या आयाळीच्या झटक्याने आकाशातील तारे पडत आहेत असा भास होत होता. इंद्राची शक्ति ऐंद्री हातात वज्रधारण करुन गजराज ऐरावतावर बसून आले. तिचेही सहस्त्र नेत्र होते जसे इंद्राचे रुप होते तसेच ऐंद्रीचेही होते.

त्यानंतर त्या देव शक्तीने घेरलेले भगवान महादेव चंडिकेला म्हणाले," हे देवी माझ्या प्रसन्नतेकरिता शीघ्रतेने या असुरांचा संहार कर. " त्यावेळी देवीच्या शरीरातुन अत्यंत उग्र चंडिका शक्ती प्रकट झाली. जी शेकडो गिधाडांप्रमाणे आवाज करणारी होती. त्या अपराजितादेवीने जटाधारी महादेवाला सांगितले की," भगवान आपण शुंभनिशुंभाजवळ दुत बनून जावे. आणि अत्यंत गर्विष्ट दानव शुंभ निशुभ यांना व त्यांच्या बरोबर जे कोणी दानव युद्ध करण्याकरिता आले आहेत त्यांना माझा संदेश द्यावा . दैत्यगणहो जर तुम्हाला जीवंत रहायचे असेल तर पाताळ लोकात जा. इंद्राला तिन्ही लोकांचे राज्य मिळावे आणि देवाला यज्ञभाग जर बळाच्या घमेंड मध्ये येऊन तुम्ही युद्धाची आशा

बाळगत असाल तर जरूर या. माझ्या योगीणी तुमच्या शरीरातील मांस खाऊन तृप्त होतील."

देवीने भगवान शिवाला दुत कार्याकरता नियुक्त केले होते. म्हणुन ती" शिवदूती " या नावाने विख्यात झाली. ते महादैत्यही शिवाच्या मुखातील वचन ऐकून क्रोधीत झाले. आणि ज्याठिकाणी कात्यायणी विराजमान होती त्यादिशेने अग्रेसर झाले. त्यानंतर ते असूर आवेशात येऊन देवीवर बाणशक्ती आणि उतर अस्त्रांची वृष्टी करू लागले. देवीनेही धनुष्य हाती घेऊन अनेक बाणांचा वर्षाव केला. त्यामुळे दैत्यांनी चालवलेले अस्त्रं नष्ट होऊन गेले. त्यानंतर काली अग्रभागी जाऊन शत्रू सैन्याला शूलाच्या प्रहाराने विदीर्ण करू लागली. तसेच खट्वांग घेऊन रणभूमीवर फिरु लागली.

ब्रह्माणीही ज्या ज्या दिशेला फिरू लागली त्यात्या दिशेला आपल्या दिव्य कमंडलूतील पाणी टाकून सर्व शत्रू सैन्याचे ओज आणि पराक्रम नष्ट करू लागली. माहेश्वरी त्रिशुलाने आणि वैष्णवी चक्राने तर क्रोधाने भरलेली कौमारी शक्तिने दैत्य सैन्याचा संहार करु लागली. ऐंद्रीच्या वज्र प्रहाराने विदीर्ण झालेले शेकडो दैत्य दानव रक्ताच्या थारोळ्यात पडले. वाराहीने आपल्या श्वासाच्या प्रभावाने अनेक दैत्यांचा नाश केला. अनेक दैत्य तिच्या चक्र प्रहाराने विदीर्ण होऊन खाली पडू लागले.

नारसिंही सुद्धा आपल्या नखांच्या प्रहाराने सर्व दैत्यांना विदीर्ण करु लागली. तिच्या सिंहनादाने त्या रणांगणातील आकाश गर्जून गेले. कितीतरी असूर शिवदूतीच्या प्रचंड उत्साहाने अत्यंत भयभीत होऊन पृथ्वीवर पडू लागले. त्यावेळी शिवदूतीने त्यांना आपला घास बनवला.

याप्रकारे क्रोधाने भरलेल्या मातृगणांनी नाना माध्यमातुन मोठमोठ्या असूरांचे मर्दन केले. तर काही दैत्य सैनिक पळून जाऊ लागले. मातृकांच्या द्वारे त्रासलेले दानव पळून जाताना पाहून रक्तबीज नामक महादैत्य क्रोधाने पेटुन ऊठला व तो युद्ध करण्याकरता आला. त्याच्या शरीरातील रक्ताचे थेंब जमीनीवर पडले की, त्या प्रत्येक थेंबापासुन त्याचप्रमाणे शक्तीशाली महादैत्य उत्पन्न होत होता. महासुर रक्तबीज हातात गदा घेऊन ऐंद्री समवेत युद्ध करु लागला. त्यावेळी ऐंद्रीने आपल्या वज्राने त्याच्यावर प्रहार केला. त्या प्रहाराने त्याच्या शरीरातील रक्तांच्या धारामुळे त्याच्या समान पराक्रमी राक्षस उत्पन्न होऊ लागले. ते सर्वच रक्तबीजाप्रमाणे वीर्यवान बलवान पराक्रमी होते. ते पृथ्वीवर पडणाऱ्या रक्तातुन निर्माण होणारे पुरुषही अत्यंत भयंकर अस्त्रं शस्त्रं घेऊन मातृकांसोबत युद्ध करु लागले. पुन्हा वज्राच्या प्रहाराने जेव्हा त्याचे मस्तक घायाळ झाले त्यातुन रक्त वाहू लागले त्यामुळे त्यातुन पुन्हा हजारो पुरुष उत्पन्न झाले. वैष्णवीने रक्तबीजावर चक्राचा प्रहार केला. तसेच ऐद्रीने त्या दैत्यसेनापतीला गदेने मारले.

वैष्णवीच्या चक्र प्रहाराने घायाळ झाल्यावर त्याच्या रक्तातुन निर्माण झालेले सहस्त्रं दैत्यामुळे संपुर्ण जग व्यापले गेले. कौमारीने आपल्या शक्तिने, वाराहीने खड्गाने व माहेश्वरीने त्रिशुलाने महादैत्य रक्तबीजाला घायाळ केले. क्रोधाने भरलेलेल्या त्या महादैत्य रक्तबीजाने सर्व मातृकांवर प्रहार केला. शक्ती आणि शुलाने घायाळ झालेल्या त्या असुराच्या शरीरातील रक्तांच्या धारामुळेही शेकडो राक्षस निर्माण होतच होते. याप्रकारे त्या महादैत्याच्या रक्तबीजातुन उत्पन्न झालेल्या त्या राक्षसांमुळे संपूर्ण जग व्याप्त झाले. यामुळे देवगणांना भय उत्पन्न झाले. देवगणांना उदास झालेले पाहून चंडिका कालीदेवीला म्हणाली," हे चामुंडे तु आपले मुख विस्तीर्ण कर व माझ्या शस्त्रापातातुन पडणारे रक्ताचे थेंब व त्यातुन उत्पन्न होणारे महादैत्य तु आपल्या विक्राळ मुखात सामावून घे. याप्रकारे रक्ताद्वारे उत्पन्न होणारे महादैत्यांचे भक्षण करीत तु रणभूमीवर फिरत रहा. असे करुन त्या दैत्याचे सगळे रक्त नष्ट झाल्यावर तो मृत्युमूखी पडेल व त्यानंतर नवीन राक्षस उत्पन्न नाहीत." यानंतर चंडिकेने रक्तबीजावर शुलाचा प्रहार केला. कालीने आपल्या मुखाने त्याचे रक्त प्राशन केले ,तेव्हा त्याने चंडिकेवर गदा प्रहार केला.परंतु

देवीला कोणतीही वेदना झाली नाही रक्तबीजाच्या घायाळ झालेल्या शरीरातुन बराच रक्तस्त्रावं झाला. आता रक्त पडताच चामुंडा ते आपल्या मुखात घेऊ लागली. रक्त पडल्याने कालीच्या मुखात जे राक्षस निर्माण झाले त्यांनाही तिने ग्रहण केले व रक्तबीजाचेही रक्तही प्राशन केले. त्यानंतर देवीने रक्तबीजाल खड्ग-वज्र बाण आदिंच्या प्रहाराने मारुन टाकले.

हे राजन याप्रकारे अनेक शस्त्रांनी आहात व रक्तहीन झालेला महादैत्य पृथ्वीवर पडला. यामुळे सर्व देवतांना अत्यंत आनंद झाला व मातृकागण आनंदित होऊन नृत्य करु लागल्या.

**याप्रकारे श्री मार्कंडेय पुराणातील सावर्णीक मन्वंतराच्या कथा अंतर्गत देवी महात्म्यामध्ये रक्तबीज वधनामक आठवा अध्याय पुर्ण झाला.**

# अध्याय नववा

**ध्यानम्**

मी अर्धनारीश्वराच्या स्वरुपाला निरंतर शरण जातो त्यांची कांती लाल आणि सुवर्णाप्रमाणे रक्त-पित आहे. तो आपल्या भुजांमध्ये सुंदर अक्षमाला, पाश, अंकुश आणि वरद मुद्रा धारण करतो. अर्धचंद्र त्यांचे आभूषण आहे. तसेच ते तीन नेत्रांनी सुशोभित आहेत.

राजोवाच

हे भगवन् आपण रक्तबीजाच्या वधाशी संबंध असणारे देवी चरित्राचे हे अद्‌भूत महात्म्य कथन केले. आता रक्तबीजाच्या वधानंतर क्रोधाने भरलेल्या शुंभ आणि निशुंभांनी जे कर्म केले ते जाणण्याची माझी ईच्छा आहे.

ऋषीरुवाच

हे राजन् त्या महारणसंग्रामात रक्तबीजाच्या वधानंतर शुंभ आणि निशुंभांना खुप क्रोध आला. आपल्या महाविशाल सेनेचा पाडाव झालेला पाहुन निशुंभाने अहंकाराने देवीच्या दिशेने सेनेला सोबत घेऊन कुच केले. त्याच्या पाठीमागे-पुढे चारही बाजुस असूर होते, ते क्रोधाने ओठ चावत देवीवर हल्ला करण्याकरिता आले होते. महापराक्रमी शुंभ दैत्यही आपल्या असूर सैन्यासह मातृकांसोबत युद्ध करुन क्रोधाने चंडिकेला मारण्यासाठी रणांगणांत आला तेव्हा देवीचा शुंभ-निशुंभासोबत घनघोर महासंग्राम सुरु झाला.ते दोन दैत्य मेघाप्रमाणे देवीच्या दिशेने बाणांचा वर्षाव करु लागले. त्या दोघांनी चालवलेले बाण देवीने आपल्या बाणसमुहाने नष्ट केले. आणि आपल्या शस्त्रांचा वर्षाव करत त्या दोघांना क्षतीग्रस्त केले.

निशुंभाने आपली धारदार तलवार आणि चमकणाऱ्या ढालीच्या सहाय्याने देवीसिंहाच्या मस्तकावर प्रहार केला. आपल्या वाहनावर हल्ला केल्याचे पाहून रागावलेल्या महादेवीने “क्षुरप्र ” नामक बाणाच्या सहाय्याने निशुंभाची तलवार आणि अष्टचंद्र असणारी ढाल क्षणार्धात नष्ट केली. ढाल-तलवार नाश पावताच असुराने शक्ती नामक अस्त्रं देवीच्या दिशेने चालवले मात्र ते देवीने आपल्या चक्राच्या सहाय्याने त्याचे दोन तुकडे केले. याप्रकाराने निशुंभ दैत्य रागाने पेटुन उठला आणि त्याने देवीला मारण्याकरिता शुलाचा वापर केला. मात्र तो शुल देवीच्या समीप येताच तिने आपल्या वज्रमुष्ठीने त्याचा नाश केला . तेव्हा त्याने आपली गदा देवीच्या दिशेने फेकली मात्र देवीच्या त्रिशुलाच्या प्रभावाने ती लगेचच भस्म झाली. त्यानंतर दैत्यराज निशुंभ परशु घेऊन देवीच्या दिशेने वार करण्यासाठी निघाला मात्र त्याला येताना पाहताच देवीने बाण समुहाच्या प्रभावाने घायाळ करुन धरतीवर लोळविले.(निशुंभ मुर्च्छित झाला.)

निशुंभाचा पाडाव झाला हे पाहून दैत्यराज शुंभाला राग अनावर झाला व तो अंबिकेचा वध करण्याकरिता पुढे सरसावला. रथावर बसुनच तो आपल्या उत्तम आयुधांनी सुशोभित आठ भुजांनी संपूर्ण आकाशाला आवृत्त करणारी अद्‌भूत शोभा पाहू लागला. त्याला आपल्या दिशेने आलेला पाहून महादेवीने दिव्य शंखनाद केला आणि धनुष्याची प्रत्यंचा तानुन अत्यंत उज्वल ध्वनी केला. त्याच समवेत समस्त दैत्य सैन्याचे तेज नष्ट करणाऱ्या घंटानादाने सर्वदिशा व्याप्त झाल्या. त्यानंतर देवी सिंहाने सर्व मदमस्त हत्तींचा मद दुर करणारी सिंहगर्जना केली. त्यामुळे आकाश -पृथ्वीसह दशदिशा भारावून गेल्या. कालीने आकाशाच्या दिशेने झेप घेऊन त्याच वेगाने पुन्हा पृथ्वीकडे येत दोन्ही हातांनी पृथ्वीवर तीव्र आघात केला, त्यातुन एक भयंकर ध्वनी उत्पन्न जाला. त्यामुळे घंटानाद-सिंहगर्जना आणि शंखनादामुळे उत्पन्न झालेले नाद शांत झाले. यानंतर शिव दुतीने समस्त दैत्य सैन्यांना अमंगलकारक ठरतील अशा स्वरुपाचा बीज मंत्राचा ध्वनी केला. ते शब्द ऐकुण सर्व असुरगण भितीने कापु लागले. मात्र शुंभाला क्रोध झाला देवीने त्यावेळी शुंभाला उद्देशून हे शब्द उच्चारल “ हे दुरात्म्या थांब ! ” त्यावेळी

संपूर्ण अद्भूत दृष्य पाहणाऱ्या देवतांनी देवीचा जयजयकार केला.

शुंभाने ज्वालांनी युक्त अत्यंत भयानक शक्ति अस्त्रं देवीच्या दिशेने चालविले. अनिमय पर्वताच्या समान देवीच्या दिशेने येणारी शक्ती देवीने दूर हटवली. तेव्हा शंभाचा सिंहनाद तिनही लोकांत दुमदुमला. त्याच्या प्रतिध्वनीने वज्रपातासम आवाज झाला. त्या आवाजाने सर्व शब्दांना मोहित करुन टाकले. शुंभाने सोडलेल्या बाणांचे देवीने व देवीने सोडलेल्या बाणांचे शुंभाने शेकडो तुकडे केले. तेव्हा देवीने क्रोधीत होऊन शुंभावर शुलाचा मारा केला. त्या आघाताने मुर्च्छित होऊन तो पृथ्वीवर पडला. तेवढ्यात निशुंभाला चेतना आली आणि त्याने धनुष्य हाती घेऊन काली आणि देवीसिंहावर प्रहार केला. त्यानंतर निशुंभाने दहा हजार हात असलेले रुप घेऊन प्रत्येक हातातील चक्राच्या प्रहाराने देवीला आच्छादित केले. त्यावेळी दुर्गम पिडांचा नाश करणाऱ्या“ दुर्गा ” देवीने बाणांच्या प्रभावाने त्या चक्र आच्छादनाचा नाश केला. निशुंभ आपल्या असूर सैन्याला घेऊन धावला . त्याच वेगाने चंडिकेने तीक्ष्ण धार असलेल्या तलवारीने त्याच्या गदेचे तुकडे केले. तेव्हा त्याने शुल हाती घेतले. देवतांना दु:ख देणाऱ्या त्या दैत्याला हातात शुल घेऊन आलेला पाहून चंडिकेने वेगाने चालवलेल्या शुलाने त्याच्या छातीचा वेध घेतला. शुलाच्या घावाने विदीर्ण झालेल्या निशुंभाच्या छातीतून एक दुसरा पराक्रमी व महापुरुष थांब थांब बोलत बाहेर आला. त्या निशुंभाच्या छातीतुन बाहेर येणाऱ्या असुराचे शब्द ऐकून चंडिकेने हास्य केले आणि खड्प्रहाराने त्याचे मस्तक धडावेगळे केले. निशुंभ धारातिर्थी पडला.

देवीसिंह आपल्या जबड्याने राक्षसांना चिरडून खाऊ लागला. ते दृश्य अत्यंत भयंकर होते. तिकडे काली आणि शिवदुतीने अनेक दैत्यांचे भक्षण सुरु केले. कौमारीच्या शक्ति अस्त्राने पळू लागले. असंख्य दैत्य माहेश्वरीच्या त्रिशूलाने छिन्नभिन्न होऊन मृत्युमुखी पडले. वाराहीच्या सोंडेच्या आघाताने अनेक दैत्यांचा नाश झाला. वैष्णवीनेही चक्र प्रभावाने दानव सेनेचे निर्दालन केले. ऐंद्रिच्या हातातील वज्रास्त्राने दैत्य सेनेचे प्राण घेतले. काही असुर मारले गेले तर काहीं रणांगणांतुन पळ काढण्यात यशस्वी झाले. तर अनेक काली शिवदुतीचा ग्रास बनले.

**याप्रकारे श्री मार्कंडेय पुराणातील सावर्णीक मन्वंतराच्या कथा अंतर्गत देवी महात्म्यामध्ये निशुंभ वधनामक नववा अध्याय पुर्ण झाला.**

# अध्याय दहावा

**ध्यानम्**

मी मस्तकावर अर्धचंद्र धारण केलेल्या शिवशक्ती भगवती कामेश्वरीचे हृदयात चिंतन करतो. तिचा वर्ण अग्निमध्ये तप्त झालेल्या सुवर्णाप्रमाणे आहे. सुर्य चंद्र अग्नि हे तिचे तिन नेत्र आहेत. तसेच ती आपल्या मनोहर हातामध्ये धनुष्यबाण अंकुश, पाश, आणि शुल धारण केलेले आहे. ऋषिरुवाच हे राजन् आपल्या प्राणांप्रमाणे प्रिय असणारा भाऊ निशुंभ याचा वध तसेच आपल्या असूर सैन्याचा विध्वंस झालेला पाहून कोपीत होऊन शुंभ दैत्य बोलला,“ हे दृष्ट दुर्गे तु बलाचा अभिमान बाळगुन खोटेपणाचा घमंड दाखवू नकोस. तु स्वत:ला मोठी बलवान समजतेस मात्र दुसऱ्या स्त्रियांच्या बळाचे सहाय्य घेऊन तु लढत आहेस.”

देव्युवाच !

“अरे दुष्टा मी तर एकमेवच आहे. या जगतामध्ये माझ्याशिवाय कोण आहे? या मातृगण माझ्याच विभूती आहेत. आणि माझ्याच शरीरातुन उत्पन्न झाल्या आहेत व माझ्यातच समाविष्ट आहेत. ” त्यानंतर ब्रह्माणी आदि सर्व मातृका शक्ति अंबिकेच्या शरीरात लीन झाल्या. व केवळ एकमेव अंबिका देवी उपस्थित राहीली. देव्युवाच मी आपल्या ऐश्वर्य शक्तिने अनेक रुपात येथे उपस्थित झाले होते. आता त्या माझ्या सर्व रुपांना मी माझ्या शरीरात पुन्हा समाविष्ट करुन घेतले. आता एकमेवच युद्धाकरिता उभी आहे. आता तु सुद्धा स्थिर हो.

ऋषिरुवाच !

या नंतर सर्व देवता आणि दानवांच्या समक्ष देवी आणि शुंभ दैत्यामध्ये भयंकर युद्ध आरंभ झाले. बाणांची वर्षा तसेच तीक्ष्ण शस्त्राच्या वापराने व शक्तीशाली शस्त्राच्या प्रहाराने त्या दोघांचे युद्ध समस्त जनांकरता भयानक वाटत होते. त्यावेळी जगन्माता अंबिकेने जे दिव्य अस्त्रं सोडले, दैत्यराज शुंभाने त्यांना निवारक अस्त्रांनी नष्ट केले. तसेच त्याने ज्या अस्त्रांचा प्रहार अंबिकेच्या दिशेने केला त्यांचा तिने केवळ हुंकार शब्दाच्या उच्चारानेच नाश केला. एकूणच या संग्रामात महामाया अंबिका त्याला खेळवत होती. त्यावेळी त्या असूराने बाणांच्या प्रहाराने देवीला आच्छादित केले. हे पाहून क्रोधाने भरलेल्या देवीने अस्त्रंशक्तीच्या मायेने त्या बाणांचा नाश करुन शुंभाचे धनुष्यच नष्ट केले. धनुष्याच्या मात्र देवीने आपल्या चक्र प्रहाराने त्याचे शक्ती अस्त्रचं नष्ट केले तेव्हा शुंभ आपल्या १०० चंद्राच्या तेजाने तळपणारे ढाल व तलवार घेऊन देवीवर चालून आला.त्यावेळी चंडिकेने सोडलेल्या धनुष्य बाणांच्या तीक्ष्ण प्रहाराने त्याची ढाल आणि तलवार नष्ट झाली. त्यानंतर त्या दैत्याचे घोडे आणि सारथी मारले गेले. चंडिकेने धनुष्याचा नाश पुर्वीच केलेला होता. त्यामुळे तो निकराच्या युद्धात आपल्या जवळील मुद्गल अस्त्रं घेऊन देवीच्या दिशेने भिरकावले. देवीने आपल्या बाणांच्या सहाय्याने त्याचे मुद्गल अस्त्रही नष्ट करुन टाकले.हाती कोणतेही शस्त्र न मिळाल्याने तो असुर आता उताविळपणे आपल्या हाताच्या मुठी आवळून देवीच्या दिशेने येऊ लागला. त्याने देवीच्या छातीवर हाताचा मुष्टीप्रहार केला. त्यामुळे देवीला काहीही इजा झाली नाही. मात्र देवीने जेव्हा त्याच्या छातीवर वेगवान हाताने प्रहार केला तेव्हा तो राक्षस भूमीवर पडला. आणि काही वेळातच पुर्ववत ऊठून उभा राहिला. त्याने उडी मारली आणि देवीच्याहीवर आकाशात उभा राहीला. देवी आकाशातही कसल्याही आधाराविना त्याच्याशी युद्ध करु लागली. ते दोघे परस्परांशी युद्ध करु लागले होते. ते युद्ध उपस्थित सिद्ध आणि मुनीजनांनाही संभ्रमात टाकणारे होते. अंबिकेने आकाशात त्याच्या समवेत बराच काळ युद्ध केल्यानंतर त्याला पकडले गोलगोल फिरवले आणि पृथ्वीच्या दिशेने भिरकावले . पृथ्वीवर पडल्यावरही तो मूर्ख राक्षसराज चंडिकेचा वध करण्यासाठी तिच्या दिशेने धाऊ लागला. समस्त दैत्यांचा राजा दुरात्मा शुंभाला आपल्याकडे येताना पाहून देवीने त्याच वेगात दिव्य त्रिशूलाचा प्रहार त्याच्या छातीवर केला. त्यामुळे तो राक्षस छिन्नभिन्न होऊन मरण

पावला.
शुलाच्या प्रभावाने घायाळ झालेले त्याचे शरीर जेव्हा निर्जीव होऊन जमीनीवर पडले त्या क्षणाला समुद्र-द्वीप-पर्वतांसह सर्व पृथ्वी भूकंप झाल्याप्रमाणे हादरली. देवीने शुंभाचा वध केल्यानंतर संपूर्ण पृथ्वी पूर्णत: स्वस्थ झाली आणि सर्वजण प्रसन्नचित्त झाले. पुर्वी जे उत्पादकारी मेघ आणि उल्कापात होतहोते ते सर्व शांत झाले. त्या दैत्याचा नाश होताच नद्याही पुर्ववत मार्गाने वाहू लागल्या.

शुंभाच्या मृत्युनंतर सर्व देवतांचे हृदय हर्षोल्हासित झाले आणि गंधर्वगण मधूर गीत गाऊन वातावरण प्रसन्न करू लागले. काहींनी विविध वाद्ये वाजविली, अप्सरा आनंददायी अंत:करणाने नृत्य करु लागल्या. वायु मंडल पवित्र आणि शुद्ध झाले. सुर्याचेही तेज शुद्ध झाले. अग्निशाळामध्ये विझलेला अग्नि पुन्हा पुर्ववत झाला. संपूर्ण दिशांमध्ये युद्धसमयी जो विचित्र कोलाहल माजला होता ते भयंकर शब्द शांत झाले.

**याप्रकारे श्री मार्कंडेय पुराणातील सावर्णीक मन्वंतराच्या कथा अंतर्गत देवी महात्म्यामध्ये शुंभ वधनामक दशम अध्याय पुर्ण झाला.**

# अध्याय अकरावा

**या अध्यायमध्ये सुमेधा ऋषीने राजा सुरथ आणि समाधी यांना देवी महात्म्याचा प्रभाव वर्णन करताना देवतांनी देवीची स्तुति केली आणि देवीने समस्त देवतांना वरदान प्रदान केले याचे वर्णन आले आहे.**

**।। ध्यानम् ।।**

जिच्या शरिराची आभा प्रभातकालीन सुर्याच्या तेजाप्रमाणे आहे. मस्तकावर चंद्राचा मुकुट झळकतो आहे, त्रिनेत्रधारी देवीच्या मुखावर स्मितहास्य छटा शोभा देते, तिने हातात अंकुश, पाश आदि आयुध धारण केले असुन उर्वरित दोन हस्त वरद आणि अभयमुद्रा धारण करणारे आहेत अशा मी भुवनेश्वरी देवीचे ध्यान करतो!

**ऋषिरुवाच :-**

देवीद्वारे महादैत्य अधिपति शुंभाचा वध झाल्यावर इंद्र आदि देवता गण अग्निदेवतेला पुढे करुन कात्यायनी देवीची स्तुती करु लागले. देवतांच्या मनातील इच्छित कार्य सफल झाल्यामुळे समस्त देवतांचे मुखकमल तेजाने झळाळले होते आणि त्या दिव्य तेजाच्या प्रभावाने सर्व दिशा चमकून निघाल्या.

देवता गण बोलु लागले, हे शरणागतांची पीडा दुर करणाऱ्या देवी! तू आमच्यावर प्रसन्न हो! संपुर्ण जगताची माता प्रसन्न हो!! हे विश्वेश्वरी तू या विश्वाची रक्षा कर! हे देवी तूच तर चराचर जगताची अधिश्वरी आहेस. हे देवी तूच या जगताचा एकमात्र आधार आहेस. पृथ्वीच्या रुपात तुच स्थिर राहतेस! तू जो सर्व दैत्यांचा संहार केला आहेस या तुझ्या पराक्रमाची कोणीही बरोबरी करु शकत नाही. तसेच कोणीही हा पराक्रम उल्लंघन करु शकत नाही! हे देवी तूच तर या समस्त जगतातील जलात निवास करुन प्राणी मात्रांची तृषा हरण करुन तृप्ति प्रदान करतेस!

तूच तर अनंत बलसंपन्न वैष्णवी शक्ति आहेस. या विश्व निर्मितीचे मूळ कारण असणारी परा माया तुच आहेस. हे देवी तू या समस्त जगताला मोहित करुन ठेवले आहे. तूझ्या प्रसन्नतेनेच मुमुक्षु जनांना पृथ्वीवर मोक्षाची प्राप्ति होते. देवी संपुर्ण विद्या तुझेच भिन्न भिन्न स्वरुप आहेत. जगतातील प्रत्येक स्त्री मध्ये तुझा अंश आहेच! (प्रत्येक स्त्री तुझीच मुर्ती आहे.) जगदंबे, एकमात्र तुच तर या विश्वाला व्याप्त करुन ठेवले आहे. आम्हा तुझी स्तुती तरी काय करावी. स्तुती करण्याचे जे पदार्थ आहेत त्याच्या पलीकडे तू आहेस. तुच परा वाणी आहे. हे सर्वस्वरुपा देवी तू स्वर्ग आणि मोक्ष प्रदान करणारी म्हणून तुझी याच स्वरुपात स्तुती झाली. तुझ्या स्तुतीकरिता यापेक्षा चांगली उक्ति काय असु शकते? सर्व जनांच्या ह्रदयात बुद्धीरुपात निवास करणारी व स्वर्ग आणि मोक्ष प्रदान करणारी हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो! कला काष्ठादि रुपात क्रमश: अवस्था परावर्तीत करणारी (म्हणजे निसर्गातील विविध अवस्थांना प्रकट करणारी व प्रत्येक वस्तुला एका स्वरुपातून दुसऱ्या स्वरुपात घेऊन जाणारी) तसेच समस्त विश्वाचा उपसंहार करण्यात समर्थ असणारी हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो! हे नारायणी तुच सर्व प्रकारच्या मंगल कार्याला मांगल्य प्रदान करणारी मंगलमयी आहेस! तुच कल्याणदायी शिवा आहेस. सर्वप्रकारच्या पुरुषार्थाला सिद्ध करणारी, शरण येणाऱ्याला वात्सल्य भावनेने शारण्य प्रदान करणारी, त्रिनेत्रधारी गौरी आहेस. तुला नमस्कार असो.

तुच सृष्टी, पालन आणि संहाराची शक्तिभूता, सनातनी देवी, सत्व, रज, तम आदि तीन गुणांचा मुलाधार व सर्व गुणमयी आहेस! हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो! शरण आलेल्या दीन आणि पीडित यांच्या संरक्षणांत संलग्न राहणारी आणि सर्वांच्या पीडा दुर करणारी हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो! ब्रह्माणीचे रुप धारण करुन हंसाने सजवलेल्या विमानावर बसुन दर्भ मिश्रीत जल प्रोक्षण करणारी हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो! माहेश्वरी रुपाने त्रिशुल, चंद्र व सर्प यांना धारण करणारी महान वृषभावर आरुढ असणारी हे नारायणी देवी!

तुला नमस्कार असो! मोर आणि कुक्कुट (कोंबडा) यांच्यासह विवरणारी व सर्वशक्ति अस्त्रं धारण करणारी, निष्पाप कौमारी रुपधारी हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो! शंख, चक्र, गदा आणि शार्ङ्ग:धनुष हे उत्तम आयुध धारण करणारी हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो! हातात भयानक महाचक्र घेऊन सुळ्यावर धरतीला धारण करणारी वाराही रुप धारिणी हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो! भयंकर नरसिंह रुपात दैत्याचे निर्दालन करणारी व त्रिभुवनाच्या रक्षणाकरीता नारसिंही रुपात संलग्न असणारी हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो! मस्तकावर किरीट आणि हातामध्ये महावज्र धारण करणारी, सहस्त्र नेत्रांमुळे उदीप्त दिसणारी व वृत्रासुराचे प्राण हरन करणारी इंद्रशक्तिरुपा-इंद्राणी- हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो!

शिवदूती रुपात दैत्याच्या महान सैन्यांचा नाश करणारी भयंकर रुप धारण करुन विकट गर्जना करणारी हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो! दंष्ट्र कराल वदन धारण करणारी, मुंडमालांनी विभूषित असणारी मुंडाचा संहार करणारी चामुंडारुपा हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो! लक्ष्मी, लज्जा, महाविद्या, श्रद्धा, पुष्टि, स्वधा, ध्रुवा, महारात्री तसेच महा-अविद्यारुपा हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो! मेधा, सरस्वती, वरा (श्रेष्ठातील सर्वश्रेष्ठ), भूति (ऐश्वर्यरुपा), बाभ्रवी (करड्या रंगाची पावर्ती), तामसी(महाकाली), नियता(संयम परायण) व ईशा (सर्वांची अधिश्वरी) रुपिणी हे नारायणी देवी! तुला नमस्कार असो! सर्वस्वरुपा, सर्वेश्वरी तसेच सर्वप्रकारच्या शक्तिने संपन्न दिव्यरुपा दुर्गे देवी सर्व भयापासून तू आमचे रक्षण कर! तुला नमस्कार असो! तीन लोचन धारण करणारी, आपल्या सौम्य मुखाने सर्वप्रकारच्या भयापासून आमचे रक्षण करणारी हे कात्यायनी देवी तुला नमस्कार असो! ज्वालांच्या प्रभावाने विक्राळ दिसणारे अत्यंत व समस्त असुरांचा संहार करणारे, आमच्या भयाचे नाश करणारे असे दिव्य त्रिशुल धारण करणारी हे भद्रकाली तुला नमस्कार असो!

देवी! आपल्या मंगल ध्वनीने संपुर्ण जगताला व्याप्त करत दैत्यांचे तेज नष्ट करणारी तुझी घंटा आमचे सर्व पापांपासुन रक्षण करो जसे एक माता आपल्या पुत्रांची वााईट कर्मापासून रक्षा करते. चंडिके! तुझ्या हातात सुशोभित खड्ग, जे असुरांच्या रक्त आणि चरबीने माखलेले आहे, ते आमचे रक्षण करो! आम्ही तुला नमस्कार करतो!

देवी! तू प्रसन्न झाल्यावर आमच्या सर्व रोगांना नष्ट करतेस आणि कोपित झाल्यावर आमच्या मनोवांछित कामनांचा नाश करतेस! जे लोक तुला शरण येतात त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची विपत्ती येत नाही. तुला शरण आलेला मनुष्य दुसऱ्यांना शरण देऊ शकतो! देवी, अंबिके! तू आपल्या वेगवेगळ्या रुपात प्रकट होऊन स्वत:ला अनेक भागात विभक्त केले व सर्वप्रकारच्या धर्मद्रोही महादैत्यांचा संहार केला, हे कार्य दुसरे कोण करु शकते..? विद्यांमध्ये, ज्ञानाला प्रकाशित करणाऱ्या शास्त्रांमध्ये व वेदांमध्ये तुझ्याशिवाय इतर कोणाचे वर्णन आहे. तुझ्या व्यतिरिक्त दुसरी कोणती शक्ति आहे, जी या चराचर विश्वाला अज्ञानमय घोर अंध:काराने परिपुर्ण ममतारुपी खड्यात निरंतर फिरवत राहते..? जेथे राक्षस, भयंकर विष धारण करणारे साप, शत्रु, लुटारुंची सेना, वनात लागलेली आग तसेच समुद्रामध्ये ही साथ देऊन तू विश्वाची रक्षा करतेस.

हे विश्वेश्वरी! तू विश्वाचे पालन करतेस! तू विश्वरुपा आहेस म्हणून संपुर्ण विश्वाला धारण करतेस! तू भगवान विश्वनाथालाही वंदनीय आहेस. जे लोक भक्तिपुर्वक तुला शरण जाऊन मस्तक झुकवतात त्यांना संपुर्ण विश्वाला आश्रय देण्याची शक्ति प्राप्त होते.

देवी! तू आमच्यावर प्रसन्न हो! जसे या समयाला असुरांचे निर्दलन करुन तू आमची रक्षा केलीस, त्याच प्रमाणे तू आम्हाला सर्वप्रकारच्या शत्रुच्या भयापासून निर्भय कर. सर्व जगताचे पाप नष्ट कर व जगतातील उत्पात आणि पाप कर्माच्या प्रभावाने प्राप्त होणारी महामारी आदि मोठ मोठ्या उपद्रवांना दूर कर!

विश्वाची पिडा दूर करणारी हे महादेवी! आम्ही शारण्य भावाने तुझ्या चरणावर पडलो आहोत, तू आम्हाला प्रसन्न हो! त्रिलोकातील समस्त निवासितांना पुज्य असणारी हे परमेश्वरी! समस्त जनांना वरदान दे!

**देव्युवाच :-**

देवता गण! मी वर देण्याकरिता तयार आहे! आपल्या मनात जी इच्छा आहे तो ईच्छित वर मागून घ्यावा! जगत् कल्याणाकरिता मी तो वर अवश्य प्रदान करीन.

**देवा ऊचुः :-**

हे तीन ही लोकांच्या अखिल ईश्वरी! तू याचप्रकारे तीन लोकांच्या समस्त बाधांना शांत कर! आमच्या सर्व प्रकारच्या कार्यात बाधा उत्पन्न करणाऱ्या शत्रुंचा (शत्रुबुध्दीचा) नाश कर!

**देव्युवाच :-**

हे देवता गण! वैवस्वत मन्वंतराच्या अठ्ठाविसाव्या युगात शुंभ आणि निशुंभ नामक दोन महादैत्य उत्पन्न होतील. तेव्हा मी नंदगोपाच्या घरी त्यांची पत्नी यशोधाच्या गर्भात अवतीर्ण होईल व विंध्याचलात जाऊन राहील आणि त्या दोन असुरांचा नाश करीन! नंतर अत्यंत भयंकर रुपात पृथ्वीवर अवतार घेऊन वैप्रचित्त नावाच्या दानवांचा वध करीन! त्या भयंकर राक्षसांना भक्षण करताना माझे दात दाळींबाच्या फुलाप्रमाणे लाल होतील. तेव्हा स्वर्गलोकात देवता आणि मर्त्य लोकांत मनुष्यगण माझी स्तुती करताना मला **रक्तदंतिका** नांवाने संबोधित करतील!

त्यानंतर जेव्हा या पृथ्वीवर शंभर वर्षापर्यंत वर्षा होणार नाही आणि पाण्याचा अभाव होईल तेव्हा ऋषि मुनिंच्या स्तवनाने प्रसन्न होऊन पृथ्वीवर अयोनिजरुपात प्रकट होईल व आपल्या शंभर नेत्रांच्या साहाय्याने ऋषिमुनिंना पाहील. त्यावेळी मनुष्य माझे शताक्षी नामात स्तवन करतील. हे देवतागण त्यावेळी मी माझ्या शरीरातून उत्पन्न होणाऱ्या भाज्यांतुन समस्त संसाराचे पालन-पोषण करीन. जोपर्यंत वर्षा होणार नाही तोपर्यंत माझ्यातुन प्रकट झालेल्या भाज्याच सर्व प्राण्याची रक्षा करतील. त्यामुळे या कार्यानुसार माझी ख्याती **शाकंभरी** या नांवाने होईल. याच अवतारात मी दुर्गम नामक महादैत्याचा संहार करीन! यामुळेच मी **दुर्गादेवी** या नांवाने प्रसिध्द होईल. त्यानंतर मी जेव्हा भीमारुप धारण करुन मुनिंच्या रक्षणाकरीता हिमालयात राहणाऱ्या राक्षसांचे भक्षण करीन तेव्हा मुनिजन भक्तिने नतमस्तक होऊन माझी स्तुती करतील. तेव्हा मी **भीमादेवी** नांवाने प्रसिध्द होईल. जेव्हा अरुण नामक दैत्य तीन लोकांत उपद्रव निर्माण करील तेव्हा मी तीन लोकांचे रक्षण करण्याकरिता सहा पाय असणाऱ्या असंख्य भ्रमरांचे रुप धारण करुन त्या महादैत्याचा वध करीन! त्या समयाला सर्वजन माझी भ्रामरी नांवाने सर्व बाजूने स्तुती करतील. याप्रकारे जेव्हा -जेव्हा जगतात दानवी बाधा उपस्थित होईल तेव्हा-तेव्हा मी अवतार धारण करुन सर्व शत्रुंचा संहार करीन!

**या प्रकारे श्रीमार्कण्डेय पुराणातील सावर्णिक मन्वंतराच्या कथा अंतर्गत देवी महात्म्यातील देवीस्तुति नामक एकादश अध्याय पुर्ण झाला.**

# अध्याय बारावा

**ध्यानम्**

मी तीन नेत्र असणाऱ्या त्या दुर्गा देवीचे ध्यान करतो. ज्यांच्या अंगाची प्रभा विद्युलतेप्रमाणे आहे. ती सिंहाच्या पाठीवर बसलेली असून (असूरांकरिता) भयंकर रुप धारण करते. हातामध्ये तलवार आणि ढाल घेऊन अनेक कुमारिका त्यांच्या सेवेकरिता उभ्या आहेत ती दुर्गादेवी आपल्या हातात चक्र-गदा-तलवार-ढाल-बाण-धनुष्य-पाश आणि तर्जनीमुद्रा धारण करते. तिचे स्वरूप अग्निमय आहे व मस्तकावर चंद्राचा मुकुट धारण केलेला आहे.

**देव्युवाच !**

हे देवतागण जो एकाग्रचित्त होऊन दररोज स्तुतीद्वार माझे स्तवन करील त्याच्या सर्वप्रकारच्या बाधांचे मी निवारण करेल. जे मधुकैटभाचा नाश, महिषासुराचा वध व शुंभ निशुंभाच्या संहार प्रसंगाचा पाठ करील तसेच अष्टमी, चतुर्दशी, नवमी आदि तिथीना एकाग्रचित्त होऊन भक्तीपुर्वक माझ्या उत्तम महात्म्याचे श्रवण करील त्याला कोणत्याही प्रकारचे पाप लागणार नाही. पापकर्मानंतर उत्पन्न होणाऱ्या आपत्ती व पाप बुद्धीचा नाश होईल त्या श्रद्धावानांच्या घरी कधीच दारिद्र्यता येणार नाही. तसेच त्यांना कधीही प्रेमीजनांच्या विरहाचे दु:ख भोगावे लागणार नाही. त्यांना शत्रूभय- राजभय-लुटारु-शस्त्र-अग्नि व जल यांचेही भय वाटणार नाही. याकरिता सर्वांनी एकाग्रचित्त होऊन भक्तीपुर्वक माझ्या या महात्म्याचा पाठ पठण वा श्रवण करावा. हेच परम कल्याणाचे साधन आहे. माझ्या या महात्म्याच्या प्रभावाने मारामारी वा तत्सम कोणत्याही प्रकारचे उपद्रव होणार नाहीत. तसेच अधिदैविक आधिभौतिक अध्यात्मिक या तीनही प्रकारच्या पापतापांचे उपशमन होईल. माझ्या ज्या मंदीरात भक्तिपुर्वक प्रतिदिन विधिपुर्वक या महात्म्याचा पाठ होत राहील. त्या स्थानाला मी कधीच सोडणार नाही. तेथे माझे नित्य अस्तित्व असेल. जेथे हा पाठ-बलिदान–पुजा-होम तसेच विविध महोत्सवाच्या समयाला माझ्या या चरित्राचा पाठ पठण वा श्रवण केल्यास श्रद्धावान जाणते वा अजानतेपणे जे काही पुजा होमहवन आदि करतील त्याच्या त्या सर्व पवित्रभावाने केलेल्या पुजनात उपचार पद्धतीत काही चुक झाली तरी त्यांच्या श्रद्धाभावाला मी निश्चित ग्रहण करीन. शारदीय नवरात्रात जी महापुजा केली जाते. त्या समयाला जो माझ्या या महात्म्याचा भक्तीपुर्वक पाठ पठण किंवा श्रवण करील तो श्रद्धावान माझ्या प्रसादाने सर्वबाधापासून मुक्त होईल. व त्याचे धनधान्य पुत्रपौत्रादि अभिष्ट सिद्ध होईल.या माझ्या वचनात कणभरही संदेह बाळगू नये.माझ्या या महात्म्याचा पाठ माझ्या प्रभावाने प्रभावित झालेल्या सुंदर चरित्रकथा तसेच युद्धाकरिता मी केलेल्या पराक्रमाचे वर्णन जो कोणी मनुष्य श्रवण करील तो पुर्णत: निर्भय होईल. त्या पुरुषांचे सर्व शत्रू नष्ट होतील त्यांचे कल्याण होऊन सर्व कुळ आनंदी होईल. सर्वत्र सर्वप्रकारच्या शांती कार्यात उत्पन्न होणाऱ्या पिडा तसेच ज्योतिष शास्त्रानुसार ग्रहांद्वारे निर्माण होणाऱ्या सर्व पिडा, दु:ख, स्वप्नादि दोष निवारण करण्याकरिता हे पवित्र महात्म्य श्रवण करावे. बालग्रहांनी पिडीत झालेल्या बालकांकरिता हे महात्म्य शांतीदायक ठरेल. मनुष्य समुदायात फुट निर्माण झाली तर सर्वांना एकत्र करुन मित्रभाव जागृत करणारे हे महात्म्य आहे. हे महात्म्य समस्त दुराचाऱ्यांचे दृष्ट मांत्रिकांचे बल क्षय करणारे असेल. याच्या पाठाद्वारे सर्वबाधा समुलत: निवारण होईल. हे महात्म्य माझ्या सानिध्याचि प्राप्ती करुन देणारे आहे. पुष्प-अर्घ्य-धुप-दीप-गंध आदि उत्तम सामग्रीद्वारा पुजन करण्याने ब्राह्मण भोजनाचा संकल्प करुन होमहवन करुन प्रतिदिन अभिषेक आदि विधी करुन नानाप्रकारचे मिष्टान्न अर्पण करुन एक वर्ष वरील सर्व उपचारांनी माझी आराधना केल्यास मला जेवढी प्रसन्नता प्राप्त होईल तेवढीच प्रसन्नता मला केवळ या चरित्राच्या एकवेळ पाठ श्रवण केल्याने होईल. हे महात्म्य पापांचे हरण करणारे व सर्वप्रकारचे आरोग्य प्रदान करणारे असेल. माझ्या प्रभावाचे वर्णन असणाऱ्या या महात्म्याचे किर्तन समस्त भूतप्रेत

आदिपासून रक्षण व माझे युद्धविषयक चरित्र दुष्ट दैत्याचा संहार करणारे आहे.
याचे श्रवणाने शत्रूभय उरत नाही. हे देवतागण तुम्ही आणि या समस्त ऋषिमुनी व ब्रह्मार्जींनी माझी जी स्तुती केली आहे. त्याचे श्रवण कल्याणकारी बुद्धी प्रदान करणारे आहेत.

वनामध्ये, ओसाड मार्गात, वणव्यात, निर्जनस्थानी, चोर लुटारुनी घेरल्यावर, शत्रुनीं पकडल्यावर किंवा जंगलात सिंह, वाघ, हत्ती पाठलाग करीत असल्यास, कोप प्रदान केल्यावर, महासागराचे मध्यभागी तुफान आलेले असताना, नांव लाटांच्या प्रहाराने डगमगडत असताना, अत्यंत भयंकर युद्धामध्ये शस्त्रांचा प्रहार झाल्यावर किंवा त्याच्या भयंकर वेदनाने पिडीत असताना, सर्वप्रकारच्या दुर्गम भागात बाधांमध्ये जो कोणी माझ्या या चरित्राचे श्रवण पठण करील तो संकटापासून मुक्त होईल. माझ्या प्रभावाने सिंहादि हिंस्त्र पशूंचे भय हिंसक जंतुद्वारा उत्पन्न पिडा यांचा नाश होईल. तसेच लुटारु आणि शत्रुही माझ्या या चरित्राचे श्रवण पठण करणाऱ्या मनुष्यापासुन दुर पळुन जातील.

**ऋषिरुवाच** !

असे बोलुन प्रचंड पराक्रमी आदिमाता चंडिका समस्त देवतांच्या समक्ष अंतर्धान पावली. शत्रूंचा नाश झाला आहे त्या आनंदात समस्त देवगण प्रसन्न अंत:करणाने आपापल्या अधिकाराने कार्य करुन यज्ञ भागातील आहुती ग्रहण करु लागले. सर्व चराचर जगताचा संहार करण्याच्या उद्देशाने उन्मत्त झालेल्या महापराक्रमी शुंभ आणि निशुंभ यांचा नाश झाल्यावर रणांगणातील उर्वरीत दैत्य पाताळ लोकांत पळाले.

हे राजन् याप्रकारे भगवती आदिशक्ती अंबिका देवी नित्य असूनही भक्त कल्याणाचे काज मनी धरुन पुन्हा पुन्हा प्रकट होऊन विश्वाचे रक्षण करते.

हीच सर्व विश्वाला मोहित करणारी आदिमाया आहे. हीच अखिल विश्वाला जन्म देते आणि प्रार्थना करण्याने संतुष्ट होऊन विज्ञान आणि समृद्धी प्रदान करते.

राजन् महाप्रलयाच्या समयाला महामारीचे रुप धारण करणारी ती महाकालीच समस्त ब्रह्मांडामध्ये व्याप्त आहे. किंबहूना संपूर्ण ब्रह्मांडाला व्यापुन उरलेली आहे. तीच वेळोवळी महामारी रूप धारण करते. ती स्वयं अजन्मा असून सृष्टीच्या रुपाने प्रकट होते. ती सनातन तत्व धारण करणारी आदि शक्तीच समयानुसार समस्त जीव मात्रांचे रक्षण करते. मनुष्यांच्या अभ्युदयाच्या समयाला तीच मनुष्याच्या घरात लक्ष्मीरूपात स्थित होऊन त्याची उन्नती करते. आणि त्याच मनुष्याचा श्रद्धाभाव कमी होऊन अभावाची स्थिती उत्पन्न झाली की तीच दरिद्रताचे रुप धारण करुन विनाशाचे कारण बनते. पुष्प धूप आणि गंध आदिनी पुजन करुन देवीची स्तुती केल्यास धन-पुत्र-धार्मिक बुद्धी व उत्तम गती तीच आदिमाया सद्भक्ताला प्रदान करते.

**या प्रकारे श्रीमार्कण्डेय पुराणातील सावर्णिक मन्वंतराच्या कथा अंतर्गत देवी महात्म्यातील फलश्रुती नामक द्वादश अध्याय पुर्ण झाला.**

# अध्याय तेरावा

**ध्यानम्**

उगवतीच्या सुर्याप्रमाणे कांती धारण करणारी चारभुजा आणि त्रिनेत्र असणारी आपल्या हातामध्ये पाश अंकुश वर आणि अभयमुद्रा धारण करणाऱ्या भगवती शिवा देवीचे मी ध्यान करतो.

**ऋषिरुवाच** !

राजन् याप्रकारे मी तुला देवीचे उत्तम महात्म्य सांगितले. जी या जगताला धारण करते. त्या देवीचा प्रभाव महात्म्य अपरंपार आहे. तीच विद्या उत्पन्न करते. भगवान विष्णुच्या माथास्वरुप असणाऱ्या त्या भगवतीद्वारेच तु हा वैश्य तसेच अनेक विवेक धारण करणारे मनुष्य मोहित झाले आहेत. आणि तिच्या अतुलनीय प्रभावाने यापुढेही मोहित होत रहातील. हे राजा त्याच भावाने परमेश्वरीला शरण जा. अनन्य भावाने आराधना केल्यावर आदिशक्ती भगवती मनुष्याच्या सर्व इच्छित कामनांची पुर्ती करते व तीच पुढे स्वर्ग आणि मोक्ष प्रदान करते.

**मार्कंडेय उवाच !**

क्रौष्टुकी ऋषि, सुमेधा मुनींचे हे वचन ऐकुन राजा सुरथाने उत्तम व्रताचे पालन करणाऱ्या त्या महान महर्षींना प्रणाम केला. राजा सुरथ आणि समाधिनामक वैश्य हे दोघेही समदु:खी होते. एकाचे राज्याचे हरण झाले होते. तर दुसरा ममत्वाच्या भावनेने व्यकुळ झाला होता. चरित्र श्रवण करुन त्यांचे विरक्त भाव जागृत झाले व ते दोघेही तात्काळ तपस्या करण्याकरिता निघाले. जगदंबेच्या दर्शनाची ईच्छा बाळगुन सुरथ राजा आणि समाधि वैश्य नदीच्या तटावर तपस्या करु लागले.

राजाने आणि वैश्याने उत्तम रितीने सनातन देवी सुक्ताचा पाठ केला. त्यांनी नदीच्या तटावर देवीची सुंदर मुर्ती बनवली. पुष्प-धुप आणि हवनादि उच्चार करुण ते दोघेही देवीची आराधना करु लागले. उपासनेमध्ये रत असताना त्यांनी सुरुवातीच्या काळात आहार हळूहळु कमी केला. काही काळानंतर ते पूर्णत: निराहारा राहुन देवीच्या चरणी मन लाऊन एकाग्रभावाने देवीचे चिंतन करु लागले. ते दोघे आपल्या शरीरातील सर्व रजोगुणांचा त्याग स्वरुपात (बलीप्रदान करुन) अखंड तीन वर्षापर्यंत संयम पुर्वक आराधना करु लागले.

त्यावेळी त्यांच्या मनातील भक्तीभाव पाहून कृपा करण्याच्या उद्देशाने चराचर सृष्टीला धारण करणाऱ्या चंडिकेने प्रत्यक्ष दर्शन दिले.

**देव्युवाच** !

हे राजन् तसेच आपल्या कुळ परिवाराला आनंदित करणाऱ्या वैश्य तुम्हाला ज्या गोष्टीची आवश्यकता आहे तो वर मागुन घ्यावा. मी उपासनेने अत्यंत संतुष्ट झाले आहे. आपल्या ईच्छेप्रमाणे वर प्रदान करीन.

**मार्कंडेय उवाच !**

त्यावेळी सुरथ राजाने दुसऱ्या जन्मात न नष्ट होणारे राज्य देवीकडे मागितले. तसेच या जन्मात सकल शत्रुंचा नाश करुन आपण गमावलेले राज्यवैभव पुन्हा प्राप्त होण्याचा वर देवीकडे मागितला.

समाधि वैश्याचे चित्त या संसारातुन खिन्न झाले होते. व तो पुर्णत: विरक्त झाला होता. समाधि अत्यंत बुद्धीमान होता. त्यावेळी त्याने ममता आणि अहंकार रुपी आसक्तीचा नाश करणारे ज्ञान मागितले. देव्युवाच हे राजा तु लवकरच तुझ्या समस्त शत्रुंचा नाश करुन राज्य आणि गत वैभव प्राप्त करुन घेशील. आता तुझे राज्य त्याठिकाणी स्थिर राहील. त्यानंतर याजन्मात तुराज्य उपभोग घेऊन मृत्युच्या पश्चात भगवान विवस्वान(सूर्य) च्या अंशातुन जन्म घेऊन या पृथ्वीवर सावर्णीक (सूर्य आणि सावर्णी) मनु या नांवाने प्रसिद्ध होशील.

हे वैश्यवर तु मला माया ममत्वाचा त्याग करणारे सनातन ज्ञानाचे वरदान मागितले. त्यानुसार तुला मोक्षाचे ज्ञान

प्राप्त होईल.

**मार्कंडेय उवाच**

याप्रकारे राजा सुरथ आणि समाधि वैश्याला वरदान प्रदान करुन तसेच भक्तीपुर्वक केलेली स्तुती श्रवण करुन अंबिका देवी तात्काळ अंतर्धान पावली. याप्रमाणे देवीकडुन वरदान प्राप्त करुन सर्व क्षत्रियांमध्ये श्रेष्ठ असणारे राजा सुरथ सुर्याच्या अंशाने जन्म घेऊन भविष्यात सावर्णि नामक मनु होतील.

**या प्रकारे श्रीमार्कण्डेय पुराणातील सावर्णिक मन्वंतराच्या कथा अंतर्गत देवी महात्म्यातील सुरथ आणि वैश्य वरप्रदान नामक त्रयोदश अध्याय पुर्ण झाला.**

# अथ प्राधानिक रहस्यम्

सप्तशतीच्या या तीन रहस्याचे ऋषि नारायण असुन व्याकरणाच्या अनुष्टुप् नामक छंदामध्ये या अध्यायाच्या श्लोकांची निर्मिती झाली आहे. श्री महाकालि, श्री महालक्ष्मी व श्री महासरस्वती या रहस्याच्या अधिष्ठात्री देवता आहेत. शास्त्रोक्त फलाच्या प्राप्ति करिता या रहस्याच्या जपाचा विनियोग केला जातो.

राजोवाच :-

हे भगवान आपण मला चंडिकेच्या अवतारांची परम कल्याणकारी कथा मला सांगितली. अता या अवतांच्या प्रधान प्रकृतीचे वर्णन करावे. हे द्विजश्रेष्ठ मी आपणास शरण आलो आहे. मला देवीच्या कोणत्या स्वरुपाची कोणत्या विधीने आराधना करावी हे सर्व यथार्थ रुपात वर्णन करावे.

ऋषिरुवाच :- हे राजन, हे अत्यंत परम गोपनिय रहस्य आहे. हे कोणालाही सांगण्यास योग्य नाही. मात्र तू माझा परम भक्त आहेस त्यामुळे तुला सांगू नये असे माझ्याकडे काहीही नाही.

त्रिगुणमयी (तीनही गुण समान पध्दतीने असणारी) परमेश्वरी महालक्ष्मी हीच सर्वांचे आदिकारण आहे. तीच दृष्य आणि अदृष्य रुपात संपुर्ण विश्वाला व्यापुन उरली आहे.

हे राजा! श्री महालक्ष्मी आपल्या चार भुजांमध्ये इडलिंबू, गदा, ढाल, आणि पानपात्र धारण केले आहे. मस्तकावर नाग, लिंग व योनि या वस्तुंना धारण केले आहे. तप्त झालेल्या सुर्याप्रमाणे तिची कांति आहे. आणि तप्त कांचन अलंकार तिने धारण केले आहेत. तिनेच आपल्या तेजाने या शुन्य जगताला परिपुर्ण केले आहे. परमेश्वरी महालक्ष्मी ने संपुर्ण जगताला शुन्य पाहुन केवल आपल्या तमोगुणाच्या उपउधिने एक अन्य उत्कृष्ट रुप धारण केले. ते रुप एका नारीच्या रुपात प्रकट झाले जिच्या शरिराची कांति काजळाप्रमाणे काळ्या रंगाची होती. तिचे श्रेष्ठ मुख सुशोभित होते. नेत्र मोठे आणि कंबर लवचिक होती. तिने प्रकट केलेल्या देवीच्या चार भूजांच्या हाती ढाल, तलवार, पात्र व कापलेले मस्तक होते. तिने वक्षस्थलावर व मस्तकावर रुंडमाळा धारण केल्या होत्या. अशा प्रकारे प्रकट झालेल्या स्त्रीयांमध्ये श्रेष्ठ असणारी तामसीदेवी श्री महालक्ष्मी बोलु लागली, हे माते तुला नमस्कार असो. तू मला माझे नाव आणि कर्म सांग! तेव्हा महालक्ष्मी ने स्त्रियांमध्ये श्रेष्ठ त्या तामसी देवीला सांगितले, मी तुला नााम प्रदान करते तसेच तुझे जे जे कर्म आहेत ते सुध्दा स्पष्ट करुन सांगते. महामाया, महाकाली, महामारी, क्षुधा, तृषा, निद्रा, तृषा, एकवीरा, कालरात्रि व दुरत्यया हे तुझे नाव आहेत. जे कर्माच्या प्रभावाने लोकांत प्रचलित होतील. या नामांच्या द्वारे तुझ्या कर्मांना जाणुन जो त्याचा पाठ करील त्याला सर्व सुखांचा उपभोग घेता येईल.

हे राजन! महाकालीला हे सांगुन महालक्ष्मीने अत्यंत शुध्द सत्वगुणांच्या द्वारा दुसरे रुप धारण केले. जे चंद्राच्या समान गौरवर्णिय होते. त्या श्रेष्ठ नारीने आपल्या हातात अक्षमाला, अंकुश, वीणा व पुस्तक धारण केले होते. महालक्ष्मी ने तिला ही नाम प्रदान केले. महाविद्या, महावाणी, भारती, वाक्, सरस्वती, आर्या, ब्राह्मी, कामधेनु, वेदगर्भा व धीश्वरी(बुध्दीची स्वामिनी) हे तुझे नाव असतील. त्यानंतर महालक्ष्मीने महाकाली व महासरस्वती या देवींना सांगितले, हे देवी! तुम्ही आता आपल्या गुणांच्या प्रभावाने योग्य असे स्त्री व पुरुष यांचे जोडे उत्पन्न करावेत!

त्या दोन महादेवींना सुचना देऊन स्वत: महालक्ष्मी ने प्रथम आपल्यातुनच एक स्त्री व पुरुषाचा जोडा निर्माण केला. ते दोघेही हिरण्यगर्भ (निर्मल ज्ञानाने युक्त) सुंदर व कमलाच्या आसनावर विराजमान होते. त्यातील एक स्त्री होती व एक पुरुष! महालक्ष्मीने त्या पुरुषाला ब्रह्मन्, विधे, विरंचि, धात या नामाने संबोधित केले (रजोगुण) तर स्त्रीला श्री, पद्मा, कमला, लक्ष्मी या नावाने संबोधिले.(सत्वगुण) या नंतर महाकाली आणि

महासरस्वती या दोघींनीही एक एक जोडा उत्पन्न केला. हे राजा त्यांचेही रुप मी आपणास समजावून सांगतो.

महाकालीने निलकंठधारी, लाल भुजा, श्वेत शरीर, मस्तकावर चंद्राचा मुकुट धारण करणाऱ्या पुरुषाला प्रकट केले तसेच गोरा वर्ण असलेल्या स्त्रीला उत्पन्न केले. तो पुरुष रुद्र, शंकर, स्थानु, कपर्दी व त्रिलोचन या नावाने प्रसिध्द झाला(तमोगुण). तसेच स्त्री त्रयी, विद्या, कामधेनु, भाषा, अक्षरा तसेच स्वरा हे नामाभिधान मिळाले.(रजोगुण)

हे राजन! महासरस्वतीने गोऱ्या रंगाची स्त्री आणि शाम रंगाचा पुरुष प्रकट केला. त्यांचेही नाव मी तुला सांगतो. त्यातील पुरुषाचे नाव विष्णु, कृष्ण, वासुदेव आणि जनार्दन (सत्वगुण) तर स्त्रीचे नाव उमा, गौरी, सती, चंडी, सुंदरी, सुभगा आणि शिवा प्रदान केले. (तमोगुण)

या प्रकारे तीन युवतीच पुरुष रुपाला प्राप्त झाल्या. या विषयाला केवळ ज्ञाननेत्र असणारेच लोक समजु शकतात. दुसरे अज्ञानीजन या रहस्याला जाणुच शकत नाहीत. हे राजा या नंतर श्री महालक्ष्मीने त्रयविद्यास्वरुपा सरस्वतीला ब्रह्माच्या पत्निरुपात प्रदान केले. रुद्राला वरदायिनी गौरी तसेच भगवान वासुदेवाला लक्ष्मी प्रदान केली. (या प्रकारे सत्वगुण जोडा - विष्णु-लक्ष्मी, रजोगुण जोडा - ब्रह्मा-सरस्वति, तमोगुणी जोडा - रुद्र-गौरी निर्माण झाले.)

सरस्वतीच्या सहयोगाने ब्रह्माजीने ब्रह्मांड उत्पन्न केले आणि पराक्रमी रुद्राने गौरीच्या सोबत मिळुन त्याचे भेदन केले. त्या ब्रह्मांडात प्रधान आदि सर्व कार्य, पंचमहाभूतात्मक समस्त स्थावर जंगम रुप जगताची उत्पत्ती झाली. लक्ष्मीच्या सोबत मिळुन श्रीविष्णुने त्या जगताचे पालन-पोषण केले. आणि प्रलयकाळात गौरीच्या साथीने महेश्वराने त्या संपुर्ण जगताचा संहार केला.

महालक्ष्मी ही सर्वतत्वमयी तसेच सर्व तत्वांची आधीश्वरी आहे. तिच निराकार व साकार रुपात राहुन नाना प्रकारच्या नामांना धारण करते. सगुणवाचक सत्य, ज्ञान, चित्त, महामाया आदि नामाने या महालक्ष्मीचे निरुपण करायला हवे. केवळ एका नामाने किंवा एका स्वरुपात तिचे वर्णन होऊच शकत नाही.

# अथ वैकृतिकं रहस्यम्

**ऋषिरुवाच !**

हे राजा पुर्वीच्या सत्वप्रदान त्रिगुणमयी महालक्ष्मीच्या तामसी आदि भेदातुन तीन रुपाचे वर्णन केले आहे. तीच आदिशक्ती शर्वा, चंडिका, दुर्गा, भद्रा आणि भगवती या नांवाने प्रसिद्ध आहेत. तमोगुणमयी महाकाली म्हणजेच भगवान विष्णुची योगनिद्रा आहे. मधु आणि कैटभाचा नाश करण्यासाठी ब्रह्माने जिची स्तुती केली तीच महाकाली आहे. तिचे मुख-भुज आणि पाय दहा दहा आहेत. ती काजळाप्रमाणे काळ्या रंगाची असून ३० नेत्रांच्या विशाल पंक्तीने सुशोभित आहे. तिचे दात आणि जबडा चमकतात. जरी ती रुपाने भयंकर दिसत असली तरी ती रुपं सौभाग्यकांती आणि नांव लौकीक या संपदांची प्राप्ती करुन देणारी आहे. हातामध्ये खड्ग-गदा-बाण-शुल-शंख-चक्र-भुशूण्डी-परिघ आणि धडापासून वेगळे केलेले मस्तक धारण केलेले आहे. हीच महाकाली भगवान महाविष्णुची समस्त जगाला मोहित करणारी विष्णूमाया आहे. तिची उपासना करणाऱ्या प्रत्येकाला ती चराचर जगतातील सर्व प्रकारच्या संपत्ती प्रदान करते. आणि उपासकाच्या सर्व कामनांची पुर्तता करते.

संपूर्ण देवतांच्या अंगातुन जिचा प्रादुर्भाव झाला तीच असिम सौंदर्याने युक्त साक्षात महालक्ष्मी आहे. याच महालक्ष्मीला तीनही गुनांना धारण करणारी त्रिगुणमयी प्रकृती म्हटले आहे. तीच उचित समयी प्रकट होऊन महिषासुराचा संहार करते. व महिषासुर मर्दिनी नामाभिधान धारण करते. तिच्या मुखाचा वर्ण गौर असुन भुजा शामवर्णिय आहेत. स्तन मंडल अत्यंत श्वेत तर कटीभाग व चरण लाल असून पाय निळया रंगाचे आहेत. तिला युद्धात कोणीही जिंकुन न घेतल्याने तिला तिच्या शौर्याचा सार्थ अभिमान आहे. कटीच्या पुढील भाग बहुरंगाने वस्त्राने आच्छादित असल्याने ती अत्यंत सुंदर व मनमोहक दिसत. ती स्वरुपाने सौभाग्यशाली असल्याने तिच्या गळ्यातील माळा वस्त्र आभूषन, कांती व रुप अत्यंत सुंदर आहे. हजारो भुजा असल्या तरी अष्टदश भुजा (१८) मानुनच पुजा करावी. तिच्या हातामध्ये क्रमाने अक्षमाला ,कमळ,बाण, खड्ग, वज्र, गदा -चक्र , त्रिशूल , परशू , शंख, घंटा, पाश , शक्ती, दंड, ढाल, धनुष्य, पानपात्र (मधूपात्र) व कमंडलू या अठरा आयुधांनी तिचे हात विभूषित असून कमलासनावर विराजमान आहे. तसेच सर्वांची ईश्वरी आहे.

हे राजन् जो तिची आराधना करतो तो या त्रिलोकाचा अधिपती होतो. एकमात्र सत्वगुणाला धारण करुन पार्वतीच्या शरीरातुन प्रकट होऊन शुंभ आणि निशुंभ दैत्याचा संहार केला तीच साक्षात सरस्वती आहे. जिच्या आठ भुजा असुन क्रमशः बाण , मुसळ, त्रिशूल, चक्र, शंख, घंटा, नांगर, धनुष्य ही अस्त्रं धारण केले आहेत. दैत्य संहार करणाऱ्या सरस्वतीची भक्तीपुर्वक आराधना केल्यास ती सर्व प्रकारचे ज्ञान प्रदान करते. हे राजा आपणांस महाकाली-महालक्ष्मी व महासरस्वती या तीन देवींच्या मुर्तीस्वरुप प्रकट रुपाचे वर्णन केले आहे. आता देवीची वेगवेगळ्याप्रकारे उपासना कशी करा हे श्रवण करा.

जेव्हा महालक्ष्मी पुजनाची पुजा करायची असते तेव्हा मध्यभागी महालक्ष्मीला स्थापन करुन दक्षिणेकडे महाकाली तर डाव्या अंगाला महासरस्वतीचे पुजन करावे. पृष्ठभागामध्ये तीन युगल देवतांची स्थापना करावी. महालक्ष्मीच्या मागे मध्यभागी सरस्वती व ब्रह्मा, महाकालीच्या मागे गौरी व रुद्र तर महासरस्वतीच्या मागे लक्ष्मीसह विष्णुचे पुजन करावे. महालक्ष्मी आदि तीन देवींच्या अग्रभागात खालील प्रमाणे तीन शक्तींची पुजा करावी.

महालक्ष्मीच्या पुढे १८ भुजाधारी महालक्ष्मीचे पुजन करावे. वामभागी १० मुख असणाऱ्या महाकालीचे तर दक्षिण भागात आठ भुजा असलेल्या महासरस्वतीचे पुजन करावे. जेव्हा केवळ १८ भुजाधारी महालक्ष्मीचे किंवा दशमुखी कालीचे-अष्टभुजा सरस्वतीचे पुजन करावयाचे असते. तेव्हा अरिष्ट निवारणासाठी दक्षिण भागी काल व वामभागी मृत्यु देवता यांची यथोचित पुजा करावी जेव्हा शुंभासुराचा संहार करणाऱ्या अष्टभुजा देवीची

पुजा करायची असेल तेव्हा तिच्या समवेत ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, नारसिंही, ऐंद्री, शिवदूती आणि चामुंडा या नऊ शक्तींची पुजा करावी. त्यावेळी दक्षिणभागी रुद्र आणि वामभागी गणेशाचे पुजन करावे.
**नमो देव्यै...** आदि स्तोत्रानी महालक्ष्मीची पुजा करावी तसेच तिच्या तीन अवतारांची पुजा करताना चरित्रामध्ये जे स्तोत्र आणि मंत्र आहेत त्यांचा उपयोग करावा. १८ भुजा असणारी महिषासुरमर्दिनी महालक्ष्मी ही विशेष रुपात निरंतर पुजनीय आहे. कारण तीच महाकाली-महालक्ष्मी-महासरस्वती या स्वरुपात ओळखली जाते. तीच पापपुण्याची आदिश्वरी व चराचर जगताची महेश्वरी आहे. जो महिषासुमर्दिनीची आराधना करतो त्याला या जगाचे स्वामीत्व प्राप्त होते. जगताला धारण करणाऱ्या भगवती चंडिकेची आवश्य पुजा करावी. अर्घ्यादि पुजन करुन विविध आभूषन गंध-पुष्प-अक्षत-धुप-दीप व नवविध नैवेद्य अर्पण करुन पुजन करावे. (पवित्र सात्विक पुजनात रक्त बलि मांस मदिरा आदिचा वापर करु नये.) मनोभावे साष्टांग नमस्कार करुन आचमन सुगंधित चंदन, कापूर, तांबुल आदि सामग्रीद्वारा देवीची पुजा करावी. देवीच्या वामभागी मस्तक कापलेला महादैत्य महिषासुराचे पुजन करावे. ज्याने भगवती समवेत सायुज्य प्राप्त करुन घेतले आहे. तसेच देवीच्या दक्षिण भागी देवी सिंहाचे पुजन करावे. जो सनातन धर्माचे प्रतिक असून षड्ऐश्वर्याने युक्त आहे. देवीसिंहानेच या चराचर जगतास धारण केले आहे. यानंतर बुद्धिमान पुरुषान एकाग्र चित्ताने देवीची स्तुति करावी व हात जोडुन तीन चिरत्राद्वारे भगवतीचे स्मरण करावे. केवळ एकाच चरित्राद्वारे जेव्हा स्तुती करायची असेल तेव्हा मध्यम चरित्राचा पाठ करावा. त्यावेळी प्रथम व उत्तर चरित्र वाचू नये. अर्धवट चरित्राचा पाठ केल्यास मनोरथ विफल होतात. पाठ समाप्ति नंतर साधकाने प्रदक्षिणा व लोटांगण घालुन पुजन समयी जानते अजानतेपणे झालेल्या चुकांची क्षमा मागावी. या ग्रंथाचा प्रत्येक श्लोक मंत्रच आहे.या मंत्रांनीच तीळ, तुप व खीर यांची आहुती प्रदान करावी. या ग्रंथांतील स्तोत्रांद्वारे चंडिका देवीकरिता हवण पवित्र सामग्रीने करावे. हवन समाप्ती नंतर श्री महालक्ष्मी देवीच्या नाममंत्राचे पुन्हापुन्हा उच्चारण करावे. मन व इंद्रिय यांना वश करुन देवीच्या उपरोक्त स्वरुपाला अंत:करणात स्थापित करुन चिंतन करावे व तन्मय व्हावे . जो मनुष्य याप्रकारे प्रतिदिन पुजन करतो तो सायुज्य प्राप्त करुन घेतो. जो भक्तवत्सला चंडिकेचे नित्य स्मरणपुजन करीत नाही त्याचे परमेश्वराच्या मुलभुत नियमानुसार पुण्याचा क्षय होतो.
हे राजा याकरिता चंडिकेचे शास्त्रोक्त विधीने पुजन करावे. त्या द्वारेच तुला सुखाची प्राप्ती होईल.

# अथ मुर्तिरहस्यम्

**ऋषिरुवाच :-**

हे राजा! नंदा नामक देवी जी नंदापासून उत्पन्न होणार आहे तिची जर भक्तिपुर्वक पुजा आणि स्तुति केली तर ती उपासकाला तीनही लोकांचा स्वामी बनवते. तिच्या शरीराची कांती सोन्याप्रमाणे उत्तम आहे. ती सोनेरी रंगातील वस्त्र परिधान करते. तिच्या शरीराची आभा सुवर्णाप्रमाणेच आहे व ती अलंकारही सुवर्णाचेच धारण करते. तिच्या चार भुजांमध्ये क्रमशः कमळ, अंकुश, पाश आणि शंख आदि आयुध धारण केले आहेत. ती इंदिरा, कमला, लक्ष्मी, श्री व रुक्माबुंजासना (सुवर्णाच्या कमळावर विराजमान आहे अशी) हे नामाभिधान आहेत.

हे राजा, आता मी रक्तदंतिका नामक ज्या देवीचा परिचय दिला आहे आता तिचे स्वरुप वर्णन करतो. ती सर्व प्रकारच्या भयाला दूर करणारी आहे. ती लाल रंगाचे वस्त्र धारण करते. तिच्या शरीराचा रंग ही लालच आहे. अंगावरील समस्त आभूषण ही रक्तवर्णिय आहेत. तिचे अस्त्रं, शस्त्रं, नेत्र, डोक्याचे केस, तिक्ष्ण नख, दात सर्वच रक्तवर्ण आहेत. यामुळेच तिला रक्तदंतिका नाम प्राप्त झाले आहे. तिचे स्वरुप दिसायला भयानक दिसते. जशी पतिव्रता स्त्री आपल्या पतिबद्दल अनुराग दाखवते त्याप्रमाणेच देवी आपल्या भक्तावर आई प्रमाणे स्नेह दाखवत भक्तांचे मनोरथ पुरविते.

रक्तदंतिकेचा आकार वसुधाप्रमाणे विशाल आहे. तिचे दोन स्तन सुमेरुपर्वतासमान लांब, स्थुल आणि मनोहर आहेत. शरीराने कठोर असुन ही ती अत्यंत कमनिय आहे. कामनांची पुर्ति करताना ती आपल्या भक्तांना स्तन्य प्रदान करते. ती आपल्या चार भुजामध्ये खड्ग, पानपात्र, मुसळ आणि नांगर धारण करिते. याच देवीला रक्तचामुंडा आणि योगेश्वरी असे बोलतात. तिच्याद्वारे संपुर्ण चराचर जगत व्याप्त आहे. जो भक्त या रक्तदंतिकेची भक्ति करतो तो चराचर जगताला व्याप्त करतो. त्याला सर्वप्रकारचे भोग भोगायला मिळतात आणि शेवटी देवीचे सायुज्य प्राप्त होते. जो प्रतिदिन रक्तदंतिका देवीचे स्तवन करतो त्याचे देवी प्रेमपुर्वक रक्षण करते.

शाकंभरी देवीची कांती निळ्या रंगाची आहे. तिचे नेत्र निलकमलाप्रमाणे आहेत. तिचे दोन स्तन अत्यंत कठोर, सर्व बाजुंनी बरोबर, उंच, गोल, स्थुल व परस्पर समान आहेत. ती परमेश्वरी कमलासनात निवास करते. तिच्या हातात बाणांचा भाता, मुष्टी, कमळ, विविध भाज्या सह प्रकाशमान धनुष आहे. तिच्या हातातील फुल, फळ, मूळ, पान आदि शाक समुह मनोवांछित रसांनी युक्त असुन सर्व प्रकारच्या क्षुधा, तृषा यांची तृप्ती करुन मृत्युचे भय नष्ट करणारा आहे. या देवीला शाकंभरी, शताक्षी व दुर्गा आदि नामाभिधान आहेत. ती शोकापासुन दूर, दुष्टांचे दमन करणारी. पाप आणि विपत्तींचा समुलतः नयनाट करणारी आहे. उमा, गौरी, सती, चंडी, कालिका व पार्वती आदि ही तिचेच स्वरुप आहे. जो मनुष्य शाकंभरीदेवीची स्तुती, ध्यान, जप, पूजा आणि मनोभावे वंदन करतो तो शिघ्र अन्नादिने संतुष्ट होऊन अमृतरुपी अक्षय फळाचे सेवन करतो.

भीमादेवीचा वर्ण निळ्या रंगाचा आहे. तिचा जबडा आणि दात चमकदार आहेत. नेत्र मोठे असुन स्तन गोल आणि मधुर आहेत. ती आपल्या हातात षड्ग, डमरु, मस्तक आणि पात्र धारण करते. या देवीलाच एकवीरा, कालरात्रि तसेच कामदा या नावाने ओळखले जाते.

भ्रामरीदेवीची कांती विचित्र वर्णाची आहे. ती आपल्या तेजोमंडलांच्या कारणाने प्रभावी दिसते. तिची अंगकांती अनेक रंगाने युक्त आहे. तसेच ती चित्र विचित्र अभूषणाने विभुषित आहे. चित्रभ्रमरपाणि व महामारी या नावांनी तिची महिमा गायली जाते.

हे राजन या प्रमाणे जगन्माता चंडिका देवीच्या मुर्तींचे वर्णन केले आहे. जिची आराधना केल्यास ती कामधेनु प्रमाणे सर्व कामनांची पुर्तता करते. हेच परम गोपनीय रहस्य आहे. हे रहस्य तू दुसऱ्या कोणालाही कथन

करु नकोस. दिव्य मुर्तिंचे हे अख्यान मनोवांछित फल प्रदान करणारे आहे. याकरिता निरंतर प्रयास करत तू या देवीची आराधना करीत जा. महान सप्तशति ग्रंथातील मंत्रांच्या पाठाने मनुष्य सात जन्मातील ब्रह्महत्यादि घोर पापांच्या दोषातुन मुक्त होतो.

याकरिता मी प्रयास करुन देवीच्या गोपनीय पेक्षाही अधिक गोपनीय असे ध्यान वर्णन केले आहे. जे सर्व प्रकारच्या मनातील इच्छांची पुर्तता करणारे आहे. या प्रसादानेच तू सर्वमान्य होऊन जाशील. ही देवी सर्वरुपमयी आहे तसेच संपुर्ण जगत देवीमयच आहे. त्यामुळे मी या विश्वरुपा परमेश्वरीला शतशः नमन करतो.!!

**।। हरि ॐ।।**

**।। श्रीराम।।**

**।। अंबज्ञ।।**

# अथ वैकृतिकं रहस्यम्

ऋषिरुवाच !

हे राजा पुर्वीच्या सत्वप्रदान त्रिगुणमयी महालक्ष्मीच्या तामसी आदि भेदातुन तीन रुपाचे वर्णन केले आहे. तीच आदिशक्ती शर्वा, चंडिका, दुर्गा, भद्रा आणि भगवती या नावाने प्रसिद्ध आहेत. तमोगुणमयी महाकाली म्हणजेच भगवान विष्णुची योगनिद्रा आहे. मधु आणि कैटभाचा नाश करण्यासाठी ब्रह्माने जिची स्तुती केली तीच महाकाली आहे. तिचे मुख-भुज आणि पाय दहा दहा आहेत. ती काजळाप्रमाणे काळ्या रंगाची असून ३० नेत्रांच्या विशाल पंक्तीने सुशोभित आहे. तिचे दात आणि जबडा चमकतात. जरी ती रुपाने भयंकर दिसत असली तरी ती रुपं सौभाग्यकांती आणि नांव लौकीक या संपदांची प्राप्ती करुन देणारी आहे. हातामध्ये खड्ग - गदा- बाण-शुल - शंख- चक्र- भुशूण्डी-परिघ आणि धडापासून वेगळे केलेले मस्तक धारण केलेले आहे. हीच महाकाली भगवान महाविष्णुची समस्त जगताला मोहित करणारी विष्णूमाया आहे. तिची उपासना करणाऱ्या प्रत्येकाला ती चराचर जगतातील सर्व प्रकारच्या संपत्ती प्रदान करते. आणि उपासकाच्या सर्व कामनांची पुर्तता करते.

संपूर्ण देवतांच्या अंगातुन जिचा प्रादुर्भाव झाला तीच असिम सौंदर्याने युक्त साक्षात महालक्ष्मी आहे. याच महालक्ष्मीला तीनही गुनांना धारण करणारी त्रिगुणमयी प्रकृती म्हटले आहे. तीच उचित समयी प्रकट होऊन महिषासुराचा संहार करते. व महिषासुर मर्दिनी नामाभिधान धारण करते.तिच्या मुखाचा वर्ण गौर असुन भुजा शामवर्णिय आहेत. स्तन मंडल अत्यंत श्वेत तर कटीभाग व चरण लाल असून पाय निळया रंगाचे आहेत. तिला युद्धात कोणीही जिंकुन न घेतल्याने तिला तिच्या शौर्याचा सार्थ अभिमान आहे. कटीच्या पुढील भाग बहुरंगाने वस्त्राने आच्छादित असल्याने ती अत्यंत सुंदर व मनमोहक दिसत. ती स्वरुपाने सौभाग्यशाली असल्याने तिच्या गळ्यातील माळा वस्त्र आभूषन , कांती व रुप अत्यंत सुंदर आहे. हजारो भुजा असल्या तरी अष्टदश भुजा (१८) मानुनच पुजा करावी.तिच्या हातामध्ये क्रमाने अक्षमाला ,कमळ,बाण, खड्ग, वज्र, गदा -चक्र, त्रिशूल , परशू, शंख, घंटा, पाश, शक्ती, दंड, ढाल, धनुष्य, पानपात्र (मधूपात्र) व कमंडलू या अठरा आयुधांनी तिचे हात विभूषित असून कमलासनावर विराजमान आहे. तसेच सर्वांची ईश्वरी आहे. हे राजन् जो तिची आराधना करतो तो या त्रिलोकाचा अधिपती होतो.

एकमात्र सत्वगुणाला धारण करुन पार्वतीच्या शरीरातुन प्रकट होऊन शुंभ आणि निशुंभ दैत्याचा संहार केला तीच साक्षात सरस्वती आहे. जिच्या आठ भुजा असुन क्रमशः बाण , मुसळ, त्रिशूल, चक्र, शंख, घंटा, नांगर, धनुष्य ही अस्त्रं धारण केले आहेत. दैत्य संहार करणाऱ्या सरस्वतीची भक्तीपुर्वक आराधना केल्यास ती सर्व प्रकारचे ज्ञान प्रदान करते. हे राजा आपणांस महाकाली-महालक्ष्मी व महासरस्वती या तीन देवींच्या मुर्तीस्वरुप प्रकट रुपाचे वर्णन केले आहे. आता देवीची वेगवेगळ्याप्रकारे उपासना कशी करा हे श्रवण करा.

जेव्हा महालक्ष्मी पुजनाची पुजा करायची असते तेव्हा मध्यभागी महालक्ष्मीला स्थापन करुन दक्षिणेकडे महाकाली तर डाव्या अंगाला महासरस्वतीचे पुजन करावे. पृष्ठभागामध्ये तीन युगल देवतांची स्थापना करावी. महालक्ष्मीच्या मागे मध्यभागी सरस्वती व ब्रह्मा , महाकालीच्या मागे गौरी व रुद्र तर महासरस्वतीच्या

मागे लक्ष्मीसह विष्णुचे पुजन करावे. महालक्ष्मी आदि तीन देवींच्या अग्रभागात खालील प्रमाणे तीन शक्तींची पुजा करावी.

महालक्ष्मीच्या पुढे १८ भुजाधारी महालक्ष्मीचे पुजन करावे. वामभागी १० मुख असणाऱ्या महाकालीचे तर दक्षिण भागात आठ भुजा असलेल्या महासरस्वतीचे पुजन करावे. जेव्हा केवळ १८भुजाधारी महालक्ष्मीचे किंवा दशमुखी कालीचे- अष्टभुजा सरस्वतीचे पुजन करावयाचे असते. तेव्हा अरिष्ट निवारणासाठी दक्षिण भागी काल व वामभागी मृत्यु देवता यांची यथोचित पुजा करावी जेव्हा शुंभासुराचा संहार करणाऱ्या अष्टभुजा देवीची पुजा करायची असेल तेव्हा तिच्या समवेत ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही , नारसिंही, ऐंद्री, शिवदूती आणि चामुंडा या नऊ शक्तींची पुजा करावी. त्यावेळी दक्षिणभागी रुद्र आणि वामभागी गणेशाचे पुजन करावे.

नमो देव्यै... आदि स्तोत्रानी महालक्ष्मीची पुजा करावी तसेच तिच्या तीन अवतारांची पुजा करताना चरित्रामध्ये जे स्तोत्र आणि मंत्र आहेत त्यांचा उपयोग करावा. १८ भुजा असणारी महिषासुरमर्दिनी महालक्ष्मी ही विशेष रुपात निरंतर पुजनीय आहे. कारण तीच महाकाली-महालक्ष्मी-महासरस्वती या स्वरुपात ओळखली जाते. तीच पापपुण्याची आदिश्वरी व चराचर जगताचि महेश्वरी आहे. जो महिषासुमर्दिनीची आराधना करतो त्याला या जगाचे स्वामीत्व प्राप्त होतस. जगताला धारण करणाऱ्या भगवती चंडिकेची आवश्य पुजा करावी.

अर्घ्यादि पुजन करुन विविध आभूषन गंध-पुष्प-अक्षत-धुप-दीप व नवविध नैवेद्य अर्पण करुन पुजन करावे. (पवित्र सात्विक पुजनात रक्त बलि मांस मदिरा आदिचा वापर करु नये.) मनोभावे साष्टांग नमस्कार करुन आचमन सुगंधित चंदन, कापूर , तांबुल आदि सामग्रीद्वारा देवीची पुजा करावी. देवीच्या वामभागी मस्तक कापलेला महादैत्य महिषासुराचे पुजन करावे. ज्याने भगवती समवेत सायुज्य प्राप्त करुन घेतले आहे. तसेच देवीच्या दक्षिण भागी देवी सिंहाचे पुज करावे. जो सनातन धर्माचे प्रतिक असून षड्ऐश्वर्याने युक्त आहे. देवीसिंहानेच या चराचर जगतास धारण केले आहे. यानंतर बुद्धिमान पुरुषान एकाग्र चित्ताने देवीची स्तुति करावी व हात जोडुन तीन चिरत्राद्वारे भगवतीचे स्मरण करावे. केवळ एकाच चरित्राद्वारे जेव्हा स्तुती करायची असेल तेव्हा मध्यम चरित्राचा पाठ करावा. त्यावेळी प्रथम व उत्तर चरित्र वाचू नये. अर्धवट चरित्राचा पाठ केल्यास मनोरथ विफल होतात. पाठ समाप्ति नंतर साधकाने प्रदक्षिणा व लोटांगण घालुन पुजन समयी जानते अजानतेपणे झालेल्या चुकांची क्षमा मागावी. या ग्रंथाचा प्रत्येक श्लोक मंत्रच आहे.या मंत्रांनीच तीळ , तुप व खीर यांची आहुती प्रदान करावी. या ग्रंथांतील स्तोत्रांद्वारे चंडिका देवीकरिता हवण पवित्र सामग्रीने करावे. हवन समाप्ती नंतर श्री महालक्ष्मी देवीच्या नाममंत्राचे पुन्हापुन्हा उच्चारण करावे. मन व इंद्रिय यांना वश करुन देवीच्या उपरोक्त स्वरुपाला अंत:करणात स्थापित करुन चिंतन करावे व तन्मय व्हावे. जो मनुष्य याप्रकारे प्रतिदीन पुजन करतो तो सायुज्य प्राप्त करुन घेतो. जो भक्तवत्सला चंडिकेचे नित्य स्मरणपुजन करीत नाही त्याचे परमेश्वराच्या मुलभुत नियमानुसार पुण्याचा क्षय होतो.

हे राजा याकरिता चंडिकेचे शास्त्रोक्त विधीने पुजन करावे. त्या द्वारेच तुला सुखाची प्राप्ती होईल.

# अथ मुर्तिरहस्यम्

**ऋषिरुवाच :-**

हे राजा! नंदा नामक देवी जी नंदापासून उत्पन्न होणार आहे तिची जर भक्तिपुर्वक पुजा आणि स्तुति केली तर ती उपासकाला तीनही लोकांचा स्वामी बनवते. तिच्या शरीराची कांती सोन्याप्रमाणे उत्तम आहे. ती सोनेरी रंगातील वस्त्र परिधान करते. तिच्या शरीराची आभा सुवर्णाप्रमाणेच आहे व ती अलंकारही सुवर्णाचेच धारण करते. तिच्या चार भुजांमध्ये क्रमशः कमळ, अंकुश, पाश आणि शंख आदि आयुध धारण केले आहेत. ती इंदिरा, कमला, लक्ष्मी, श्री व रुक्माबुंजासना (सुवर्णाच्या कमळावर विराजमान आहे अशी) हे नामाभिधान आहेत.

हे राजा, आता मी रक्तदंतिका नामक ज्या देवीचा परिचय दिला आहे आता तिचे स्वरुप वर्णन करतो. ती सर्व प्रकारच्या भयाला दूर करणारी आहे. ती लाल रंगाचे वस्त्र धारण करते. तिच्या शरीराचा रंग ही लालच आहे. अंगावरील समस्त आभूषण ही रक्तवर्णिय आहेत. तिचे अस्त्रं, शस्त्रं, नेत्र, डोक्याचे केस, तिक्ष्ण नख, दात सर्वच रक्तवर्ण आहेत. यामुळेच तिला रक्तदंतिका नाम प्राप्त झाले आहे. तिचे स्वरुप दिसायला भयानक दिसते. जशी पतिव्रता स्त्री आपल्या पतिबद्दल अनुराग दाखवते त्याप्रमाणेच देवी आपल्या भक्तावर आई प्रमाणे स्नेह दाखवत भक्तांचे मनोरथ पुरविते.

रक्तदंतिकेचा आकार वसुधाप्रमाणे विशाल आहे. तिचे दोन स्तन सुमेरुपर्वतासमान लांब, स्थुल आणि मनोहर आहेत. शरीराने कठोर असुन ही ती अत्यंत कमनिय आहे. कामनांची पुर्ति करताना ती आपल्या भक्तांना स्तन्य प्रदान करते. ती आपल्या चार भुजामध्ये खड्ग, पानपात्र, मुसळ आणि नांगर धारण करिते. याच देवीला रक्तचामुंडा आणि योगेश्वरी असे बोलतात. तिच्याद्वारे संपुर्ण चराचर जगत व्याप्त आहे. जो भक्त या रक्तदंतिकेची भक्ति करतो तो चराचर जगताला व्याप्त करतो. त्याला सर्वप्रकारचे भोग भोगायला मिळतात आणि शेवटी देवीचे सायुज्य प्राप्त होते. जो प्रतिदिन रक्तदंतिका देवीचे स्तवन करतो त्याचे देवी प्रेमपुर्वक रक्षण करते.

शाकंभरी देवीची कांती निळ्या रंगाची आहे. तिचे नेत्र निलकमलाप्रमाणे आहेत. तिचे दोन स्तन अत्यंत कठोर, सर्व बाजुंनी बरोबर, उंच, गोल, स्थुल व परस्पर समान आहेत. ती परमेश्वरी कमलासनात निवास करते. तिच्या हातात बाणांचा भाता, मुष्टी, कमळ, विविध भाज्या सह प्रकाशमान धनुष आहे. तिच्या हातातील फुल, फळ, मूळ, पान आदि शाक समुह मनोवांछित रसांनी युक्त असुन सर्व प्रकारच्या क्षुधा, तृषा यांची तृप्ती करुन मृत्युचे भय नष्ट करणारा आहे. या देवीला शाकंभरी, शताक्षी व दुर्गा आदि नामाभिधान आहेत. ती शोकापासुन दूर, दुष्टांचे दमन करणारी. पाप आणि विपत्तींचा समुलतः नयनाट करणारी आहे. उमा, गौरी, सती, चंडी, कालिका व पार्वती आदि ही तिचेच स्वरुप आहे. जो मनुष्य शाकंभरीदेवीची स्तुती, ध्यान, जप, पूजा आणि मनोभावे वंदन करतो तो शिघ्र अन्नादिने संतुष्ट होऊन अमृतरुपी अक्षय फळाचे सेवन करतो.

भीमादेवीचा वर्ण निळ्या रंगाचा आहे. तिचा जबडा आणि दात चमकदार आहेत. नेत्र मोठे असुन स्तन गोल आणि मधुर आहेत. ती आपल्या हातात षड्ग, डमरु, मस्तक आणि पात्र धारण करते. या देवीलाच एकवीरा, कालरात्रि तसेच कामदा या नावाने ओळखले जाते.

भ्रामरीदेवीची कांती विचित्र वर्णाची आहे. ती आपल्या तेजोमंडलांच्या कारणाने प्रभावी दिसते. तिची अंगकांती अनेक रंगाने युक्त आहे. तसेच ती चित्र विचित्र अभूषणाने विभुषित आहे. चित्रभ्रमरपाणि व महामारी या नावांनी तिची महिमा गायली जाते.

हे राजन या प्रमाणे जगन्माता चंडिका देवीच्या मुर्तीचे वर्णन केले आहे. जिची आराधना केल्यास ती कामधेनु प्रमाणे सर्व कामनांची पुर्तता करते. हेच परम गोपनीय रहस्य आहे. हे रहस्य तू दुसऱ्या कोणालाही कथन

करु नकोस. दिव्य मुर्तिंचे हे अख्यान मनोवांछित फल प्रदान करणारे आहे. याकरिता निरंतर प्रयास करत तू या देवीची आराधना करीत जा. महान सप्तशति ग्रंथातील मंत्रांच्या पाठाने मनुष्य सात जन्मातील ब्रह्महत्यादि घोर पापांच्या दोषातुन मुक्त होतो.

याकरिता मी प्रयास करुन देवीच्या गोपनीय पेक्षाही अधिक गोपनीय असे ध्यान वर्णन केले आहे. जे सर्व प्रकारच्या मनातील इच्छांची पुर्तता करणारे आहे. या प्रसादानेच तू सर्वमान्य होऊन जाशील. ही देवी सर्वरुपमयी आहे तसेच संपुर्ण जगत देवीमयच आहे. त्यामुळे मी या विश्वरुपा परमेश्वरीला शतशः नमन करतो.!!

।। हरि ॐ।।

।। श्रीराम।।

।। अंबज्ञ।।